पुष्पकरंडक.



मुंबईत:

एज्युकेशन सोसायटीच्या छापखान्यांत छापिला.

सन १८९०.

THIS LITTLE STORY

Is Affectionately Dedicated

TO

THE LOVING MEMORY OF

AVADABAI BHIDE.

PREFACE.

After reading this very pretty and pathetic English story, the idea suggested itself to the Author of this translation that portions of the work might be done into the Marathi language in a form beneficial for youthful readers; and from which many useful lessons might be learnt or imparted. The Author knows the difficulties attending such translations, and this little work is given to the public with the utmost diffidence, and with every hope that faults may be looked upon leniently when found in this a first production.

प्रस्तावना.

ही पुढील मनोवेधक गोष्ट प्रथम फ्रेंच भाषेंत लिहिली असून तिचें इंग्रजींत भाषांतर केलें आहे. व तें इंग्रजी जाणणाऱ्या लोकांत प्रसिद्ध आहे. तें मी वाचलें, तेव्हां मला असें वाटलें कीं सदर गोष्टीचें भाषांतर महाराष्ट्र भाषेंत केलें असतां [illegible] मराठी वाचकांचें मनोरंजन खास होईल. मूळ गोष्टीचें भाषांतर न करितां जेथें मला योग्य दिसलें, तेथें थोडाथोडा फेरफार करून या देशाच्या लोकांच्या विचारसरणीस अनुसरून अशा पद्धतीनें हें पुस्तक लिहिलें आहे. ही गोष्ट हृदयद्रावक असून उपदेशपरही आहे. ही विद्यार्थी लोकांस तर फारच उपयोगी होईल, परंतु इतरांनीही वाचली असतां त्याचा फायदा झाल्यावांचून राहणार नाहीं. ह्या पुस्तकांत मनोवेधकपणा जितका चांगला वठला आहे तितका दुसरे कोठें फारसें उदाहरण माझ्या पाहण्यांत आलें नाहीं. फार तर काय तें जें पुस्तक उघडून पहावें त्यांत त्यांत विलक्षण आनंद वाचणाऱ्याच्या मनास होईल अशा प्रकारचें कांहीं ना कांहीं तरी आहेच. माझ्या पुस्तकांतील रहस्य सर्व वाचकांच्या अनुभवास आल्यावांचून राहणार नाहीं. ग्रंथ करण्याचे कामीं हा माझा पहिलाच प्रयत्न आहे, म्हणून कांहीं दोष आढळल्यास, त्याविषयीं विद्वज्जन क्षमा करतील अशी माझी आशा आहे.

एम्. बी.

पुष्पकरंडक.

प्रकरण १.

शांतेचा पूर्ववृत्तांत.

शांतेचा बाप एका कुलीन परंतु गरीबीस आलेल्या घराण्यांतील गृहस्थ होता. तो **सुवर्णपुरींतील प्रतापराव** नांवाच्या एका सरदाराच्या माळ्याजवळ बागवानाचें काम लहानपणींच शिकूं लागला. तो जात्या फार हुशार असून लहानपणापासूनच सुस्वभावाचा होता, आणि प्रामाणिकपणाविषयीं लोकांमध्यें त्याची फार ख्याति होती. ह्या कारणामुळें तो लोकांस फार आवडूं लागला. माळ्याचा धंदा शिकल्यावर बाहेर नौकरीस न जाऊं देतां **प्रतापरावान** त्याला आपलेपाशींच ठेविलें. त्यानें आपलें काम इतकें इमानें इतबारें बजाविलें कीं, कांहीं दिवसांनंतर **प्रतापरावानें** संतोषानें त्यास रहाण्यास एक लहानसें घर दिलें, आणि माळ्याच्या धंद्यानें निर्वाह होण्यासारखी जमीनही दिली.

येशु ख्रिस्ताच्या सत्याचें ज्ञान **आनंदराव** यास लहानपणींच झालें होतें, तेणेंकरून त्याचे वृत्तींत चांगला पालट पडला होता आणि ह्मणून तो आपलीं कामें चांगल्या रीतीनें बजावीत असे.

त्याचे घराजवळ एक तरूण मुलगी रहात होती, तिला **आईबाप कोणी नव्हते;** आणि ज्या **ईश्वरी** देणगीचें ज्ञान

आनंदराव यास झालें होतें तेंच ज्ञान **ईश्वरकृपेनें** तिलाही झालें होतें; तिच्याशीं त्यानें विवाह केला. **ईश्वराची** भक्ति करितां येईल असा लग्नसंबंध मनुष्यानें जोडावा ह्या नेमाचें उलंघन केल्यानें हजारों स्त्रीपुरुषांवर दुःखाचे डोंगर कोसळतात, हें त्यास ठाऊक होतें. कित्येक वर्षेपर्यंत **आनंदराव** आणि त्याची सुशील पत्नी ह्या उभयतांनीं एकविचारानें संसारयात्रा केली. ते गरीब होते तरी **ईश्वरी** नियमाप्रमाणें वागत, यामुळें केवळ त्यांस मान मिळे, आणि लोक त्यांवर ममता करीत इतकेंच नाहीं, परंतु त्यापासून लोकांत धर्माचेंही महत्त्व वाढे. **ईश्वराचा** खरा भक्त कितीही गरीब स्थितीमध्यें असो, तो जर बोलल्याप्रमाणें चालत असेल तर त्याचे हातून धर्माचें महत्त्व वाढल्याशिवाय राहणार नाहीं.

ह्या जगामध्यें मनुष्य कोणत्याही उंच अथवा नीच स्थितींत असो, त्यास ऐहिक दुःखें आणि मरण प्राप्त होत नाहींत असें कधींही होत नाहीं. आणि हें खरें आहे कीं, **ईश्वराचे** भक्तांवर जीं संकटें येतात त्यांमुळें त्यांचें मन **ईश्वराकडे** अधिकाधिक वळतें. हेंच त्या उभयतांच्या अनुभवास आलें. त्या धार्मिक स्त्रीपुरुषांस संतति पुष्कळ झाली, परंतु **शांता** नामक कन्येशिवाय त्यांचीं इतर सर्व मुलें लहानपणींच **ईश्वराकडे** गेलीं. थोड्याच काळानें त्यांची प्रिय माताही त्यांचे भेटीस गेली. पुनरुत्थान होण्याचें जें वचन त्या **जगन्नियंत्यानें** दिलें आहे त्याच वचनावर जो तिचा पूर्ण भरंवसा आणि आशा होती त्यांचा भंग न होतां तिचा अंत झाला.

शुभवर्त्तमानामध्यें **ईश्वरी** वचन सांगितलें आहे कीं

जे ईश्वराची पूर्ण भक्ति करितात ते मेल्यानंतर त्यांचा ईश्वरापासून व एकमेकांपासून कधींही वियोग होत नाहीं; त्यावर पूर्ण भरंवसा ठेवून आनंदरावानें आपल्या दुःखाचें शमन करून घेतलें.

ज्यांच्यावर आपली पूर्ण ममता आहे, तीं जेव्हां प्रभूवर विश्वास ठेवून मरतात तेव्हां आपण असें म्हणावें कीं,

आर्या.

बहु वात्सल्यें प्रभुनें पाठविला काळ तनय न्यायाला ।
कां मग दुःख करावें भ्यावें वा आत्मबंधु गेल्याला ? ॥

आनंदराव सुमारें ६० वर्षांचा वृद्ध होऊन त्याचे केस पिकले होते. त्याच्या मोठ्या कुटुंबापैकीं एक मुलगी मात्र राहिली होती. तिच्या आईच्या नांवानें तिला हाक मारीत. जेव्हां तिची आई वारली तेव्हां ती पांच वर्षांची होती.

लहान मुलांचे समक्ष त्यांचे सद्गुणांची प्रशंसा केल्यानें तीं गर्विष्ठ होतात, असें आहे तरी शांतेचे शेजारीपाजारी तिला तिचे मागें सुस्वरूप म्हणत असत एवढेंच नाहीं, परंतु तिचे समक्ष देखील तिच्या सौंदर्याची वाखाणणी ते करीत असत. ती आपले बापावर ममता करी, आणि फार विनयशील व बापाची आज्ञा पाळण्याविषयीं तत्पर असे. उघडच आहे कीं ह्या गुणांशिवाय सर्व बाहेरील रूप व्यर्थच होय.

शांता १९ वर्षांची झाल्यानंतर तिच्या पित्यानें संसाराचीं सर्व कामें तिच्या अंगावर सोंपिलीं. ती इतकी हुशार आणि दक्ष असे कीं, कोणालाही तिच्या कामांत काडीमात्र उणें काढण्यास जागा नसे. ती आपले घरांतील

सामान इतकें चोख ठेवीत असे कीं, तिचीं स्वयंपाकाचीं भांडीं देखील अगदीं नवीं आहेत असें दिसत असे.

आनंदराव बागेचें काम शिकला होता, हें आम्हीं आपल्या वाचकांस सांगितलेंच आहे. तो आपल्या बागेमध्यें नाना तऱ्हेची फळफळावळ व भाजीपाला उत्पन्न करीत असे, आणि त्या मळ्याजवळ शहरामध्यें आठवड्यांतून दोन वेळां बाजार भरत असे, त्या बाजारीं इतर माळ्यांप्रमाणें फळफळावळ विकून जें उत्पन्न होई त्यावर तो आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करी. त्याला फुलझाडें लावण्याचीही हौस असे. घरधंदा आटोपल्यावर त्याची मुलगी **शांता** हीही त्याच्या ह्या कामास हात लावीत असे.

शांतेचा बाप फार शहाणा होता. तो तिला नेहमीं धर्माच्या व नीतीच्या गोष्टी शिकवीत असे; तेणेंकरून तिच्या श्रमाचा परिहार होऊन ती असें देखील ह्मणत असे कीं, माझे आयुष्यांत हे अतिशय सुखाचे दिवस होत. **शांते**चा जन्म जणूं काय बागेमधीलच होता, कारण तिला लहानपणींच झाडांची इतकी गोडी लागली कीं, जेव्हां तिला फावत असे तेव्हां ती मोठ्या आनंदानें बागेंत काम करण्यास लागे. ती लहान रोपें मोठ्या दक्षतेनें आणि जपून लावीत असे. ती नाना तऱ्हेच्या कळ्यांकडे फार बारकाईनें लक्ष देऊन पहात असे, व त्यांपासून कोणत्या प्रकारचीं फुलें येतील ह्याविषयीं ती विचार करीत असे. झाडांच्या कळ्या कधीं उमलतीलसें तिला होई, व त्या एकदा उमलल्या म्हणजे त्यांचा रमणीय रंग व शोभा पाहून तिला अत्यानंद होत असे.

तो वृद्ध बागवान असें म्हणे कीं, लोक आपली संपत्ति

डागडागिने विकत घेण्यांत घालोत, परंतु मला जें कांहीं मिळेल तें मी फुलझाडांचें बीं विकत घेण्यांत घालवीन. ह्या फुलांच्या योगानें ईश्वराची कृपा व शक्ति ह्यांचें जसें ज्ञान प्राप्त होईल, तसें डागडागिन्यांनीं कधींही माझ्या बयेस प्राप्त होणार नाहीं. खरोखर ह्यांपासून प्रत्येक दिवशीं शांतेस फार आनंद होत असे.

त्या बागेवरून कोणी केव्हांही गेलें तरी तींतील शोभा पाहण्याकरितां थांबलें नाहीं असें कधींही होत नसे. लहान मुलें देखील शाळेंत जातांना आंत डोकावीत, आणि शांता त्यांस आनंदानें बहुतकरून कांहीं ना कांहीं फुलें देतच असे.

आनंदराव आपल्या शहाणपणाच्या योगानें आपल्या मुलीचें मन ऐहिक सुखापासून पारलौकिक सुखाकडे कसें वळवावें हें पुरतेपणीं जाणत असे. त्या बागेस ज्या नाना तऱ्हेच्या फुलांनीं शोभा आली होती त्या फुलांची सुंदर आकृति, त्यांचें वैचित्र्य, त्यांचे नाना तऱ्हेचे रंग, आणि त्यांचा आल्हादकारक सुगंध, ह्या सर्व गोष्टींवरून त्यानें तिला ईश्वराची शक्ति, शहाणपण व दया हीं शिकविलीं व ह्या रीतीनें तिची ऐहिक सुखाची वृत्ति ईश्वराकडे लाविली.

आनंदरावाची अशी चाल होती कीं, अरुणोदयाची जी सुखकारक वेळ ती सर्व ईश्वरभक्तीमध्यें घालवावी, आणि आपल्या प्रत्येक कामास ईश्वराचें साहाय्य मागून तो त्यास प्रारंभ करीत असे, व असें करण्यास व्यत्यय येऊं नये व आपल्या कामाकाजांत हयगय होऊं नये म्हणून तो फार पहाटेस उठत असे. सन्मार्गानें वागणाऱ्या मनुष्यास पहाटेस उठणें अवश्य आहे. ज्या गो-

ष्टींच्या योगानें सार्वकालिक जीवन प्राप्त होतें, त्या गोष्टींविषयीं, व आकाशसदनामध्यें वसणारा जो आपला प्रिय **पिता** त्याचें मन:पूर्वक व विचारपूर्वक स्मरण करण्यास ज्या मनुष्यास किंचित् देखील फुरसत होत नाहीं त्या मनुष्याचें जिणें व्यर्थ होय.

त्याच बागेमध्यें त्यानें एक पर्णकुटिका बांधिली होती. तीमधून बागेंतील चित्तवेधक शोभा दृष्टीस पडत असे. तेथें वसंतऋतूचे रमणीय दिवशीं पक्ष्यांचें सुस्वर गायन ऐकूं येत असे, आणि प्रात:कालचें कोमल ऊन पडत असे त्या ठिकाणीं **आनंदराव** आपल्या मुलीस नेहमीं नेत असे, आणि ज्या जगन्नियंत्या **परमेश्वरानें** सूर्यास प्रभा देऊन सतेज केलें आहे, ज्याच्या सत्तेनें मेघ वेळचेवेळीं दयार्द्रबुद्धीनें पृथ्वीवर वर्षाव करितात आणि ज्याच्या इच्छेनें सर्व फुलांस निरनिराळें रंगरूप येतें, त्या **प्रभू**विषयीं **आनंदराव** ह्या स्थळीं नेहमीं आपल्या लाडक्या— व त्यांत सुशील अशा— कन्येशीं संभाषण करीत असे. ह्याच पर्णकुटिकेमध्यें जो आपला सदय अंत:करणाचा सर्वशक्तिमान् **पिता**, ज्याच्या प्रिय-पुत्रानें आम्हां पतितांचा उद्धार करण्याकरितां आपला जीव देण्यास काडीमात्र देखील मागेंपुढें पाहिलें नाहीं, व या गोष्टींच्या योगानें जो सर्वांस आपली ममता दाखवीत आहे, अशा जगन्नियंत्या **परमेश्वरा**विषयीं विचार करण्यास तो **शांते**ला उपदेश करीत असे. याच ठिकाणीं त्यानें तिला आपली पतित अवस्था कशी आहे ती दाखविली, व ह्या अवस्थेतून आपला त्राता जो **येशु ख्रिस्त** ह्याजकडे अतिम-मतेनें तिचें मन मृदुवचनांनीं वळविलें. तसेंच करद्वय जोडून मोठ्या नम्रतेनें **ईश्वराची** प्रार्थना कशी करावी हें

त्यानें तिला शिकविलें. आणि ईश्वरप्रणीत सत्यग्रहण कर-ण्यास तिचें कोमल अंतःकरण प्रफुल्लित झालेलें पाहून, **आनंदराव** यास अत्यानंद झाला. अशा सकाळच्या उपासनेनें दिवसानुदिवस तिच्या मनांत सत्यधर्माचीं तत्त्वें अधिकाधिक बिंबत चाललीं. त्या अभ्यासामध्यें किमपिही अंतर पडलें नाहीं. **शांतेला** जीं फुलें मनापासून आवडत असत, त्याच फुलांच्या दृष्टांतांच्या योगानें **आनंदरावानें** ख्रिस्तीधर्मान्वयें सद्वर्त्तनाची माहिती तिला करून दिली.

शिशिरऋतूचे कांहीं दिवस गेल्यानंतर एक गुलनार पुष्प तिनें तोडून तें **आनंदरावाला** नेऊन दाखविलें, तें पाहून तो म्हणाला –"बेटा, हें फूल नम्रता, मितभाषण, आणि परोपकारबुद्धि ह्यांचें चिह्न आहे; ह्याप्रमाणेंच तुझ्याही अंगीं ते गुण परिपूर्ण असावे अशी माझी मनीषा आहे. ह्याचा रंग मर्यादेस अनुरूप आहे; हें पुष्प कोणाच्या नजरेस पडणार नाहीं अशा एकांतस्थळीं छायेमध्यें विकसित होतें, आणि त्याचा चोहोंकडे घमघमाट सुटतो. ह्याच फुलाप्रमाणें, माझे बये, तुला एकांताची गोडी लागो. जोंपर्यंत तुझ्या जिवांत जीव आहे तोंपर्यंत नेहमी निरर्थक डाम-डौलाचा तुला मनापासून तिटकारा येवो; विनाकारण लोकांचें चित्त आपणाकडे ओढून घेण्यास कधींही झटूं नको, आणि मुली, निरभिमानबुद्धीनें परोपकार करीत जा."

जेव्हां बागेंतील गुलछबूंस आणि गुलाबांस फुलें आलीं, तेव्हां तिचा पिता आपली सुशील कन्या बागेंतील शोभा पाहून फार तल्लीन झाली आहे, हें पाहून गुलछबूकडे बोट दाखवून ह्मणाला–"बये, ह्या फुलामध्यें नीटनेटकेपणा, आणि चोखपणा किती दृष्टीस पडत आहे तो पहा. तें

फूल इतकें पांढरें आहे कीं जणूं काय नुकता पिंजलेला कापूसच ठेविला आहे, असें भासतें. शास्त्रांत असें लिहिलें आहे कीं, 'ज्यांचीं अंत:करणें निर्मल आहेत त्यांस मात्र ईश्वराचें दर्शन होईल.' ह्या वाक्याअन्वयें ज्या मुलीचें अंत:करण असें स्वच्छ असेल ती मुलगी ह्या भूतलावर किती सुखी असावी बरें! जेथें सौंदर्य व सौकुमार्य अधिक, तेथें पवित्रता टिकणें कठिण. पहा, गुलछबूचें फूल किती सुकुमार आणि सतेज असतें! त्या फुलास स्पर्श करणें झाल्यास किती हलक्या हातानें करावा लागतो! तोच जर जोरानें केला तर लागलेंच तें फूल कोमेजून त्याचा गुलजारपणा कमी होतो इतकेंच नाहीं, परंतु त्यावर असे छट्टे पडतात कीं, ते कधींच जात नाहींत. ह्याचप्रमाणें मनामध्यें जर एक कुकल्पना आली, अथवा मुखांतून जर एक अपशब्द निघाला तर तें मन लागलेंच दूषित होतें.' नंतर गुलाबाच्या फुलाकडे बोट दाखवून ह्मणाला-"बये, हें गुलाबाचें फूल पहा, हें मर्यादेची केवळ प्रतिमा आहे. मर्यादेची तोंडावर जी टवटवी येते ती गुलाबाच्या टवटवीपेक्षां अधिक आहे. अयोग्य विचार मनामध्यें आल्याबरोबर ते सुखाचा नाश करणार, तो होऊं नये म्हणून मोठ्या श्रमानें त्यापासून दूर रहाण्यास जी प्रयत्न करिते, तीच मुलगी ह्या जगांत धन्य होय. अयोग्य वर्तनाविषयीं लज्जायमान झालेली मुखश्री फार वेळ टिकते, परंतु जिला पापाची लाज वाटत नाहीं तिचें मुख निस्तेज होऊन अखेरीस ती अकालिक मृत्यूच्या पंथास लागते." शांतेच्या पित्यानें गुलछबूचीं व गुलाबाचीं कांहीं फुलें तोडून त्यांचा एक गजरा केला व तो आपल्या मुलीस देऊन म्हणाला- 'मुली, हीं फुलें बहीणभावंडें आहेत, आणि जर हीं

हारामध्यें अथवा गजऱ्यामध्यें एकत्र गुंफलीं तर त्यापासून जी मनोहर शोभा दिसते ती केवळ अप्रतिम प्रेम. सुस्वभाव आणि मर्यादा हीं आवळींजावळीं भावंडें आहेत, म्हणून त्यांचा वियोग कधींही होत नाहीं. सुस्वभावाच्या मनुष्यानें नेहमीं फार दक्षतेनें वागलें पाहिजे, व पुढें जें संकट आपणावर ओढवणार तें येऊं नये म्हणून **परमेश्वरानें** सदय अंतःकरणानें मर्यादा व सुस्वभाव ह्यांची गांठ घालून दिली. मर्यादेच्या अंगभूत सद्गुण आहेच. ईश्वरी इच्छा असेल तर तुझ्या अंतःकरणांत त्याच्या कृपेनें जी गुलछबूची निर्मलता तीच राहील. मरणकालीं तुझ्या मुखावरची शोभा नाहींशी होईल हें खरें, परंतु तुझें पुनरुत्थान होईल तेव्हां हें मुख पुनः इतकें प्रफुल्लित होईल कीं, त्याची प्रफुल्लता तिळमात्र देखील कधींच कमी होणार नाहीं."

श्लोक.

प्रातःकालीं प्रथम मिटल्या पाकळ्या ज्याहि होत्या
आनंदानें उघडुनि मृदू रेशमासारख्या त्या ।
सूर्याची ती मुळिं प्रखरता शैत्य किंवा निशींचें
पुष्पें चित्तीं गणुनि न बहू दाविती रंग त्याचे ॥ १ ॥

प्रभंजनाचा बसतां तडाका
सूर्यातपाचा अथवा कडाका ।
जातात मोडून सुकून किंवा
तदीय सौंदर्य टिके न तेव्हां ॥ २ ॥

वसंतीं पुष्पांची सतत बहु शोभा उपवनीं
मुखांची मर्त्यांच्या तसलि दिसते यौवनिं जनीं ।
महावातें तापें प्रखरकिरणांच्या जशिं फुलें
जरेनें रागें वा सुकतिहि तशीं वक्त्रकमलें ॥ ३ ॥

कालाच्या गतिनें निरंतर पहा तारूण्य पावे लय
एक्या वा दिवसांत रोग करितो साराहि शक्तिक्षय ।
सौंदर्य त्यजुनी नरा पळतसे गात्रें तशीं सोडिती
राहे जेथिल तेथ ऐट सगळी गुर्मीहि सोडी स्थिति ॥ ४ ॥

आर्या.

पुष्पांमध्यें मर्त्यीमध्यें अंतर परंतु जें आहे ।
श्लोकीं तें मी पुढल्या सांगतसें सावधान परिसा हे ॥५॥

श्लोक.

सोडूनी थडगें पुनः नर उठे होऊनि तेजोयुत
पुष्पांचीं स्थिति तेवि निश्चित नसे तैशीच ती राहत ।
रोगांपासुनि आणखी नर जरेपासून तो मुक्त हो
राहे आणिक चांगल्या चिर स्थितीमध्यें फुलें तें न हो ॥६॥

येवोत रोग—मरणासहि भीत नाहीं
आम्हां जरी सदय ईश्वर नित्य पाही ।
जावो लया वपु तृणासम, नष्ट होवो
तारूण्यपुष्प, भगवद्वच सत्य होवो ॥ ७ ॥

ह्या बागेच्या मध्यभागीं एक फुलांचा वर्तुलाकार ताटवा होता. त्या ताटव्यामध्यें एक अति लहान सफरजंगाचें झाड होतें. आनंदरावानें आपल्या मुलीच्या जन्मदिवशीं हें झाड लाविलें होतें. त्यास दर वर्षीं सर्वोत्कृष्ट फळें येत असत. एके वर्षीं तर त्या झाडास इतका बहर आला होता कीं, तसा पूर्वीं कधींच आला नव्हता. शांता नित्यशः पहाटेस त्या झाडाकडे येऊन पहाण्यास कधींहीं चुकली नाहीं; आणि तिला अत्यानंद होऊन तिच्या मुखांतून असे उद्गार निघत कीं, "अहाहा! हें झाड किती रमणीय म्हणून सांगूं! ह्याची शोभा पाहिली तर तहानभूक देखील नाहींशी

होते. कोणास असें वाटेल कीं हें झाड जणूं काय फुलांचा एक गुच्छच केला आहे."

एके दिवशीं सुप्रभातीं **शांता** नित्यक्रमाप्रमाणें बागेंत येऊन त्या झाडाजवळ उभी राहिली, आणि त्या झाडाकडे टक लावून पाहूं लागली; तेव्हां तिचें हृदय सद्गदित होऊन नेत्रांतून टपटपां अश्रु गाळून ती म्हणाली– "अग बाई! काय या झाडाची अवस्था ही! ह्याचीं फुलें अगदीं निस्तेज अशीं झालीं आहेत, ह्या धुक्यानें माझ्या आवडत्या फुलांचा सत्यनाश केला." हें बोलणें **आनंदरावानें** ऐकिलें व तो तीस म्हणाला, "बये, ज्याप्रमाणें धुक्याच्या योगानें ह्या पुष्पांचा नाश झाला, त्याचप्रमाणें कोणतेही अयोग्य विचार मनांत येऊन तदनुसार एकवार वागल्यास आपल्या तारूण्यावस्थेचा नाश होतो. मुली, सद्वर्तन उलंघन करण्याचा विचार कधींही मनांत आणूं नको; ह्या फुलझाडाचे फुलांचा एके वर्षी नाश झाला तरी दुसरे वर्षीं झाड पुनः पूर्ववत् फुलेल, परंतु बेटा, जर तुझें पाऊल एकवार वाईट मार्गांत पडलें तर सर्व आयुष्यभर तुझे तोंडास कालिमा लागेल आणि तें पाहून तुला हल्लीं हीं फुलें वाळल्यामुळें जो शोक होत आहे, त्याचे हजारपट मला होईल. असें झाल्यास कोणतेही गोष्टीपासून मला एक क्षणभर देखील सुख न होतां उलटें वृद्धापकाळीं अति दुःख होऊन मरण येईल." असें बोलत असतांना **आनंदरावास** गहिंवर आला, आणि त्याचें तें अमोल ममतेचें भाषण **शांतेचे** मनांत इतकें ठसलें कीं, तिनें कधींही सन्मार्गाचें उलंघन केलें नाहीं. ही गोष्ट पुढील कथाभागावरून समजेलच. **शांता** आ-

पल्या विद्वान्, शाहण्या, आणि सदयअंतःकरणाच्या पित्याच्या देखरेखीखालीं सद्धर्मी वर्तन करीत असतां बागेंतील गुलाबांचे फुलांप्रमाणें टवटवी, गुलछबूंचे वर्णाप्रमाणें निर्मल अंतःकरण, गुलनारपुष्पाप्रमाणें मर्यादा, हे सर्व गुण जसजशी ती वाढत गेली तसतसे तिच्या अंगीं दृढ होत गेले. सारांश, ईश्वरकृपेनें तिच्या अंगीं सद्गुणांची इतकी प्रेरणा झाली कीं, तिच्या सद्वर्त्तनाचा कित्ता सर्व लोकांनीं घेण्यास ती योग्य झाली. **आनंदरावास** आपला बाग पाहून अत्यानंद होई आणि त्या बागेंत जी फळफळावळ होत असे तेणेंकरून त्याच्या नित्यश्रमाचा पूर्णपणें परिहार होत असे. परंतु जेव्हां **आनंदरावाचे** मनांत असें येई कीं, मी जो हिला धर्मोपदेश केला त्याच्या योगानें व **ईश्वरकृपेनें** तीस **ईश्वराचें** ज्ञान होत चाललें आहे, तेव्हां त्यास फारच समाधान वाटे.

प्रकरण २.

शांता प्रतापरावांच्या घरीं जाते.

बहुतकरून सर्व देशांमध्यें वसंतऋतूचे दिवस फार रमणीय व सुखकारक असतात. एका कवीनें खरोखर म्हटलें आहे कीं,

"ऋतूंमध्यें हा पहिला वसंत
वाटे जनांला बहुधा पसंत।
कीं बोलती हाच सदा असावा
असें न कोणी म्हणती नसावा॥"

"उद्योगाचे घरीं ऋद्धी सिद्धी पाणी भरी" ह्या वाक्यास अनुसरून **आनंदरावानें** असा निश्चय केला कीं, एक क्षण देखील फुकट घालवायाचा नाहीं, आणि त्याप्रमाणें तो ह्या वेळेपावेतों वागत आला. आबालवृद्ध आपल्या आयुष्याच्या वेळापैकीं किती वेळ फुकट घालवितात, ह्याविषयीं विचार केला तर फारच खेद होतो. आपला जो **प्रभु** सार्वकालिक जीवनाचा दाता, ज्यानें अरण्यामध्यें हजारों लोकांचें अद्भुत रीतीनें पोषण केलें, तो त्या वेळेस काय म्हणाला त्याकडे लक्ष द्या. तो म्हणतो कीं 'बारीक चुरा देखील जमा करून घ्या म्हणजे आपणास सर्व प्राप्त होईल.' जी वेळ बहुतकरून निरुपयोगी कामामध्यें आपण खर्चितों तीच वेळ जर परोपकार करण्यांत आणि **ख्रिस्ती** धर्माचा प्रसार करण्यांत घालविली तर तें कृत्य **ईश्वरास** किती मान्य होईल बरें! **आनंदराव** कधीं आळशासारखा बसत नसे. त्याला आपलें कर्तव्यकर्म कोणतें हें पक्कें माहित होतें, म्हणून तो एक क्षण देखील फुकट घालवीत नसे. तो असें म्हणे कीं, "**ईश्वरानें** जी वेळ आपणास दिली आहे त्या वेळेपैकीं एक पळ व्यर्थ घालविलें तर **ईश्वरापाशीं** त्याचा जाब द्यावा लागेल." जेव्हां तो घरामध्यें उद्योग करीत असे तेव्हां **शांता** त्याचे जवळ बसून पवित्र शास्त्र वाची, अथवा कधीं कधीं तो तिला अजरामर आत्म्याविषयीं निरूपण करीत असे.

आनंदरावास ज्या वेळेस बागेंत काम नसे त्या वेळेस तो रिकामा न बसतां घरीं स्त्रियांकरितां करंड्या करीत बसे; व त्यांकरितां **शांता** त्यास कधीं कधीं झाडांच्या फांद्या आणून देत असे. वसंतऋतूंत एके दिवशीं प्रातःकाळीं

शांता रानामध्यें आपल्या बापाकरितां डहाळ्या जमा करीत असतां, शेजारल्या उपवनांत पुष्कळ गुलछबूचीं फुलें तिच्या दृष्टीस पडलीं. त्यांपैकीं कांहीं तोडून तिनें एक आपणाकरितां व एक **आनंदरावा**करितां असे दोन गुच्छ तयार केले; व घरीं येत असतां ज्या सरदारानें **आनंदरावास** शेतवाडी दिली होती त्या सरदाराची स्त्री **प्रियंवदा**बाई आणि तिची कन्या **मंजुळा** ह्या उभयतां तिला भेटल्या. **मंजुळा** आणि तिची आई ह्या दोघींसही **शांतेनें** पूर्वीं कधीं फारसें पाहिलें नव्हतें, कारण त्या बहुतकरून शहरामध्यें रहात असत; परंतु ह्या वेळेस त्या आपल्या बागेंतल्या बंगल्यांत रहाण्यास आल्या होत्या. **शांतेनें** या उभयतां मायलेकी आपलेकडेसच येतात असें पाहून मोठ्या मर्यादेनें ती एके बाजूस झाली, व तिनें त्यांस जाण्यास वाट दिली. त्या दोघी तिच्याजवळ आल्यावर जेव्हां त्यांनीं **शांतेच्या** हातांत निशिगंधपुष्पांचे गुच्छ पाहिले तेव्हां त्यांस अतिशय आनंद होऊन त्यांनीं **शांतेस** विचारिलें, "मुली, तेवढे गुच्छ आम्हांस विकत देतेस काय!" हें ऐकून **शांता** स्तब्ध उभी राहिली, आणि तिनें आपल्या नांवास साजेल अशा वृत्तीनें आणि हास्यवदनानें ते गुच्छ त्यांच्यापुढें केले; आणि नम्रतेनें म्हणाली—"बाईसाहेब, आपण हे दोन्ही घ्यावे, मी आपले सेवेस तत्पर आहें." **मंजुळा** म्हणाली—"ह्या फुलांचा गुच्छ करून प्रत्येक दिवशीं सकाळीं मला आणून देशील तर तुझे मजवर फार उपकार होतील." त्याप्रमाणें **शांता**—होय—म्हणून तेथून गेली, आणि त्या फुलांचा बहर होता तोंपर्यंत त्यांस गुच्छ देण्यास एक दिवसदेखील विसरली नाहीं.

असें म्हटलें आहे कीं, आपला भाग्योदय होण्यास विशेष

मोठें कारण लागतें असें नाहीं, परंतु लहानशा गोष्टीवरून देखील आपणास सुख प्राप्त होतें. हें शांतेच्या अनुभवास आलें. शांतेच्या एकंदर चरित्रामध्यें ज्या कांहीं अनेक मोठमोठाल्या गोष्टी घडून आल्या त्या सर्वांचें कारण तिची व प्रियंवदा व मंजुळा ह्यांची गांठ हेंच आहे, असें आमच्या प्रिय वाचकांच्याही ध्यानांत येईल. त्यांच्या असेंही लक्षांत येईल कीं, सर्व गोष्टींवर ईश्वराची नजर आहे, आणि जे ईश्वराचे भक्त आहेत त्यांवर किती जरी संकटें आलीं तरी ईश्वरकृपेनें त्या सर्व संकटांचें निरसन होऊन, अखेरीस त्यांचें सर्वथैव कल्याण होतें.

शांता आपल्या बोलण्याप्रमाणें प्रत्येक दिवशीं गुच्छ घेऊन बागेंतील महालीं मंजुळेकडे जात असे, व दोघी समवयस्क असल्याकारणानें, जरी शांतेप्रमाणें तिच्या ठायीं जो गुण अवश्य असलाच पाहिजे होता, तो नव्हता तरी देखील उभयतांचें दिवसानुदिवस फारच सख्य वाढत चाललें.

एकंदरींत गरीबश्रीमंत हे निरनिराळ्या कारणांनीं निरनिराळ्या स्थितीमध्यें असतात, म्हणून त्या उभयतांमध्यें अति स्नेह नसावा हें फार चांगलें. सुधारलेल्या देशांमध्यें भिन्नभाव नाहीं, परंतु तेथें देखील जर एक सद्धर्मी आणि दुसरा अधर्मी असेल, आणि जर त्या उभयतांमध्यें दिवसानुदिवस सख्य वाढत असेल, तर चांगला मनुष्य वाईट मार्गास लागण्याची भीति असते, म्हणून त्यांमध्यें अति मैत्री वाढू न देण्याविषयीं प्रयत्न करावा. नेहमी चांगल्यापेक्षां वाईट प्रबल असतें; आणि ऐहिक पदार्थांच्या योगानें मनुष्यांस जें सुख प्राप्त होतें असें वाटतें, ते पदार्थ आपल्यास प्राप्त झाले नाहींत तरी चालेल, असें मानणारा मनुष्य ह्या जगांत विरळाच.

मंजुळेचा वाढदिवस जवळ आला ह्मणून **शांतेस** वाटलें कीं, रोज मी तिला फुलांचा गुच्छ करून देत असतें त्याप्रमाणेंच वाढदिवशीं देण्यांत कांहीं विशेष नाहीं, यास्तव आपण तिला कांहीं तरी नवा पदार्थ नेऊन द्यावा. हिंवाळ्यामध्यें **आनंदरावानें** नाना तऱ्हेच्या पुष्कळ सांगशा व करंड्या केल्या होत्या, त्यांमध्यें **शांते**करितां एक अत्युत्तम करंडी करून ठेविली होती. करंडीच्या बाहेरील बाजूवर त्या गांवाचा नकाशा काढला होता आणि तें काम फारच शोभिवंत झालें होतें. ही करंडी फुलांनीं भरून **मंजुळे**च्या वाढदिवशीं तिला देण्याचा बेत **शांतेनें** केला. हा बेत **आनंदरावास**ही मान्य झाला; म्हणून त्या सुंदर करंडीवर आणखी शोभा आणण्यासाठीं त्यानें **मंजुळे**चें नांव तिच्या एके बाजूवर काढलें, आणि दुसऱ्या बाजूवर तिच्या पित्याचा शिक्का काढला. ज्या दिवशीं वाढदिवस आला त्या दिवशीं **शांतेनें** सकाळींच बागेंत जाऊन नाना तऱ्हेचीं फुलें व नाना तऱ्हेच्या झाडांचीं पानें तोडून आणून तीं सर्व त्या करंडीमध्यें अशा रीतीनें ठेविलीं कीं निरनिराळ्या फुलांचे आणि मधून मधून पानांचे रंग यांचा सुंदर मिलाफ होऊन तिकडे पाहणाऱ्याचे नेत्र स्तब्ध होऊन जावे ! एक गुलाबाच्या कळ्यांचा हार करून त्यांत मधून मधून थोडीं थोडीं पाचेचीं पानें गुंफलीं होतीं आणि **मंजुळे**चे नांवासभोंवतीं तो त्या करंडीवर लावून दिला होता. त्यामुळें या सर्व करंडीस अवर्णनीय शोभा आली होती. ती करंडी घेऊन **शांता मंजुळे**च्या महालीं गेली, आणि तिला म्हणाली, "बाईसाहेब, आपण मेहरबानी करून ह्या करंडीचा स्वीकार करावा असें माझ्या मनांत आहे; **ईश्वरानें** तुमचें सदासर्वकाळ कल्याण करावें अशी माझी त्यापाशीं

मन:पूर्वक विनंति आहे." असें म्हणून तिनें आणलेली करंडी **मंजुळे**पुढें ठेविली. त्या वेळेस **मंजुळा** आपल्या खोलीमध्यें वेणीफणी करीत होती व तिची दासी जवळ उभी होती. जेव्हां **मंजुळे**नें ती टोपली व तींतील फार चतुराईनें गुंफलेलीं मनोरम पुष्पें पाहिलीं त्या वेळेस तिला इतका आनंद झाला कीं, तो तिच्या पोटांत मावेना. **मंजुळा** ह्मणते—"अबब! किती तरी फुलें हीं! **शांते**, मला तर बाई, असें वाटतें कीं, तूं हीं इतकीं फुलें मला आणून दिलींस, आतां तुझ्या बागेमध्यें एक देखील फूल झाडांवर राहिलें नसेल, आणि खरेंच जर पुसशील तर ह्या करंडी-सारखी करंडी मीं पूर्वीं पाहिली नाहीं. चल गडे, चल आपण ही आईला नेऊन दाखवूं." **मंजुळे**नें **शांते**च्या गळ्यांत हात घालून तिला आपल्या आईकडे नेलें, व ह्मणाली—"आईग, **शांते**नें मला ही बघ सांगशी दिली आहे. हिच्यासारखी सुंदर वस्तु अजूनपर्यंत माझ्या पहा-ण्यांत आली नाहीं. मला असें वाटतें कीं तूं देखील अशी कधीं पाहिली नसशील." ती टोपली पाहून **प्रियंवदा**बाईस फार आनंद झाला, व त्या ह्मणाल्या—"**मंजुळे**, तूं म्हणतेस तें खरें आहे. हें बघ, ह्या फुलांवरचें दंव अजून जसेंच्या तसेंच आहे, त्याच्यायोगानें फुलें किती सुंदर दिसतात ह्मणून सांगूं! अशी ह्मण आहे कीं 'अस्सलापेक्षां नक्कल विशेष असते,' पण असें येथें नाहीं हो. पहा, असें चित्र कोणत्या तरी चितार्‍याच्यानें काढवेल का! हीं फुलें **शांते**नें मोठ्या चतुराईनें गुंफलीं, याबद्दल मला एवढें आश्चर्य वाटत नाहीं; पण आपणांवर जें कांहीं तिचें अप्रतिम प्रेम, त्याब-द्दल फारच आश्चर्य वाटतें!" नंतर **प्रियंवदा**बाईनीं **शांते**स

सांगितलें कीं—"मुली, तूं क्षणभर येथें बस, आह्मी इतक्यांत तिकडे जाऊन येतों;" असें ह्मणून तिनें आपल्या लेकीस आपल्या बरोबर येण्यास खूण केली. **प्रियंवदा**बाई **मंजुळे**स ह्मणाल्या,—"**मंजुळे**, सगळें खरें, पण **शांते**ला आपण त्याच्याबद्दल कांहीं तरी दिलें पाहिजे; तिला तशीच कशी जाऊं द्यावी? तिला देण्यासारखें तुजजवळ कांहीं आहे काय?" **मंजुळा** कांहीं वेळ उगीच उभी राहून एकदम ह्मणाली, "हो! हो! आई, बरें आठवलें! हें बघ, माझा काळा शालू आहे तो अगदीं नवाच आहे, मी एकदाच त्याची घडी मोडली होती बरें का, तेव्हांपासून तो मी जशाचा तसाच बांधून ठेविला आहे. त्याच्या वरच्या पदरावर कशिदा किती नामी काढला आहे पण! आणि त्यांतून मला तो फारच लहान होतो. मला वाटतें **शांते**ला तो अगदीं ठीक होईल; शिवाय ती इतकी कुशल आहे कीं तो आपल्याला शोभेल अशा रीतीनें कांहीं तरी ती अधिक काम त्यावर करील. मला वाटतें हा शालू तिच्या योग्यतेपेक्षां जास्ती नाहीं होणार." इतक्यांत **प्रियंवदा**बाई मध्येंच ह्मणाल्या, "अग हें तूं काय बोलतेस! माझ्या नाहीं हें मनास येत. अग त्यामध्यें योग्यता ती कसची, आपण नेसलों काय व ती नेसली काय, सारखेंच. आतां, एवढें मात्र पाहिलें पाहिजे कीं, आपण कोणासही एखादा पदार्थ देऊं लागलों, ह्मणजे त्यापासून घेणाऱ्याचें काम होत असेल तर आपण मागेंपुढें कधीं पाहूं नये. आणखी असें पहा कीं, हा जो तुझा शालू आहे, तो शांतेला फारच चांगला शोभेल. बरें, तें असो; आतां तूं तिकडे जाऊन फुलें न सुकतील अशा तजविजीनें ती करंडी नीट ठेव. आपल्या

घरीं आज कांहीं मंडळी येणार आहे, त्यांना ती करंडी फुलांसुद्धां दाखवावी असें माझ्या मनांत आहे, आणखी जेव्हां ती ते पहातील तेव्हां त्यांस किती आनंद होईल ह्मणून सांगूं! आपण जेवायाला बसलों ह्मणजे ती करंडी पंक्तींत ठेवूं, ह्मणजे त्या फुलांचा वासही सुटेल व शोभाही येईल." नंतर **शांते**जवळ येऊन त्या ह्मणाल्या, "**शांते**, **मंजुळे**ला तूं ही आणून दिलीस ह्मणून तिला फारच आनंद झाला आहे, व **शांते**ची मी कशी उतराई होईन कोण जाणे, अशी काळजी तिला पडली आहे." **मंजुळा शांते**ला घेऊन त्वरित आपल्या खोलींत गेली, आणि दासीला तो शालू आणावयास सांगितला. त्या दासीचें नांव **चिमाऊ** होतें. ती लागलीच ह्मणाली,—" बाईसाहेब, आपल्या मनांतून तो आज नेसावयाचा आहे वाटतें ? " **मंजुळे**नें उत्तर केलें, "छे ग, ही माझी मैत्रीण **शांता** बसली आहे, तिला हा द्यावा असें माझ्या मनांत आहे." "काय ह्मणतां बाईसाहेब! हा शालू ह्या मुलीस देण्याचें ह्मणतां! पण आईसाहेबांस विचारिलें काय ? " हें ऐकून **मंजुळा** रागावून ह्मणते, "कायग चिमाऊ! तुला इतकी पंचाईत कशाला पाहिजे? तुला सांगितलें कीं तो शालू इकडे आण, तो नुसता आणून द्यायचा, तें सोडून देऊन किती बोलतेस! मला नाहीं असलें आवडायाचें, जा कशी, तो लवकर इकडे घेऊन ये."

चिमाऊला अतिशय राग आला. ती कोणाच्या नजरेस येऊं नये ह्मणून ती तेथें उभी न रहातां झट्कन् संतापतच पेटीजवळ निघून गेली; तेथें धाडदिशी पेटी उघडून बासनांतून **मंजुळे**चा शालू काढून घेऊन गेली, आणि आपल्या मनांत ह्मणाली, "जळो हा शालू एकदाचा!

ह्या कारटीनें पहा माझ्या बाईसाहेबांस कसें भुरळ घातलें आहे तें! केव्हां एकदा मेलीचे डोळे फुटतील कोण जाणे! ही अवदसा येथें कशी आली कोणास ठाऊक, पण मी तिचा सूड घेतल्यावांचून रहातें काय!"

वाचकहो, ह्या शब्दांवरून आपणच ही **चिमाऊ** किती दुष्टमनाची असावी ह्याची कल्पना करा. खरोखर पाहूं गेलें असतां शांतेला शालू मिळाला ह्मणून **चिमाऊला** आनंद व्हावा, पण तो होईल कोठून? कारण जन्मापासून धर्मसंबंधी एकही शब्द तिच्या कानावर आला नव्हता, व दयार्द्रबुद्धि ह्मणजे काय ती तिच्या स्वप्नीं देखील नव्हती. **चिमाऊनें** आपला राग आवरून धरून प्रफुल्लित मुद्रेनें तो शालू **मंजुळे**पुढें आणून ठेविला. **मंजुळा** ह्मणते,—"**शां-ता**बाई मला आज बाहेरून पुष्कळ भेटी आल्या, पण तुझ्या-सारखी बाई एक देखील भेट त्यांमध्यें नाहीं. तुझी मजवर किती ममता आहे म्हणून सांगूं! पण, हें बघ, जशी तुझी मजवर ममता आहे, तशी माझीही पण तुजवर आहे, हें समजावें कशावरून? तर, गडे, हा एवढा शालू तूं घे, म्हणजे मी पक्कें समजेन कीं, तुझी मजवर ममता आहे; घे तर, नाहीं म्हणूंच नकोस. आणखी तूं आपल्या बाबाला जाऊन सांग कीं, मीं त्यांना फार फार पुसलें आहे." **शांता** तो शालू घेऊन **मंजुळेस** प्रेमालिंगन देऊन महा-लांतून निघून गेली.

चिमाऊ मंजुळेची फुलांची वेणी तयार करीत असतां मोठी संतापून गेली होती, व मत्सरानें तिच्यावर पूर्ण अमल बसविला होता. "**चिमाऊ**, तुला राग का आला!" असें तिची चमत्कारिक मुद्रा पाहून **मंजुळेनें** विचारिलें.

त्याजवर **चिमाऊ** उत्तर करते, "बाईसाहिब, राग कशासाठीं ? तुह्मीं त्या मुलीला शालू दिला, त्यांत तुह्मीं आपलें भलेपण दाखविलें, आणि मला राग काय ह्मणून ?" मंजुळा ह्मणते, "हे शब्द किती शहाणपणाचे आहेत! **ईश्वर** करो, आणि तुझ्या मनामध्यें नेहमी असेच चांगले विचार येवोत. मग मला किती आनंद होईल बरें !"

शांता तो शालू घेऊन आनंदानें घरीं धावत गेली; परंतु तो शालू पाहून **आनंदरावास** अगदीं बरें वाटलें नाहीं. जो मनुष्य बाहेरील शरीराच्या शोभेविषयीं फारसा विचार न करितां अंतरात्म्याच्या भूषणाकडे लक्ष लावीत असतो, त्याच्या मनास डामडौल, अथवा उंची पोशाग व दागदागिने हे मुळींच येत नाहींत. तो शालू पाहून **आनंदराव** म्हणतो, "बेटा, जर ती करंडी तूं त्या महालीं नेली नसतीस, तर फार चांगलें झालें असतें, कारण तूं असें पहा कीं, ह्या शालूचें मोल, ज्यांस आपण मान देतो त्यांपासून तो बक्षीस मिळाला आहे, एवढ्यावरूनच करायाचें; ह्याशिवाय तूं हें बक्षीस घेतलेंस म्हणून दुसऱ्यांच्या मनांत मत्सर उत्पन्न होण्याजोगा आहे, ह्मणून तूं असें कर कीं, आज जो शालू आणला आहेस तो ठेवून घे, पण संभाळ हो, ह्यापासून आपला जीव धोक्यांत घालून घेऊं नकोस. मुली, तूं एवढें लक्षांत ठेव कीं विनय आणि सद्वर्तन या दोन गोष्टींपासून मनुष्यमात्रास जें भूषण प्राप्त होतें, तें उत्तम वस्त्रालंकारांनीं कधींही प्राप्त होत नाहीं, 'तर जो नम्र व शांत आत्मा देवास फार मोलवान वाटतो' ह्या शास्त्रवाक्याकडे नेहमी तूं लक्ष देशील तर तुझें सर्वथैव कल्याण होईल, ह्यांत कांहींच संदेह नाहीं."

प्रिय तरुण स्त्रीवाचकहो, अलंकारांची व भूषणांची तुह्मांला आवड नसावी. ज्या स्थितीमध्यें तुम्हांस **ईश्वरानें** ठेविलें असेल, त्या स्थितीस योग्य असा पोशाग तुम्हीं करावा, हें **ईश्वरास** मान्य आहे, आणि तेणेंकरून तुम्हांस चहूंकडे मानमान्यताही मिळेल.

कित्येक तरुण गृहस्थ ह्या पोशागाच्या नादीं लागून सद्धर्मवर्त्तनास मुकले आहेत, एवढेंच नव्हे पण धर्माचा बाणा बाळगणाऱ्या बहुत पुरुषांची विश्वासरूप नौका ह्याच खडकावर फुटली आहे !

प्रकरण ३.

हिऱ्याची आंगठी नाहींशी होते.

शांता महाल सोडून गेली नाहीं तोंच असें समजलें कीं **प्रियंवदा**बाईची हिऱ्याची आंगठी मेजावर होती ती नाहींशी झाली. ज्या वेळेस ती नाहींशी झाली असावी असें सर्वांस वाटलें त्या वेळेस **शांते**शिवाय दुसरें कोणी खोलींत गेलें नव्हतें, ह्मणून सहजच सर्वांस **शांते**चा वहीम आला. ही चोरीची बातमी कोणास फारशी समजली नाहीं तोंच आपण **शांते**कडे जाऊन तिची समजूत घालून ती तिच्यापासून परत आणावी असा विचार करून **मंजुळा** लागलीच मोठ्या त्वरेनें **शांते**कडे जावयास निघाली.

आपल्या पित्यास तो शालू दाखविल्यानंतर, **शांता** तो नीटनेटका करून त्याची घडी घालून ठेवीत आहे तोंच **मंजुळा** तेथें जाऊन पोंचली, व **शांता** तिच्याकडे पहाते

तों ती घाबरल्यासारखी तिला दिसली; इतकेंच नाहीं, तिचें तोंड अगदीं उतरून गेलें आहे, व तिच्या तोंडांतून शब्द देखील निघत नाहीं, अशा स्थितींत **मंजुळेला** पाहून **शांतेस** फार आश्चर्य वाटलें. तिनें **मंजुळेला** इतक्या तांतडीनें आपल्याकडे येण्याचें व घाबरून जाण्याचें कारण विचारिलें. तेव्हां **मंजुळा** घाबऱ्या घाबऱ्या म्हणाली, "**शांता,** अग **शांता** ! तूं वेड्यासारखी बसलीस काय ? अग, घरीं बघ केवढा अनर्थ गुजरला आहे ! माझ्या आईची आंगठी सांपडत नाहीं, शिवाय ज्या खोलींत ती ठेवलेली होती तींत तुझ्यावांचून दुसरें कोणी गेलें नव्हतें, ह्मणून पुष्कळांचें ह्मणणें आहे कीं **शांतेशिवाय** ही आंगठी गेली नाहीं; **शांता** बाई, मी सांगतें तें ऐक. ती आंगठी लवकर दे पाहूं कशी ती, ह्मणजे कोणी तुला बोलायचें नाहीं." हे शब्द ऐकून **शांतेची** काय स्थिति झाली ह्मणून सांगावी ! ती एकदम घाबरली, तिचें तोंड खरकन् उतरून गेलें आणि मूर्छा येऊन ती प्रेतवत् पडली. कांहीं वेळानें जराशी शुद्धीवर येऊन ती म्हणाली—"**मंजुळा**बाई, खरें पुसाल तर तुमची आंगठी कशी होती ती मीं पाहिली सुद्धां नाहीं; शिवाय, मी तुमच्या महालीं आलें तेव्हां ज्या एका जाग्यावर बसलें होतें तेथून पाय देखील मीं हलवला नाहीं."

याप्रमाणें **शांतेनें** किती जरी निक्षून सांगितलें तरी **मंजुळेची** खातरी होईना, म्हणून ती तिच्याजवळ आंगठी देच असें म्हणूं लागली. ती ह्मणाली " ती आंगठी अडीच हजार रुपयांच्या किंमतीची आहे, कांहीं लहान सहान नव्हे; मला वाटतें कीं ती आंगठी तूंच घेतली असावीस. नाहीं ह्मणूं नको, दे पाहूं कशी ती !" हे शब्द ऐकून **शांता**

ढळढळां रडूं लागली व म्हणाली, "मीं ती आंगठी कशी ती पाहिली देखील नाहीं. आजपर्यंत कोणाच्या वस्तूस मीं हात कधींही लावला नाहीं; शिवाय, मंजुळाबाई, मी आपल्यास खरें सांगतें कीं चोरी करण्याची कल्पना देखील माझ्या मनांत आली नाहीं, कारण माझा बाबा मला नेहमी सद्वर्त्तनाच्या गोष्टी सांगत असतो, आणि मी त्याप्रमाणें वागण्यास झटत असतें." इतक्यांत, शांतेच्या वृद्ध पित्यानें मंजुळेस धावत येतांना बागेंतून पाहिलें होतें, व शांतेच्या रडण्याचा स्वर जेव्हां त्यानें ऐकला तेव्हां कांहीं तरी कम-जास्ती आहे असें समजून तो तेथें आला, आणि सर्व हकी-कत जेव्हां त्याच्या कानीं आली तेव्हां त्यालाही मूर्छा येऊन तो पट्कन् खालीं बसला. कांहीं वेळानें शुद्धीवर येऊन तो म्हणाला, "शांते, इतक्या किमतीची वस्तु चोरणारा ह्या देशांतील कायद्याप्रमाणें देहांत शिक्षेस पात्र आहे. ईश्वरानें मनुष्यमात्रास 'चोरी करूं नको,' अशी जी आज्ञा केली आहे ती तूं विसरलीस काय? अशा गोष्टीच्या योगानें फक्त मनुष्यास केवळ तुला जाब द्यावा लागेल, एवढेंच नाहीं, तर ज्यास आपल्या मनांत काय आहे हें सर्व समजतें अशा सर्वनियंत्या परमेश्वराजवळ आपण एखादा अपराध करून, केला नाहीं असें ह्मटलें, तर कधीं तरी चालेल का? त्याच्या समोर तुला काय जाब द्यावा लागेल ह्याचा पुरता विचार कर. अग, मीं जो तुला आजपर्यंत सद्वर्त्त-नाविषयीं बोध केला, त्याचें हेंच का फळ? तूं माझ्या ह्या सद्वर्त्तनांत पांढऱ्या झालेल्या केसांस काळोखी का आणणार? सोन्याचें व हिऱ्याचें तेज पाहून भुललीस काय? तर नाहीं म्हणूं नको; त्यांची आंगठी त्यांस परत कर, म्हणजे सर्व

ठीक होईल." हे शब्द ऐकून **शांता** आपल्या वृद्ध पित्याच्या तोंडाकडे पाहून डोळ्यावाटें अश्रु गाळून स्फुंदून स्फुंदून म्हणाली, "बाबा, मी खरोखर सांगतें माझ्या बोलण्यावर तुम्ही विश्वास ठेवा, माझ्या हातून अशा प्रकारची गोष्ट कधींही घडावयाची नाहीं, आणि जर कदाचित् वाटेनें चालत असतां अशा प्रकारची वस्तु एखाद्या वेळेस माझ्या नजरेस पडली असती तर मी ज्याची त्यास ती दिल्यावांचून कधींही रहातें ना. मी तुम्हांस खास सांगतें कीं अशी गोष्ट माझ्या हातून कालत्रयीं देखील घडणार नाहीं." तेव्हां पुनः तिचा पिता म्हणाला, "**शांते**, विचार कर, आणि जें कांहीं असेल तें खरें सांग. पहा, त्या लहान बाईसाहेब येथें उभ्या आहेत; त्यांच्या मुद्रेवरून असें दिसतें कीं तुझेविषयीं त्यांचे मनांत प्रेम असून तुझ्यावर त्यांची दया आहे. तर तूं खरें सांग म्हणजे तुला न्यायाधिशाच्या कचेरीची पायरी चढावी लागणार नाहीं." तेव्हां **शांता** म्हणाली, "बाबा, माझ्या बोलण्यावर तुमचा विश्वासच नाहीं असें कां म्हणाना? मीं आजपर्यंत कोणाच्या काडीला देखील हात लावला नाहीं; आणि अशी एवढ्या किमतीची वस्तु, बाबा, ही तुमची दुर्दैवी **शांता** चोरील काय हो!" **आनंदराव** म्हणतो—"माझे आतां किती दिवस राहिले आहेत याचा विचार कर. माझे काय आतां दहा गेलेन् पांच राहिले, माझे केस पहा कसे पांढरे होऊन गेले आहेत, मला जे कांहीं चार दिवस जगामध्यें काढावयाचे आहेत, तेवढ्यामध्यें माझें मन दुखवूं नको, आणि माझ्या तोंडास काळोखी लावूं नकोस; व आपलेही नांवास बट्टा लावून घेऊं नकोस. मुली, जो सर्वसाक्षी **परमेश्वर** त्याला स्मरून काय तें खरें सांग.

पहा, चोरास देवाचे घरीं जागा मिळत नाहीं." **शांतेनें** आपले अश्रुभरित डोळे आकाशाकडे केले व मी निष्कलंक असून माझ्या हातून कोणताही अपराध झाला नाहीं–**अशी** तिनें आपल्या बापाची खातरी केली. त्यावर तो म्हणाला–"बेटा, तुझ्या शब्दावर माझा पूर्ण विश्वास आहे, कारण **ईश्वरा**समक्ष, माझ्यासमोर, व या लहान बाईसाहेबांच्या समोर तुझ्यानें कधींच खोटें बोलवणार नाहीं. तुझ्या हातून अशी कोणत्याही प्रकारची गोष्ट घडली नाहीं अशी माझी पक्की खातरी आहे म्हणून तुला कोणत्याही गोष्टीची भीति बाळगण्याचें कारण नाहीं. ज्यामुळें कसाही बलवान् मनुष्य असला तरी भिऊन त्याची गाळण होते, असें पापासारखें भीतिदायक दुसरें कांहीं नाहीं. कारागृह आणि मृत्यु ह्यांची देखील त्याच्यासारखी भीति नाहीं. परम दयाळु **परमेश्वरानें** आपले भक्तांस असें म्हटलें आहे कीं 'तुझें नीतिमत्त्व प्रकाशासारखें व तुझें न्यायीवर्त्तन मध्यान्हाप्रमाणें स्वच्छ करीन.' तर ह्या वचनावर भरंवसा ठेवून जें कांहीं संकट प्राप्त होईल तें सहन कर, त्यांतून **ईश्वर**कृपेनें तूं पार पडशील." **मंजुळा** म्हणते–"बाबा तुमचें हें बोलणें ऐकून मला देखील खरेंच असें वाटतें कीं ती आंगठी **शांतेनें** पाहिली देखील नसावी; पण मी सांगतें इकडे जरासें लक्ष द्या. माझ्या आईनें जेथें ही आंगठी ठेवली होती ती जागा तिच्या पक्की ध्यानांत आहे; आणखी तेथें **शांते**खेरीज दुसरें कोणी गेलें नाहीं, तर ती कोणीं घेतली हें तुह्मींच सांगा बरें, पाहूं." **आनंदराव** म्हणतो, "तें माझ्या शक्तीबाहेर आहे." नंतर तो **ईश्वरा**स विनवतो, "हे **प्रभो**! दीनदयाळा, आम्ही गरीब, आम्ही अर्भक, आमच्या परीक्षेची ही वेळ आहे, तर

देवा, तूं आम्हांवर कृपा कर व जीं संकटें आम्हांवर गुदरतील तीं सोसण्यास आम्हांस धैर्य दे." **मंजुळा** म्हणते, "असो, आतां जशी मी कष्टानें आलें तसेंच मला परत जावें लागत आहे. **आनंदराव**, आज माझा वाढदिवस फार दु:खाचा आहे ! ही आंगठी माझ्या जन्मदिवशीं बाबानें आईला घालण्याकरितां दिली, आणि तेव्हांपासून आजपर्यंत माझ्या वाढदिवशीं तिच्या हातांत कधीं म्हणजे ती आंगठी नाहीं असें झालें नाहीं. तर ती असें समजत असेल कीं आंगठी घेतल्याशिवाय मी कधीं परत येणार नाहीं, कारण तिला तर आज आंगठी घातलीच पाहिजे. बाबा घरीं आले आणि त्यांनीं विचारलें कीं "हातांत आंगठी कां नाहीं?" तर आईनें त्यांस काय बरें सांगावें? बरें, तें असो, पण ही गोष्ट आईनें मला मात्र सांगितली, व ती तिसऱ्याच्या कानास देखील ठाऊक नाहीं. काय असेल तें असो, **ईश्वराला** डोळे आहेत, तो सर्व पहातो आहे ! मी आतां येथून जातें, आणि माझ्यानें होईल तितकें करून **शांतेच्या** अंगावर कांहीं येणार नाहीं, अशी तजवीज करीन, पण माझें बोलणें ऐकेल तरी कोण? ह्यांतला एक शब्द तरी कोणाला खरा वाटेल का? काय होईल तें होवो, आपणाकडून होईल तितकें करावें, मग शेवटीं देवाची इच्छा असेल तसें होईल." असें बोलून रडतरडतच ती घरीं जाण्यास निघाली. **आनंदराव** उठून बसला, आणि आपल्या मस्तकास हात लावून जमिनीकडे टक लावून पहात असतां त्याच्या नेत्रांतून अश्रुधारा चालल्या; इतक्यांत **शांतेनें** त्याचे पाय घट्ट धरून पायांवर डोकें ठेविलें व म्हणाली, "बाबा, ईश्वरसाक्ष मी सांगतें कीं ही गोष्ट काय आहे आणि कशी

झाली हें मला कांहींच कळत नाहीं." आनंदरावानें आपलें डोकें वर केलें आणि शांतेचे मुद्रेकडे बराच वेळ टक लावून म्हणतो—"बेटा, तुझ्या एकंदर मुद्रेवरून असें दिसतें कीं तूं पापभीरू आहेस; तुझ्या हातून हें कर्म घडलें नाहीं, कारण जीं माणसें पापभीरू असतात, त्यांच्या हातून सहसा निंद्य कर्म होत नाहीं."

शांता ह्मणते—"बाबा, आतां कोणचीं संकटें आपणाकरितां वाढून ठेविलीं आहेत! आपली स्थिति काय होणार कांहीं कळत नाहीं. हे देवा! मला किती जरी दुःख सोसावें लागलें तरी मागेंपुढें न पहातां मोठ्या आनंदानें मी सहन करीन; पण बाबा, माझ्याकरितां वृद्धापकाळीं तुह्मांस दुःख भोगावें लागेल, हें मनांत आलें ह्मणजे हातपाय गळून जातात, छाती आतां फुटून जाईल कीं काय असें वाटतें. अहाहा! दीनदयाळु प्रभु! सर्व भक्तांची लाज तुला आहे, आह्मीं दीनांनीं काय करावयाचें आहे! तर ईश्वरा, माझें हात जोडून एवढेंच मागणें आहे कीं माझ्याकरितां माझ्या बाबास कोणतेही प्रकारचें दुःख होऊं नये ह्मणजे मी कृतकृत्य झालें." अशी शांतेची स्थिति पाहून आनंदरावानें तिला पोटाशीं धरलें आणि ह्मणाला, "बये, उगीच निरर्थक आपल्याला कां वाईट वाटूं देतेस? ज्या ईश्वरानें इच्छामात्रेंकरून जग निर्माण केलें, आणि ज्याच्या हुकुमाशिवाय झाडाचें पान देखील हालत नाहीं, असा जो दीनदयाळ त्यावर पूर्ण भरंवसा ठेव; ह्मणजे बेटा, तुला कांहीं कमी पडणार नाहीं, एवढेंच नव्हे, परंतु, फार काय सांगूं! तुझ्या केसाला देखील धक्का लागणार नाहीं. जे जे काय म्हणून प्रकार घडून येतात, ते त्याच्या इच्छेनुसार येतात, तर ते

आपणास हितावह असलेच पाहिजेत; ह्या कारणास्तव तुला भिण्याचें कांहीं कारण दिसत नाहीं. आतां एवढेंच कर कीं कशाची भीति न बाळगतां जी खरी गोष्ट झाली असेल, ती सांग. संभाळ हो, ते तुला मधकी देतील, न जाणो कदाचित् तुला कांहीं देऊं करतील, तर तिकडे लक्ष न देतां खऱ्याचा त्याग करूं नको, आणि मनाला वाईट वाटूं देऊं नको. आपलें मन जर निष्कलंक आहे तर कारागृहामध्यें देखील आपणास अगदीं वाईट वाटणार नाहीं. तुझ्यावर अपराधाची शाबिती झाल्यास आपली ताडातोड तर होणारच, व असें झालें म्हणजे तुझ्याजवळ तुला चार गोष्टी सांगण्यास मी नाहीं, तर सर्व जग व्यापून राहणारा जो आपला पिता, ज्याच्या इच्छामात्रेंकरून सर्व जग चाललें आहे, त्याला नेहमी अंत:करणामध्यें ठेव, म्हणजे तो तुझ्या सर्व दु:खांचा परिहार करील. निरुपद्रवी मनुष्यास त्याचा आश्रय असतो, तो कोणाच्यानें देखील नाहींसा करवणार नाहीं."

दोघांचें असें संभाषण चाललें असतां बाहेर थोडीशी गडबड झाली. इतक्यांत दार उघडून आंत एक सरकारचा नाईक आला. त्याच्या मागें पोलीस शिपाई होते. हे काळस्वरूपी पुरुष पाहून, शांतेच्या पोटांत एकदम धस्स झालें, आणि भीतीनें तिनें मोठ्यानें किंकाळी फोडली, आणि चट्कन् बापाच्या गळ्यास मिठी घातली. हें पाहून त्या कामदारानें रागानें आपले डोळे लाल केले आणि मोठ्यानें ओरडून ह्मणाला, "पहातां काय, ओढा त्या कारटीला एकीकडे—त्या म्हाताऱ्याला पहाऱ्यांत ठेवा, आणि सर्व बागेमध्यें व घरामध्यें जिकडे तिकडे पाहरे ठेवा.

ह्यांचा आतांच झाडा घ्या; व झाडा चालू आहे तोंपर्यंत कोणासही इकडे तिकडे फिरूं देऊं नका."

शांतेनें आनंदरावाच्या गळ्यास घट्ट मिठी मारली असतां त्या शिपायांनीं नायकाच्या हुकमावरून तिला आनंदरावापासून ओढून घेतलें, आणि तिच्या हातांत बेड्या घातल्या. लागलीच तिला मूर्छा आली, परंतु ते तिला तशीच घेऊन चालले.

ते तिला व तिच्या वृद्ध पित्याला रस्त्यामधून कैद करून नेत असतां, त्यांस पहाण्यास पुष्कळ लोक जमा झाले. आंगठी चोरीस गेल्याची खबर कर्णोपकर्णी जिकडे तिकडे पसरली होती, आणि जणूं काय आनंदरावाचे घरास आगच लागली आहे, व ती पहाण्याकरितां हजारों लोक येत आहेत असें भासलें. निरनिराळे लोकांचे निरनिराळे अभिप्राय पडले. जरी शांतेनें व आनंदरावानें लोकांवर उपकार केले होते, तरी त्यांपैकीं कित्येक लोक इतके वाईट बोलूं लागले कीं ते शब्द कानानें ऐकवणार नाहींत.

हीं उभयतां श्रम व काटकसर करून आपला संसार सुखानें करीत, तें कित्येकांच्या डोळ्यांत सलत होतें. कित्येक लोक असें ह्मणूं लागले कीं:—"असले पदार्थ ह्यांस कोठून मिळतात ह्याची आपणास आजपर्यंत मोठी शंका होती, परंतु त्या शंकेचें निवारण आज आपोआप झालें. अशा रीतीनें पैसा मिळवून शेजाऱ्यापाजाऱ्यांपेक्षां अधिक ठाकठिकीनें राहिलें, तर त्यामध्यें कांहीं विशेष आहे असें नाहीं." तरी बहुतेक मनुष्यें आनंदराव व शांता ह्यांस अनुकूल भाषण करीत होतीं. कोणी ह्मणाले, "मनुष्याचे हातून चूक होण्याचा संभव आहे हें खरें, तथापि आनंदरावाच्या

हातून किंवा शांतेच्या हातून असें कांहीं कृत्य घडेल, असें कोणास वाटलें होतें !" दुसरे ह्मणाले, "कोण जाणे बोवा ! जसें आपणास हल्लीं वाटत आहे, तसें झालें नसेल. ईश्वर करो—आणि न्यायाधिशापुढें तीं निरपराधी ठरोत." जिकडे तिकडे मुलांचे थवेच्चे थवे उभे राहून रडत आहेत, व एकमेकांस ह्मणत आहेत, "अहाहा देवा! आमचे शांतेवर प्रसंग गुजरला तर आम्हांस फुलें व फळें कोण देईल बरें !"

कोणतेही प्रकारचें संकट प्राणिमात्रावर येवो, त्याविषयीं कोणास तरी कळवळा येणार नाहीं असें होत नाहीं; परंतु बहुतकरून मनुष्याचें मन इतकें दुष्ट आहे कीं संकटांत पडलेल्या मनुष्यास मदत करण्यास कोणीही पुढें येत नाहीं, व एखाद्याबद्दल वाईट कानांवर आलें कीं त्याविषयीं तपास केल्याशिवाय तें खरें मानितात. अशी म्हण आहे कीं "घर फिरलें म्हणजे घराचे वांसे देखील फिरतात," त्याप्रमाणें आनंदरावाची व शांतेची स्थिति झाली. असो, प्रिय वाचकहो, तुम्ही असें लक्षांत आणा कीं, नीतीनें वर्त्तन करीत असतां मनुष्यावर जर संकटें आलीं, तर त्या संकटांतून पार पाडण्यास आपला जो खरा सखा ईश्वर तो सदासर्वकाळ पाठीशीं उभा आहेच. तो 'भावापेक्षांही प्रिय सखा आहे.'

प्रकरण ४.

शांतेस बंदीखान्यांत ठेवितात.

शांता बेशुद्ध असतांच तिला बंदीखान्यांत नेलें. जेव्हां ती शुद्धीवर आली, तेव्हां ती मोठ्यानें रडूं लागली. तिच्यानें

एक शब्द देखील बोलवत नव्हता, तरी तिनें आपलें कर-द्वय जोडून मोठ्या लीनतेनें ईश्वराचा धावा केला. सरतें शेवटीं ती दुःखानें श्रांत झाली, व रडून रडून तिचे डोळे अगदीं सुजून गेले. चैन पडेनासें झालें, तेव्हां शेजारीं एक रकटें पडलें होतें, त्यावर तिनें जरा डोकें टेकलें तोंच तिला गाढ झोंप लागली. ती जागी होऊन पहाते तों सूर्याचा प्रकाश कोठें दिसत नाहींसा होऊन चहूंकडे अंधार पडला आहे. त्या वेळेस त्या तुरुंगाची कालमूर्तीच तिच्या डोळ्यांपुढें उभी राहिली. त्या काळोखामुळें त्या खोलींत तिला कांहींएक दिसेना, व मी कोठें आहे हेंही तिला लव-कर कळेना. तिला असें वाटलें कीं मी आपल्या नेहमीच्या खोलीमध्यें असून हा आंगठीचा सर्व प्रकार स्वप्नच तर पडलें नसेल ना ! हा विचार तिचे मनांत आला नाहीं तोंच ती एकदम दचकून म्हणते, "अग बाई ! हें काय ! माझे हात जखडल्यासारखे लागतात, खचित माझे हातांमध्यें बेड्या घातल्या आहेत !" नंतर तिनें ईश्वरास नमन करून म्हटलें, "अग आई ! मी अबला, आणि त्यांतून अल्पवयी; अशा स्थितीमध्यें मीं काय करावें ! असो, आपला सर्वांचा जो त्राता व अर्भकांकडे जो कधीं दुर्लक्ष करीत नाहीं त्याच्यावरच पूर्ण भरंवसा ठेवून स्वस्थ बसावें." असा विचार मनांत आल्यावर लागलीच तिनें ईश्वराची प्रार्थना करण्यास प्रारंभ केला. ती म्हणाली, "ईश्वरा माझें कल्याण कर; परंतु माझ्या वृद्ध पित्यावर कोणत्याही प्रकारचें संकट येऊं न देतां, त्याला सुखरूप ठेव, एवढेंच मज दीनाचें तुजज-वळ मागणें आहे." बापाची गोष्ट मनांत आल्याबरोबर शांतेची काय अवस्था झाली म्हणून सांगावी ! तिच्या डोळ्यां-

तून पाण्याच्या धारा चालल्या, दुःख आणि शोक ह्यांनीं तिला पुर्ती ग्रस्त करून टाकली, तिचा कंठ दाटून आला, तोंडावाटें एक शब्द देखील निघेना. अशा स्थितीमध्यें बराच वेळ निघून गेला. एवढा वेळपर्यंत चंद्र आच्छादित असल्या कारणानें चांदणें पडलें नव्हतें. परंतु आतां आकाश निरभ्र झालें व शांतेच्या खोलीला लोखंडी जाळी होती त्यामुळें खोलींत थोडेंबहुत दिसूं लागलें; तेव्हां एका मागून एक त्या काळरूपी तुरुंगांतील भयंकर देखावा तिच्या आपोआप दृष्टीस पडला. त्या अरुंद खोलीच्या सर्व भिंती तांबड्या विटांच्या बांधलेल्या असून चुन्यामध्यें बसविलेल्या होत्या. एका भिंतीजवळ एक लहानसा ओटा बांधलेला असून शेजारच्या अंगास दोन मातीचीं परळें व एक तरट तिच्या दृष्टीस पडलें. इतका वेळ काळोखांत बसून तिला फार कंटाळा आला होता, म्हणून चांदणें पडल्यानें तिच्या मनाला जरा बरें वाटलें; व आश्चर्यभरित होऊन ती ह्मणते, "अग बाई, हें काय हें! असल्या ह्या भयाण जाग्यामध्यें हा फुलांचा गोड वास कोठून येत आहे!" वाचकहो, ज्या दिवशीं आपल्या शांतेवर असा प्रसंग येऊन गुजरला त्या दिवशीं सकाळीं तिनें कांहीं रमणीय पुष्पांच्या कळ्या तोडून त्यांचा गुच्छ तयार केला होता. तो गुच्छ त्या करंडीमध्यें घातल्यानंतर बाकी जीं फुलें राहिलीं होतीं तीं तिनें आपल्या वेणीमध्यें घातलीं होतीं, त्यांचा हा सुगंध चहूंकडे पसरला होता. ती फुलांची वेणी तिनें आपल्या डोक्यांतून काढून आपल्या पुढें ठेविली, आणि आपणाशींच म्हणते, "काय तरी चमत्कार! आज सकाळीं मीं बागेंत हीं फुलें तोडलीं, तेव्हां मला अशी स्थिति प्राप्त होईल हें

माझ्या स्वप्नांत तरी आलें होतें का! आणि मीं ह्या सुंदर पुष्पांची वेणी जेव्हां खोप्यांत घातली, तेव्हां आज मजवर असा प्रसंग येईल व हातांत लोखंडी बेड्या पडतील असें कोणास तरी वाटलें असेल काय!"

ह्यावरून असें समजावें कीं ज्याप्रमाणें इहलोकच्या सर्व पदार्थांची स्थिति कोणत्या वेळेस कशी होईल ह्याचा कांहीं भरंवसा नाहीं. तद्वत्च मनुष्यमात्राची स्थिति काय होईल याचा नेम नाहीं. कोणी एखादा गरीब स्वभावाचा मनुष्य चांगल्या रीतीनें वर्त्तन करीत असतांही, त्याच्या जीवावर कोणते वेळेस कशीं संकटें येतील ह्याचा कांहीं विचार करवत नाहीं. ह्यासाठीं सर्व शक्तिमान् जो **परमेश्वर** त्यानें आपला संभाळ करावा म्हणून सदासर्वकाळ आपण त्याची प्रार्थना केली पाहिजे, व आमचें बरेंवाईट होणें त्याचेच इच्छेवर आहे, असें समजून त्याच्याकडे आपलें मन लावलें पाहिजे. हे विचार चालले असतां तिचें अंतःकरण सद्गदित होऊन तिच्या नेत्रांतून अश्रुबिंदु टपटप् त्या फुलांवर पडले, व चांदण्याच्या प्रकाशानें, सकाळचे प्रहरीं सुंदर पुष्पांवर दंवबिंदु मौक्तिकवत् भासतात, त्याप्रमाणेंच ते दिसूं लागले. त्या वेळेस तिचे तोंडांतून जे शब्द निघाले त्या शब्दांकडे पुरतें लक्ष द्या. ती ह्मणाली, "जो **परमेश्वर** दयार्द्र दृष्टीनें पाऊस व दंव पाडून सर्व फुलांस शोभा आणितो तो दयावंत **पिता** आम्हांस विसरेल काय! छेग बाई! असें कधींच व्हावयाचें नाहीं!" इतक्यांत बापाचें स्मरण होऊन ती फारच गहिंवरून ह्मणाली, "बाबा! ही वेणी पुढें पडली आहे, हिच्याविषयीं ज्या वेळेस माझ्या मनांत कल्पना आली त्या वेळेस तुह्मीं फुलांस उद्देशून मला जो अनुपम सदुप-

देश केला, तो माझ्या डोळ्यांपुढें सर्व उभा आहे. हींच फुलें कांब्यांमधून म्यां तोडून घेतलीं आणि त्यांपासूनच मला आतां सुख होत आहे; त्याचप्रमाणें जी मी आतां ह्या संकटावस्थेंत आहें त्या मला त्याच संकटांमधून ईश्वर-कृपेनें सुख प्राप्त होईल. ह्याच पुष्पांच्या पाकळ्या उमल-वण्यास कोणी अकालिक प्रयत्न केला असता, तर त्यांची फारच वाईट दशा झाली असती. ह्यावरून अशी कल्पना होते कीं, ईश्वरानें आपल्या नाजूक व कोमल बोटानें हीं पुष्पें उमललीं आहेत, आणि तीं उमलल्यानंतर त्यांच्यावर आपला सुगंधरूपी श्वासोच्छ्वास टाकला आहे, तेणेंकरूनच सर्व फुलांस मधुर व मनोहर वास येतो. माझी पक्की खातरी आहे कीं, माझ्यावर जीं संकटें आलीं आहेत त्या संकटांतून मी त्वरित पार पडेन, आणि ह्याच संकटांचा परिणाम सुख आहे, हेंही मी पक्कें समजतें; तर मी धीर धरीन, उताव-ळेपणानें हावरी होणार नाहीं. ईश्वर करो, आणि तो सुसमय येईतोंपर्यंत मला सर्व प्रकारचे हाल सोसण्यास बळ येवो. ह्या फुलांच्या योगानें त्यांचा व माझा उत्पन्नकर्ता कोण, हें मी पक्कें समजतें, आणि ज्या अर्थीं तो दयावंत मला विसरत नाहीं, त्या अर्थीं मी पण त्याला कधींही विस-रणार नाहीं. ह्या पुष्पांचा रंग आकाशासारखा निळा आहे, ह्मणून मला इहलोकीं जीं दुःखें प्राप्त होतील त्यांचा परिहार आकाशाविषयीं स्मरण करून होवो. ह्या पुष्पां-मध्येंच कांहीं कुंदाचीं फुलें आहेत—त्यांचा रंग कांहीं पांढरा, कांहीं तांबडा असा आहे; ह्या पुष्पांच्या वेली नेहमी इतर झाडांवर पसरलेल्या असतात, कधींही जमिनीवर पसरत नाहींत व जमिनीची धूळही त्यांस लागत नाहीं. त्याप्रमा-

णेंच माझी अवस्था, मी ईश्वरालाच घट्ट मिठी मारून बसेन, आणि त्याचेच कृपेच्या योगानें ह्या संसारदुःखांतून पार पडेन. हें जाईचें पुष्प पहा! तें झाडापासून तोडलें तरी ज्याप्रमाणें त्याचा सुगंध चोंहोंकडे पसरतो, त्याप्रमाणेंच ज्या गृहस्थानें मला माझ्या बागेंतून ओढून आणिलें आणि मला या कारागृहांत घातलें त्याजवर देखील उपकार करण्यास मी कधींहीं मागेंपुढें पहाणार नाहीं. ही पहा येथें मरव्याची टिक्षी आहेः तिच्यावरून जरी मोठा कडक हिंवाळा गेला तरी देखील ती जशीची तशीच असते—तद्वत्च आपल्या मनाची आशाही आहे; कारण कोणतें कसेंही संकट जरी प्राप्त झालें, तरी तिचा कधींहीं नाश होत नाहीं, म्हणून ह्या टिक्षीस आशेची संज्ञा दिली आहे हें सकारण व यथायोग्य आहे. आतां जरी मजवर एवढें संकट आलें आहे तरी मी निराश होणार नाहीं. ईश्वर ह्या फुलांला वाऱ्याच्या सोसाट्यांत, थंडीच्या कडाक्यांत व धुरळ्यांत सुखरूप ठेवितो, तो, मी संकटांत असतां माझ्याकडे कानाडोळा करील असें कधींच होणार नाहीं. ह्या फुलांत केवड्याचीं दोन पानें आहेत; यांच्यायोगानें माझ्या मनांत अशी कल्पना येते कीं जे ईश्वरावर प्रीति करितात व त्याच्या आज्ञेप्रमाणें चालतात, त्यांचा अंतकाल झाल्यावर ईश्वरानें त्यांस देण्याकरितांच ह्या पर्णांचा मुकुट ठेविला आहे. ह्यावरून ज्याची प्रभा सुवर्णासारखी सुंदर व अविनाशी त्या सद्गुणरूप मुकुटाची मूर्ति माझ्या मनांत आली आहे. अहाहा! मृत्युलोकच्या वस्तीमध्यें हीं जीं फुलें आहेत तीं क्षणिक आनंदाप्रमाणें असतात. जर आपण प्रभु येशु ख्रिस्तावर पूर्ण भरंवसा ठेवून तोच आपला उद्धारकर्ता आहे

असें पुरतें मनांत वागविलें, तर येथील दुःखें सहन केल्यानें आपणास पारलौकिक दुःखें भोगावीं न लागतां सार्वकालिक सुख प्राप्त होईल." येणेंप्रमाणें तिनें आपलें समाधान करून घेतलें.

इतक्यांत बाहेर अकस्मात् आकाशांत ढग उठले, आणि चंद्र आच्छादित झाल्या कारणानें शांतेला तीं फुलें दिसेनाशीं झालीं. सर्व खोलीमध्यें अंधार झाला. तेणेंकरून तिच्या मनास पुनः वाईट वाटूं लागलें. परंतु आकाश लवकरच निरभ्र होऊन पूर्ववत् चांदणें पडलें. तेव्हां ती म्हणाली—"येणेंप्रमाणें जरी आपणावर संकटें गुजरलीं, तरी अखेरीस तीं नाहींशीं होऊन आपण पूर्ववत् सतेज दिसूं लागूं. ह्याचप्रमाणें माझ्यावर निरर्थक आरोप आला तरी ह्या सर्व अरिष्टांमधून ईश्वर मला पार पाडून निर्दोष ठरवील, यांत कांहीं शंका नाहीं."

नंतर शांता तरटावर जरा आडवी झाली, व वरील विचारांनीं तिच्या मनास थोडें समाधान होऊन तें स्वस्थ झाल्यामुळें तिला लवकरच झोंप लागली, आणि तिला एक चांगलें स्वप्न पडलें. तेणेंकरून तिच्या मनाला जरासें बरें वाटलें. तिला स्वप्न पडलें तें येणेंप्रमाणें होतें:—ती कोणा एका नवे बागेंत फुलझाडांच्या ताटव्याजवळून फिरत आहे. ती बाग एकीकडे होती आणि तिच्या सभोंवतीं देवदाराचीं झाडें होतीं, तेणेंकरून तिच्या मनाला फार विसावा झाला. त्या वेळेस आभाळ स्वच्छ असून चांदणें इतकें पांढरें शुभ्र पडलें होतें कीं तावत्कालपर्यंत तिच्या आठवणींत तसें सुरेख चांदणें कधींच पडलें नव्हतें; आणि त्या कोमल चंद्रकिरणांनीं सर्व वनस्पतींस व सर्व पदार्थांस अति

शोभा आली होती. चहूंकडे फुलांच्या सुवासाचा घमघमाट सुटला होता. तिला असें दिसलें, कीं आपल्या शोभायमान बागेमधून बाबा फिरत आहेत, आणि त्या चांदण्याच्या योगानें तीच त्याची गंभीर व भव्य मुद्रा प्रफुल्लित दिसत आहे. त्यास पाहून ती त्याच्याकडे धावत गेली आणि त्याच्या गळ्याला तिनें घट्ट मिठी मारली; त्यावेळेस त्याच्या अंगावर तिच्या डोळ्यातूंन आसवें पडलीं.— इतकें स्वप्न पडल्यावर ती जागी झाली व तेणेंकरून ती दुःखांत असतांही तिला कांहींसें बरें वाटलें.

प्रकरण ५.

शांतेचा इनसाफ.

शांता सकाळीं उठली नाहीं तोंच कोणी एक सरकारी अमलदार तिला न्यायसभेस नेण्याकरितां आला. ती न्यायसभेंत गेल्यावर पहाते तों न्यायाधीश उंच स्थानीं खुर्चीवर बसले आहेत, त्यांच्या शेजारीं एका मोठ्या थोरल्या मेजावर नानातऱ्हेच्या खटल्यांचे कागद ठेविले आहेत,आणि तेथेंच एक चिटणीस बसलेला आहे. हा अदृष्टपूर्व भव्य देखावा एकाएकीं तिच्या नजरेस पडल्यामुळें ती घाबरून गेली. न्यायाधीशांनीं शांतेला शेंकडों प्रश्न केले, आणि त्यांचीं उत्तरें तिनें खऱ्या प्रकारें दिलीं. तिला अतिशय वाईट वाटलें व ती रडावयालाही लागली; परंतु मी निर्दोषी आहें, असेंच ती पुनःपुनः ह्मणे. तिनें आपल्याकडून खरें खरें सर्व सांगितलें; परंतु न्यायाधीश ह्मणतात, "मुली,

ही आंगठी तुझ्याशिवाय गेली नाहीं, कारण त्या खालींत एकटी तूंच गेली होतीस: तर आंगठी आहे असें म्हण; तूं कितीही नाहीं म्हटलेंस तरी मला तें खरें वाटावयाचें नाहीं." यावर शांतेनें उत्तर केलें, "न्यायाधीश महाराज, ईश्वर स्मरून मी सांगतें कीं ती आंगठी काळी कीं गोरी हें देखील मीं पाहिलें नाहीं. मग ती मजजवळ कोठून असणार! ह्याचा तुह्मीच विचार करा." तेव्हां न्यायाधीश तीस ह्मणाले, "मजजवळ आंगठी नाहीं असें तूं म्हणतेस, परंतु लोकांनीं तुझ्या हातांत देखील ती पाहिली; ह्याच्यावर तुझें काय म्हणणें आहे!" त्यावर शांता म्हणते, "सरकार, आपल्या मनांत काय आलें असेल तें येवो, परंतु ती आंगठी माझ्या हातांत लोकांनीं पाहिली म्हणतां हें अगदीं असंभवनीय आहे." इतक्यांत न्यायाधिशांनीं चिमाऊस बोलावणें पाठवून तिला तेथें आणविलें.

दुष्ट मनुष्यें आपल्या मनांतील गोष्टी सिद्धीस नेण्यास पाहिजे तें करण्यास चुकत नाहींत. पहा, शालू तो काय! आणि तो मंजुळेनें शांतेस दिला त्यावरून आपल्या धनीणीचें मन आपल्यावरून उडत चाललें, ही निरर्थक कल्पना मनांत आणून खोटेंनाटें सांगून शांतेचा सूड उगिवण्यास चिमाऊ प्रवृत्त झाली! तिनें असा निश्चय केला होता कीं शांतेच्या हातांत मीं आंगठी स्वत: पाहिली हें ह्मणणें सोडावयाचेंच नाहीं; आणि त्याप्रमाणें तिनें सर्वत्रांस सांगितलें कीं "शांतेच्या हातांत मीं स्वत: आंगठी पाहिली." ह्यावरून तिला न्यायाधिशांनीं कचेरींत साक्ष देण्यास बोलावलें.

चिमाऊ न्यायाधिशांच्या समोर उभी राहिल्यानंतर त्यांनीं तिला ह्मटलें, "ईश्वर स्मरून आंगठीविषयीं जो मजकूर

तुला माहित असेल तो सर्व खरा येथें सांग." हे **शब्द** ऐकून **चिमाऊ** घाबरली; तिचें मन तिला खाऊं लागलें, पाय थरथरा कांपूं लागले; परंतु काय दुष्ट हो! तिनें कशास न जुमानतां न्यायाधिशांस सांगितलें कीं "**शांतेच्या** हातांत आंगठी मीं आपल्या नजरेनें पाहिली." असें सांगण्याचें कारण हेंच कीं, तिला वाटलें, मी जर असें न बोलेन तर चहूंकडे माझी छी! थू! होऊन तोंड काळें करावें लागेल. नंतर ती **शांतेकडे** वळून **शांतेस** ह्मणते, "अग ए, तुझ्या-पाशीं आंगठी नाहीं ह्मणतेस! ती मी तुझ्या हातांत पाहिली होती. उगीच नाहीं कां म्हणतेस? दे ती आंगठी, नाहीं-तर प्राणास मुकशील." हे शब्द **शांतेला** सहन करवेनात, तिच्यानें कांहींएक उत्तर करवलें नाहीं; फक्त ढळढळां रडावयाला लागली, व रडत रडतच **शांतेनें** उत्तर दिलें, "**चिमाऊ**, तूं अगदीं खोटें बोलतेस, माझ्या हातांत आंगठी न पहातां तुझ्यानें एकदम खोटें कसें बोलवलें! अग कोणत्याही प्रकारें मजकडून तुझें नुकसान झालें नसतां, मजवर असा आळ कां घेतेस? मी तुझें काय केलें आहे बरें? विनाकारण माझ्या नाशास तूं कां कारण होतेस?" **चिमाऊचें** मन सर्व ऐहिक सुखाकडे असल्याकारणानें तिच्या मनांत **शांतेविषयीं** पक्कें हाडवैर उत्पन्न झालें होतें, ह्मणून तिच्या शब्दांकडे बिलकुल लक्ष न देतां ती स्तब्ध उभी राहिली. **चिमाऊनें** आंगठीचा मजकूर इतका बनावून सांगितला कीं आंगठी **शांतेशिवाय** गेली नाहीं अशी न्यायाधिशांची खातरी झाली. इतकें झाल्यानंतर **चिमा-ऊस** कचेरींतून जाण्याची परवानगी दिली. नंतर न्याया-धीश म्हणाले—"**शांते**, सर्व गोष्टी तुझ्या पक्षाविरुद्ध

असल्या कारणानें तूं गुन्हेगार ठरतेस. मंजुळाबाईची दासी धडधडीत तुझ्या तोंडावर सांगते कीं, 'मीं आंगठी शांतेच्या हातांत पाहिली;' तर मुली, ती आंगठी कोठें आहे तें सांग." ह्यावर शांतेचें एकच उत्तर होतें—"ती आंगठी मजजवळ नाहीं व मीं ती पाहिली देखील नाहीं." आंगठी चोरली असून ही नाहीं म्हणते असें समजून, प्राचीन काळच्या कडक कायद्याअन्वयें, तिला कबूल करण्याकरितां, तिच्या अंगांतून रक्ताच्या चिळकंड्या निघेपर्यंत चाबकांनीं मारलें. शांतेला इतकें दुःख झालें कीं तिच्यानें तें सहन करवेना. मोठ्यानें हंबरडा फोडून ती रडावयास लागली, व दीनवाणीनें म्हणाली, "बाबानों मज गरीबावर कां शस्त्र धरितां ! ह्या प्रकरणीं माझ्या हातून काडीमात्र गुन्हा झाला नाहीं." अशा रीतीनें ती दीनासारखी बोलली व त्या कामगारांच्या विनवण्या करून त्यांचे हातींपायीं पडली, परंतु त्यांस दया आली नाहीं. त्यांनीं पुनः तिला अंधारकोठडींत नेऊन टाकिलें. तिच्या सर्वांगांतून रक्त निघाल्यामुळें व निजण्यास एका तरटाशिवाय कांहीं नसल्यामुळें तिला अति वेदना होऊं लागल्या. मध्यरात्र होऊन गेली तरी तिला झोंप लागली नाहीं. अखेरीस तशाच दुःखामध्यें तिनें परमेश्वराची प्रार्थना केली. नंतर कांहीं वेळानें त्याच्याच दयेनें तिला गाढ व शांत झोंप लागली.

दुसरे दिवशीं न्यायाधिशांनीं पुनः तिला आपल्या समोर कचेरींत आणविलें. न्यायाधिशांनीं त्या अनाथ मुलीचे जरी हाल केले तथापि त्यांचा हेतु तिळभर देखील सिद्धीस गेला नाहीं. नंतर त्यांनीं असा विचार केला कीं ही मुलगी मारहाणीला जुमानीत नाहीं, तर आतां आपण तिच्याशीं

गोड गोड बोलून कांहीं लालूच दाखवून जर आपलें कार्य झालें तर पहावें, असा विचार करून ते म्हणाले,—"मुली, आपला असा अमोलिक जीव निरर्थक धोक्यांत कां घालतेस ? वेडे, कायद्यामध्यें अशा प्रकारच्या चोरीस देहांत-शिक्षा आहे. तूं विचार कर, तूं अजून लहान आहेस. ज्या वेळेस तुला शिक्षा होऊन तुझा वध करण्याकरितां अंतकाच्या हातीं तुला देतील, तेव्हां त्याच्या हातांतील कालरूपी तरवार पाहून तुझ्या मनाची काय स्थिति होईल ? मी तुला निक्षून सांगतों कीं, 'मीं आंगठी घेतली' एवढें म्हण, म्हणजे तुझ्या केसास देखील धक्का लागावयाचा नाहीं." इतकें ते बोलले तरी देखील शांता आपलें बोलणें सोडीना, तेव्हां न्यायाधीश म्हणाले, "मुली, असल्या कृत्यानें तुझाच प्राण जातो एवढेंच नव्हे, परंतु तुझा जो वृद्ध पिता, ज्याला तूं जीव कीं प्राण आहेस, त्याचा तुझ्या देखत आधीं शिरश्छेद करतील आणि मग तुझा करतील. तुला जर तुझ्या जीवाची परवा नसेल तर नसो, परंतु विनाकारण पितृहत्येस तूं कां कारण होतेस ? इतक्या दुराग्रहानें खोटें बोलण्यास तुझ्या बापाशिवाय दुसरे कोणीं तुला शिकविलें असावें ? ह्या दुष्ट शिक्षणामुळें तुझ्या व तुझ्या बापाच्या जिवावर येऊन गुजरली आहे, ह्याविषयीं तुझ्या मनांत कांहींच विचार येत नाहींत काय?" अशा धमकीनें शांता, भीतीनें कांहींशी बेशुद्ध झाली, व ती शुद्धीवर आल्यावर पुनः ते तिला म्हणाले, "मुली, विचार कर. अशा वेडांत मुद्दाम शिरूं नकोस. एक शब्द—हो—म्हण म्हणजे झालें. तेवढ्यानेंच जर तुम्हा दोघांचे प्राण वांचतात तर 'हो' असें कां म्हणत नाहींस ? नको मागेंपुढें पाहूं, म्हण 'हो'." हे शब्द

ऐकून शांतेच्या मनावर थोडेंसें भुरळ पडल्यासारखें झालें, व ती कांहीं वेळ उगीच उभी राहिली. ही वेळ पुरतीच परीक्षा पहाण्याची होती. पहा बरें! सैतानानें स्फूर्ति केल्यामुळें तिच्या मनांत असें आलें कीं आपण ही गोष्ट कबूल करावी आणि असें म्हणावें कीं, "मीं आंगठी घेतली खरी, परंतु वाटेमध्यें माझ्या हातून ती हरवली." इतक्यांत तिच्या मनांत सत्याचा प्रकाश पडून ती मनांत असें म्हणाली, "छे! मी पाप करणार नाहीं. खोटें बोलणें पापकर्म आहे. छे! मला वेडतर नाहीं ना लागलें! मी कधीं खोटें बोलणार नाहीं. काय होईल तें होवो, आम्हा उभयतांचे जीव गेले तरी बेहेतर आहे, पण खोटें बोलून ही जीभ कधींही विटाळायची नाहीं; मी ईश्वरावर पूर्ण भरं-वसा ठेवून त्याच्या हुकमाप्रमाणें नेहमी चालेन, म्हणजे त्यांतच माझें कल्याण होईल." नंतर तिनें न्यायाधिशांस निक्षून मोठ्यानें, पण सद्गदित शब्दानें, सांगितलें– "अहो महाराज, जर मी असें बोललें कीं 'आंगठी मी घेतली, व ती मजजवळ आहे' तर तें खोटें बोलणें होईल; आणि असें खोटें बोलून जरी आम्हा उभयतांचे जीव वांचतील तरी असलें निंद्य कर्म मी कधीं करणार नाहीं. परंतु माझी एवढीच विनंति आहे कीं, जर तुम्हांस कायद्याप्रमाणें देहांत शिक्षा करणेंच असेल तर माझ्या बाबांस वृद्धापकाळीं न मारतां माझें जें कांहीं करणें असेल तें करा. मी मरण्यास तयार आहें, आणि बाबांच्या आधीं जर मी मेलें तर तें मला सुखावह आहे."

हे शब्द शांतेच्या तोंडांतून निघाल्याबरोबर तिच्याविषयीं कळवळा आला नाहीं असा एकही पाषाणहृदयी मनुष्य

तेथें नव्हता. न्यायाधिशांच्या मनासही द्रव आला, व त्यांनीं असा हुकूम केला कीं हिला पुनः अंधारकोठडींत नेऊन घाला.

प्रकरण ६.

आनंदराव शांतेस कारागृहांत भेटण्यास जातो.

आतां ह्या खटल्याचा काय न्याय करावा ह्याबद्दल न्यायाधिशांस मोठी पंचाईत पडली, व ते आपल्याशींच विचार करूं लागले, "खटला सुरू झाल्यास आज तीन दिवस झाले, परंतु प्रथम दिवशीं जें कळलें त्यापेक्षां अधिक कांहीं निष्पन्न झालें नाहीं. मला जर दुसऱ्याजवळ आंगठी आहे अशी शंका घेण्यास जागा सांपडेल, तर ती घेऊन ह्या मुलीस मी मुक्त करीन. माझी अशी खात्री होते कीं ही मुलगी फार गरीब असून हिच्या हातून अशा प्रकारची गोष्ट कधींच घडावयाची नाहीं; परंतु काय करावें! कांहींच उपाय चालत नाहीं, सर्व पुरावा तिच्या विरूद्ध आहे. पुराव्यावरून तर असें सिद्ध होतें कीं हिच्याशिवाय आंगठी चोरीस गेली नाहीं." असा विचार करून न्यायाधीश प्रियंवदाबाईच्या महालांत गेले, व सर्व गोष्टींचा पुनः त्यांनीं फार बारकाईनें तपास केला. चिमाऊची सुद्धां पुनः जबानी घेतली. सर्व दिवसभर एकंदर खटल्याचा त्यांनीं मोठ्या बारकाईनें शोध करून शांतेच्या बोलण्यांत कितपत तथ्य आहे ह्याविषयीं विचार केला. सारांश, न्यायाधिशांनीं अस्तमानाचे सुमारास आनंदरावास बोलावणें पाठविलें. आनंदराव न्यायाधिशांचे घरीं गेल्यावर न्यायाधीश म्हणाले, "मी कडक ह्मणून जरी माझी प्रख्याति आहे तरी बुद्धि-

पुरःसर एखाद्याचें नुकसान व्हावें अशा रीतीची माझी वर्तणूक आहे असें तुझ्यानें कधींही ह्मणवणार नाहीं. तुझ्या मुलीचा जीव जावा असें माझ्या मनांत अगदीं नाहीं; परंतु तिच्यावर जो पुरावा झाला आहे तो पाहिला असतां तिला कायद्याप्रमाणें देहांत शिक्षा मिळावी हें अवश्य आहे. **चिमा-ऊच्या** जबानीवरून तर सर्व पुरावा शाबीत होतो. आतां माझें असें म्हणणें आहे कीं आंगठी परत येऊन त्या सरदाराचें जें नुकसान झालें आहे तें भरून मिळेल तर फक्त तिच्या वयाकडेसच लक्ष देऊन आम्ही **शांतेच्या** अपराधाची क्षमा करूं. **आनंदराव**, तूं **शांतेकडे** जा, आणि तुझ्यानें होईल तितकें करून आंगठी परत मिळेल असें कर. पहा आंगठी मिळाली ह्मणजे मी तुला खातरीनें सांगतों कीं **शांतेला** बिलकुल मरणाची भीति नाहीं, तथापि कायद्यापुढें माझा उपाय नाहीं म्हणून थोडीबहुत शिक्षा तिला भोगावी लागेल. तुझें आणि तिचें नातें काय आहे ह्याचा विचार कर. तूं तिचा बाप आहेस, सबब, प्रत्येक गोष्टीमध्यें ती सर्वस्वी तुझ्या हातांत आहे. तर जा, पाहूं तूं तिचें मन कसें वळवितोस तें; आणि जर का तुझ्या सांगण्यापासून कांहीं एक न होईल तर आम्ही असें खास समजूं कीं ह्या आंगठीच्या चोरीमध्यें तुझें अंग आहे. आणि आणखी मी असें सांगतों कीं जर आंगठीचा तलास लागला नाहीं तर कुत्रादेखील तुमचे हाल खाणार नाहीं. तूं वृद्ध आहेस, तुला विशेष सांगावें असें नाहीं; तुला सर्व समजतेंच आहे, तर आतां तूं जा आणि तुला वाटेल तसें कर."

ती चोरी **आपल्या** कन्येच्या अंगीं लावण्याचा त्यांचा विचार आहे असें त्यांच्या बोलण्याच्या झोंकावरून **आनंद-**

रावास समजलें, व त्यामुळें त्यास अतिशय वाईट वाटलें; परंतु अधिकारापुढें कांहीं चालावयाचें नाहीं असें त्यास पक्कें ठाऊक असल्यामुळें तो नम्रतेनेंच न्यायाधिशांस म्हणाला, "आपल्या सांगण्याप्रमाणें मी जातों, आणि माझ्यानें होईल तितकें मी करून पहातों; परंतु सरकार, तिच्या हातून आपण म्हणतां अशी गोष्ट झालीच नाहीं; केवळ आकसानें तिच्यावर हें कुभांड रचलें आहे. बरें, मी आपली आतां रजा घेतों; तिकडे जाऊन कांहीं निष्पन्न झालें तर बरेंच, नाहीं तर माझी आवडती एकुलती एक मुलगी निरपराधी असतां, तिचा अंत होण्यापूर्वीं या निमित्तानें तरी तिची माझी भेट होत आहे हें फार चांगलें आहे. हे जे माझ्यावर आपले उपकार झाले, ते मी कधींही विसरणार नाहीं." नंतर न्यायाधिशांनीं **आनंदरावा**बरोबर तुरुंगांत जाण्यास एका कामदारास हुकूम दिला.

ते उभयतां **शांते**च्या खोलीजवळ आल्यावर **आनंदरावा**-बरोबर आलेल्या कामदारानें खोलीचें दार उघडलें, आणि आपल्या हातांतला कंदील भिंतीच्या एक्या बाजूस तसाच जळत ठेविला. **शांते**च्या पोटास कांहीं मिळालें नव्हतें. ती तरटावर पडली असून तिला कांहीं गुंगी येत असतां, तिची दृष्टि एकाएकीं भिंतीवर गेली, तेव्हां कंदिलाचा उजेड पाहून एकदम तिनें आपलें तोंड वळवलें, तों बाप तिच्या दृष्टीस पडला; त्यास पहातांच तिला जो आनंद झाला त्यासरशी मोठ्यानें ओरडून ती त्यास भेटण्याकरितां झपाट्यानें उठली; तेव्हां हातांतील बेड्यांचा खळखळ आवाज झाला. तितक्यांत कांहींशी मूर्छा आल्या कारणानें त्याच्या खांद्यावर तिनें आपली मान टाकली.

अशा स्थितींत आनंदरावानें तिला संभाळून हळूच खालीं बसविलें; व त्यानें तिला घट्ट पोटाशीं धरून तिच्या अंगावरून हात फिरविला. मग कांहीं वेळानें ती शुद्धीवर आली, आणि उभयतां कांहीं वेळपर्यंत स्तब्ध राहिलीं. आनंदरावास जें बोलावयाचें तें तो बोलूं लागला. इतक्यांत शांता मध्येंच म्हणाली—"बाबा, इतर लोकांच्या मनांत शंका आली, याचें नवल नाहीं; पण जन्मापासून मी तुमच्या जवळ असल्यामुळें मी कोणत्या तऱ्हेची मुलगी आहें हें तुम्हाला पक्कें माहीत असतां तुमच्याही मनांत माझेविषयीं शंका येते, असें होतें तरी कसें?" हे शब्द ऐकून आनंदराव गहिंवरून म्हणतो—"शांते, तुझ्याविषयीं माझे मनांत कुकल्पना येईल असें तुला वाटतें काय? छे! मीं तुला तसा प्रश्न केला तो न्यायाधिशांचे हुकुमानें. तर बेटा, तूं भिऊं नकोस; मनाला वाईट वाटूं देऊं नकोस." नंतर तीं उभयतां एकमेकाकडे पहात स्तब्ध राहिलीं. त्या वेळेस शांतेचें तोंड अगदीं सुकून गेलें होतें, रडरडून डोळे सुजले होते, वेणीफणी कांहीं नसल्या कारणानें केस अस्ताव्यस्त झाले होते. अशी स्थिति पाहून आनंदराव म्हणतो—बये, काय ही तुझी स्थिति! ईश्वरानें तुला चांगलेंच कसोटीला लाविलें आहे, परंतु एवढ्यानेंच झालें असें नाहीं. थोडे दिवसांनीं तुजवर जो घोर प्रसंग येणार त्याजवरून माझा थरकांप होतो. हाय! हाय! ईश्वरा! कदाचित् माझ्या बयेचा शिरश्छेद होईल!" त्याचें समाधान करण्यासाठीं शांता म्हणते— "बाबा, मजविषयीं मला कांहीं काळजी नाहीं, पण, तुमच्या वृद्धापकाळीं, मी गेल्यावर, तुह्मांवर कोणत्या प्रकारचीं संकटें येतील व तुमचें काय

होईल ह्याविषयीं मनांत विचार आला ह्मणजे पोटांतून कसें अगदीं उमदळून येतें." तेव्हां **आनंदराव** तिला म्हणाला—"मुली, वेडी तर नाहींसना! माझें काय होईल ह्याचा विचार देखील तूं मनांत आणूं नकोस. कारण माझ्यावर कोणतेंही प्रकारचें संकट येणार नाहीं." **आनंदरावाचे** हे शब्द ऐकून **शांता** आनंदभरित होत्साती ह्मणते, "बाबा, असें आहे तर मला भीति कसली आणि दुःख तरी काय ह्मणून? अहो, माझ्या मरणाबद्दल मला कांहींच वाटत नाहीं. तुमच्याकरितां फक्त मला वाईट वाटत होतें, त्याचें तुह्मीं निरसन केलें. आतां मला कसलें दुःख किंवा काळजी नाहीं. मेल्यावर मी देवाजवळ व **येशु ख्रिस्ताजवळ** जाईन, मग तेथें माझी आई, आणि माझीं बहीणभावडें हीं सर्व मला भेटतील, मग हो तेथें सुखाला काय कमी?"

ह्या सर्व बोलण्याचा **आनंदरावाच्या** मनावर पक्का ठसा उमटून तो लहान मुलाप्रमाणें रडूं लागला. कांहीं वेळानें आपले हात जोडून तो म्हणाला, "इतका नम्र स्वभाव व सुशील वृत्ति ईश्वरानें तुला दिली आहे त्याबद्दल मी त्याचा फार फार आभारी आहें."

वृद्धापकाळीं पुत्रशोक किती दुःसह आहे बरें! त्यांतून **शांतेसारखी** सुलक्षण मुलगी हजारांमध्यें एखादी सांपडेल. म्हातारपणीं एकुलती एक प्रिय कन्या, जिच्यापासून सर्वथैव सुखप्राप्ति होणार, ती आतां नाहींशी होणार म्हणून **आनंदरावास** वाईट वाटून तो म्हणाला, "हाय! हाय! केवढी दुःखाची गोष्ट!" असल्या विपत्तींत असतांही, सुसारे टाकीत टाकीत तो म्हणतो—"हे ईश्वरा तुझ्या इच्छेप्रमाणें सर्व गोष्टी होवोत." हे शब्द तोंडांतून निघत असतां

आनंदरावाच्या नेत्रांवाटे अश्रुप्रवाह चालले होते. असो, पुढें **आनंदराव शांते**स म्हणाला–"**शांते**, आतां आपला तर वियोग होणारच, अशा वेळेस मी तुला एक गोष्ट सांगतों, तिकडे लक्ष दे. पहा, **प्रियंवदा**बाईची दासी **चिमाऊ** हिनें अशी जबानी दिली आहे कीं **शांते**च्या हातांत मीं स्वतः आंगठी पाहिली; आणि ह्याच जबानीवरून तुला इतकें भोगावें लागत आहे, तरी तिच्याबद्दल मनांत द्वेषबुद्धि न धरतां तिचे अपराधाची तिला क्षमा कर. **शांते**, ती **चिमाऊ** महालामध्यें रहात आहे, चांगले चांगले पोशाग करीत आहे, तिला खायला प्यायला यथास्थित आहे,—व तूं ह्या अंधारकोठडींत रकल्यावर पडली आहेस, खायला प्यायला बरोबर मिळत नाहीं, एवढेंच नव्हे, परंतु, हातांमध्यें बेड्या देखील आहेत, तरी त्या **चिमाऊ**पेक्षां तूं सुखी आहेस कीं नाहीं बरें? असो, ज्याप्रमाणें **ख्रिस्तानें** दयार्द्रबुद्धीनें आपल्या हाडवैऱ्यांस क्षमा केली त्याप्रमाणेंच तूं पण तिला क्षमा कर. तिच्याप्रमाणें नीच स्थितीमध्यें रहाण्यापेक्षां मरणें हें फार चांगलें" **शांतेनें** खातरीनें सांगितलें, "मीं तिला क्षमा केली." इतक्यांत तो कामदार आंत येत आहे असें पाहून **आनंदराव शांते**स म्हणतो—"बये, **ईश्वर** तुझा सांभाळ करो! हीच जर आपली शेवटची भेट असेल आणि आपणास एकमेकाचें मुख पुनः कधींही दृष्टीस पडणार नसेल, तर तुझा वियोग मला सहन न होतां मी लवकरच तुझ्या पाठोपाठ स्वर्गयात्रा करण्यास निघेन."

हें संभाषण चालू आहे तोंच कामदारानें **आनंदरावास** सुचविलें कीं आपल्यास येथें येऊन फार वेळ झाला, तर आतां लवकर चलावें हें बरें.

शांतेच्या मनांतून आपल्या पित्यानें कांहीं वेळपर्यंत तेथें रहावें असें होतें, म्हणून तिनें त्याच्या गळ्याला घट्ट मिठी मारली; **आनंदराव** हळूच ती मिठी सोडून दूर झाला. **शांता** पुन: बेशुद्ध होऊन पडली.

आनंदराव न्यायाधिशांच्या समोर येतांच वर हात करून ह्मणाला—"अहो! ती निरपराधी आहे!" न्यायाधीश म्हणतात—"मलाही असेंच वाटतें, परंतु तुमच्या व तुमच्या कन्येच्या साक्षीवरूनच मला तसें ठरवितां येत नाहीं, म्हणून एकंदरींत झालेल्या पुराव्यावरून व येथील कायद्याअन्वयें मला **शांते**ला कडक शिक्षा केली पाहिजे."

प्रकरण ७.

शांतेस शिक्षा होऊन अमलांत आणली.

हा जो **शांते**वर खटला उपस्थित झाला होता, त्याचा काय परिणाम होतो, हें पहाण्याकडे सर्वांचें लक्ष लागलें होतें.

त्या वेळेस असा कायदा होता कीं त्या आंगठीचे किमतीचे विसांशाची जरी चोरी झाली, तरी त्या गुन्हेगारास देहांत शिक्षा द्यावी. ज्या गृहस्थांस असें वाटत होतें कीं **शांते**वर विनाकारण हा आरोप आला आहे व त्या योगानें तिच्या जीवाचा नाश होत आहे, त्या लोकांस फारच वाईट वाटलें व भीति उत्पन्न झाली.

शांता ह्या कामांत निरपराधी आहे असें ठरावें, असें त्या सरदारास वाटत होतें. त्यानें ह्या खटल्याचे सर्व कागद

पुन: वाचून पाहिले, आणि याविषयीं न्यायाधिशांजवळ बराच वेळ बोलत होता; परंतु हें कृत्य शांतेच्या हातून झालें नाहीं, असें मानण्यास एकंदर खटल्यामध्यें एक अक्षर देखील त्यास आढळलें नाहीं. इकडे प्रियंवदाबाई व मंजुळा ह्यांनीं अति दु:खित होऊन नेत्रांवाटें अश्रु ढाळून न्यायाधिशांची विनवणी केली कीं महाराज, कसेंही करा, पण शांतेच्या जिवाला धक्का बसेल अशी शिक्षा देऊं नका. इकडे आनंदराव मोठ्या नम्रतेनें ईश्वरावर हवाला ठेवून म्हणतो—"हे देवा! दीनदयाळा! मज गरीबाचें एवढेंच मागणें आहे कीं माझी जी प्रिय कन्या हिचे हातून कोण-तेही प्रकारची गैर गोष्ट झाली नाहीं, हें सर्व जगाचे प्रत्य-यास येऊं दे."

जेव्हां कोणी सरकारी कामदार किल्या घेऊन येई तेव्हां मला देहांत शिक्षा झाली आहे असें सांगण्यासच येत आहे, असें शांतेला वाटे.

इकडे तिकडे फिरत असतां अंतक शांतेला देहांत शासन करण्याचे तयारींत आहे, हें पाहून चिमाऊला फारच दु:ख वाटलें. ह्या दु:खाच्या योगानें तिचें प्रसंगावधान अगदीं नाहींसें झालें; ती वेडावून गेली, तिला मी काय करतें ह्याचें भान राहिलें नाहीं. कोणतेही कामास तिच्यानें हात लाववेना. तेणेंकरून महालांतील इतर लोक असें ह्मणूं लागले कीं चिमाऊचे मनांत कांहीं तरी विलक्षण चलबिचल झाली आहे. तिनें हातरूणावर पडून झोंप घेण्याचा प्रयत्न केला, पण अशास गाढ झोंप येणार कोठची! जरा डोळ्याला डोळा लागला नाहीं तोंच तिचे स्वप्नांत शांतेचें रक्तबंबाळ शिर वरचेवर दृष्टीं पडायास

लागलें. रात्रंदिवस एक क्षणभर देखील **चिमाऊस** चैन पडेना. ती इतकी दुष्ट होती कीं अशी जरी तिची स्थिति झाली, तरी देखील खरी गोष्ट कबूल करून आपले अपराधाचें क्षालन करीना. तिनें असा निश्चय केला होता कीं "जें होईल तें होवो, मी जें एकदा बोललें आहें, तेंच शेवटपर्यंत धरून राहीन."

सरते शेवटीं न्यायाधिशांनीं शिक्षा सांगितली, ती येणें प्रमाणें—"ह्या गुन्ह्यांतील कैदी, **शांता** नांवाची मुलगी ही आजपर्यंत कधींही वाईट कृत्यांत सांपडून सरकारची पायरी चढली नाहीं; तिचें वय व पूर्वीचें चांगलें वर्त्तन हीं मनांत आणून तिला फांशीची शिक्षा देण्यांत येत नाहीं. हिच्या बापानें हिला आजपर्यंत कधींही सुशिक्षण न दिल्या कारणानें व हिला दुर्मार्गानें जाण्यास उत्तेजन दिलें, त्या योगानें हिनें ही चोरी केली, हा त्याचा अपराध आहे. सबब हाही तिला सामील आहे, असें जाणून ह्या उभयतांस हद्दपार करण्याची शिक्षा देण्याचा ठराव केला आहे. ह्या सरदाराचें जें नुकसान झालें आहे तें व सरकारास खटला चालविण्याबद्दल जो खर्च झाला असेल तो, ह्यांची जी मालमत्ता असेल तिचा लिलांव करून होईल तितका वसूल करावा. ही शिक्षा उद्यां अमलांत आणावी."

दुसरे दिवशीं सकाळीं कोणी एक सरकारी कामदार, **शांता** व तिचा वृद्ध पिता या उभयतांस त्या सरदाराचे महालावरून नेत असतां **चिमाऊनें** पाहिलें.

ह्या खटल्याचा परिणाम जसा होईल असें तिला वाटत होतें तसा जरी झाला नाहीं, तरी जन्मभर हद्दपार करण्याची शिक्षा **शांतेस** मिळाली, व ती अमलांत आणली जात आहे,

हें पाहून जिच्या मनामध्यें सद्गुणाचा लवलेश देखील वसत नव्हता, अशा त्या दुष्ट दासीला आपली नोकरी शांतेला मिळण्याचा संभव नाहींसा झाला, म्हणून कांहींसें बरें वाटलें. आनंदरावाच्या कन्येबद्दल चिमाऊच्या मनांत पुन: वैमनस्य आलें आणि शांतेवर जें संकट आलें त्याबद्दल तिला आनंद झाला. वैऱ्यावरही येऊं नये अशा प्रसंगींही तिच्या मनांत द्वेषबुद्धि प्रखर झाली.

शांतेनें दिलेला पुष्पकरंडक एका मेजावर ठेवलेला होता, त्याकडे पाहून प्रियंवदाबाई म्हणाल्या, "चिमाऊ, ही सांगशी माझ्या डोळ्यांपुढें देखील नको, ही पाहिली म्हणजे माझ्या पायांची आग मस्तकाला जाते, जा बाई, एकदाची ती माझ्या दृष्टीआड कर." त्यावरून, शांतेला व तिच्या पित्याला हद्द-पार करण्यासाठीं चालविलें असतां, चिमाऊ पदराखालीं ती करंडी घेऊन तिच्या मागोमाग गेली; व एकदम उभी राहून म्हणते, "शांता, उभी रहा, तुझ्यासारखे जे लोक असतात, त्यांपासून आमच्या बाईसाहेबांस कांहीं घ्यावेसें वाटत नाहीं. हीं पहा तुझीं फुलें, तुझी वाखाणणी आतां कुत्रादेखील करायचा नाहीं. ही घे आपली सांगशी." असें म्हणून तिनें शांतेच्या पायांजवळ ती आदळली, आणि तिच्याकडे पाहून तिला वाईट वाटावें ह्याच हेतूनें तेथून हसत चालती झाली, आणि वाड्यांत गेल्याबरोबर तिनें खाडदिशीं दार लावून टाकलें. शांता करंडी हातांत घेऊन कांहीं न बोलतां पुढें चालती झाली.

आनंदरावाचे पाय वृद्धापकाळानें व दु:खानें लटलटां कांपत, व त्यास टेंकण्यास काठी देखील नव्हती. शांता वरचेवर मागें वळून आपल्या घराकडे, देवळाकडे व त्या

महालाकडे पाहून रडत असे. अशा रीतीनें पुढें जातां जातां टेंकडीच्या आड गेल्यावर तिला ह्यांपैकीं कांहीं एक दिसेनासें झालें.

त्या अमलदारानें ह्या उभयतांस त्या प्रांताच्या हद्दीपलीकडे ऐन अरण्यांत नेऊन सोडलें. अगदीं थकून गेल्यामुळें **आनंदराव** थोडासा विसांवा घेण्यासाठीं एका वृक्षाच्या छायेखालीं बसला. त्यानें **शांते**चा हात धरून तिला आपल्याजवळ बसविलें आणि तिच्या तोंडावरून हात फिरवून तिला घट्ट पोटाशीं धरिलें, व म्हणाला–"बेटा, पहा, ज्याच्या इच्छेशिवाय कोणतीही गोष्ट घडत नाहीं, त्या सर्वशक्तिमान् **परमेश्वरा**च्याच कृपेनें त्या अंधारमय कारागृहांत त्या निर्दय अंतकाच्या हातांत न पडतां ह्या सुंदर प्रदेशांत माझी माझ्या हातीं लागून तूं आज मजजवळ बसली आहेस. **ईश्वरानें** आपणास हा सुदिन दाखविला म्हणून त्याचे उपकार आपण जन्मवर मानले पाहिजेत." नंतर उभयतां गुडघे टेंकून मनःपूर्वक **ईश्वरा**ची पुढीलप्रमाणें स्तुति करूं लागलीं–"हे **परमेश्वरा**, आमचा सांभाळ करणारा तुजवांचून दुसरा कोणी नाहीं, म्हणून आमचा सदय दृष्टीनें सांभाळ कर." अशी प्रार्थना केल्यावर त्यांच्या मनास फार समाधान झालें व असें वाटूं लागलें कीं ह्यापुढें आपणावर कोणतेही प्रकारचें संकट येणार नाहीं. त्या वेळेपासून त्यांस **ईश्वरी**सूत्रें अनुकूल होऊं लागलीं. तीं तेथें बसलीं असतां तेथें एक म्हातारा शिकारी आला. त्याचें नांव **सदू** होतें. **प्रतापराव**सरदाराबरोबर तो शिकारी प्रवास करीत असतां त्या सरदाराजवळ **आनंदराव**ही नोकर होता. तो **आनंदरावास** ओळखून म्हणतो, "**आनंदराव** तुमच्या

शब्दावरून मीं तुम्हाला ओळखिलें; आणि जवळ येऊन पाहतों तों तुह्मीच आहां. **ईश्वर** तुमचें कल्याण करो. मी ऐकिलें तें कांहीं खोटें नव्हे, तुह्माला हद्दपार केलें आहे. वृद्धापकाळीं आपलें घरदार सोडून परक्या लोकांमध्यें दुसऱ्याचे तोंडाकडे पहात बसावें लागणें ह्यासारखें दुसरें दुःख कोणतेंही नाहीं." त्यावर **आनंदराव** ह्मणतो-"**सदोबा,** तुम्ही म्हणतां तसें माझ्या मनांत येत नाहीं. आपण पृथ्वीचे पाठीवर कोठेंही असलों-मग राजमहालांत काय, अथवा एकाद्या दरींत काय-**ईश्वराची** आपणावर सर्वदा सर्व ठिकाणीं नजर असतेच. मुंगीला देखील तिच्या मानाप्रमाणें तो सुख देत असतो, मग तो तें आपणास देणार नाहीं असें कसें होईल! शिवाय हें जग आपलें नव्हे, कारण, हें नाहींसें होणारें आहे. अविनाशी स्वर्ग आपला देश खरा, तेथें मृत्यूचें बोट देखील शिरत नाहीं." नंतर **सदोबा** सदय अंतःकरणानें त्यास विचारतो-" कायहो **आनंदराव,** त्यांनीं तुम्हांस हाकून दिलें तेव्हां तुमच्या बरोबर जरूर तें वस्त्रप्रावरण देखील दिलें नाहीं काय?" **आनंदराव** म्हणाला-"अहो **सदोबा,** तुम्ही असा विचार करा कीं जो 'अरण्यांतील फुलांस सुंदर पोशाग देतो,' तो ह्या आम्हांस देणार नाहीं काय?" **सदोबा** म्हणाला-"बरें, असो, पण त्यांनीं तुम्हांस थोडाबहुत पैसा अडका दिला असेल?" **आनंदराव** उत्तर करतो-"**सदोबा,** आपलें मन जर चांगलें आहे, तर आपणास कोणतेही प्रकारची उणीव येणार नाहीं. माझा बाप बुरूडी काम करीत असे. त्यानें मला माळ्याचें काम शिकवून हिंवाळ्यामध्यें घरीं बसून कांहीं तरी धंदा चालावा म्हणून बुरूडी कामही चांगल्या रीतीनें

शिकविलें. पहा, जरी त्यानें मरते वेळेस पांच सहा हजार रुपये माझ्या स्वाधीन केले असते, तरी ते कदाचित् नाहींसे होऊन वाईट दिवस प्राप्त झाले असते. त्यानें मला हे दोन धंदे शिकविले, त्या योगानें कोठेंही जरी मी बसलों, तरी अर्धी भाकरी मिळविण्यास ईश्वराच्या कृपेनें माझ्या अंगांत सामर्थ्य आहे. इहलोकीं खरी संपत्ति कोणती, तर निर्मल अंत:करण, सदृढ प्रकृति, अबरूचा धंदा, हीं आहेत." हें त्याचें भाषण ऐकून सदोबा म्हणाला, "तुम्हाला विपत्ति सहन करण्याचें सामर्थ्य देवानें दिलें आहे, ही तुम्हावर त्याची कृपाच आहे." आनंदराव म्हणतो—" त्याबद्दल आम्ही त्याचे उपकार मानितों." सदोबा म्हणतो—" तुम्ही म्हणतां तें खरें आहे, बागवानाचा धंदा करून तुम्ही उदरनिर्वाह कराल, पण तुम्हास कोठें नोकरी मिळेल ती मिळो." आनंदराव उत्तर करितो—"जिकडे 'आम्हांस ईश्वर वाट दाखवील तिकडे जाऊं म्हणजे नोकरीस कांहीं तोटा नाहीं."

इतकें दोघांचें भाषण झाल्यावर सदोबानें आपल्याजवळ असलेली काठी व कांहीं पैसे आनंदरावास दिले. आनंदरावानें काठी घेतली, परंतु पैसे घेतांना पुष्कळ नाहीं-होय केलें, परंतु सदोबाचा अति आग्रह पाहून ईश्वरी देणगीच समजून त्यानें ते घेतले व सदोबास म्हणाला—"ईश्वर तुमचें कल्याण करो." नंतर शांतेकडे वळून तो म्हणाला, "शांते, पाहिलेंसना, आपल्या ह्या दु:सह शिक्षेच्या प्रारंभीं देखील ईश्वर आपला कसा समाचार घेत आहे! आपल्याला फार इजा न व्हावी म्हणून हे पैसे त्यानें पाठविले. अजून आपण ह्या प्रांताची सीमा उलंघिली नाहीं तोंच ह्या उदार गृहस्थाची गांठ पडली, व त्यानें मला काठी व पैसे दिले, हा ईश्वराचा

आपणावर केवढा उपकार आहे बरें? बये, **ईश्वराच्या** प्रार्थनेचें फल ही जागा सोडून जाण्याच्या पूर्वींच आपल्याला मिळालें. असो, आतां धीर धर, आपण पुढें चालायला लागूं. निःसंशय आपणास कांहीं एक कमी पडणार नाहीं." हे शब्द ऐकून **सदोबा**चा कंठ दाटून आला व डोळे आश्रूंनीं भरले. तो म्हणाला, "बरें, **आनंदराव**, मी तुमचा आतां निरोप घेतों, **ईश्वर** तुमचें कल्याण करो. **शांता**बाई, तुझ्या ह्या लहानपणींच तुला दुःख प्राप्त झालें ह्याचें मला वाईट वाटतें. तुझ्या हातून अपराध घडला नाहीं, असें मी समजत होतों व अजून तसेंच समजत आहें. असो, **ईश्वरा**वर पूर्ण भरंवसा ठेवलात तर तो सर्व संकटांतून तुम्हांस पार पाडील व चांगले दिवस दाखवील." असें बोलून, **सदोबा सुवर्णपुरीकडे** परत जाण्यास निघाला.

वाटेंत मुक्काम कोठें करावयाचा, किंवा कोणत्या प्रदेशाला जावयाचें, ह्याविषयीं **आनंदरावा**चा कांहीं एक निश्चय नव्हता. केवळ **ईश्वरा**वर भंरवसा ठेवून तो उठला, व **शांते**चा हात धरून अपरिचित मार्गानें पुढें चालूं लागला.

प्रकरण ८.

आनंदराव आणि शांता यांचीं संकटें व त्यांचा परिहार.

आनंदराव आणि **शांता** ह्यांनीं आपला कठिण प्रवास

तसाच चालविला. तीं दहा कोस लांब गेलीं, परंतु त्यांस उतरण्यास जागा मिळाली नाहीं. थोडेबहुत पैसे गांठीं होते ते सर्व खर्चून गेले. पुढें पोटास कसें मिळवावें हें त्यांस समजेना. दुसऱ्याजवळ हात पसरून मागणें हें त्यांस दुःखकर वाटलें होतें, परंतु करतात काय! प्रसंगानुसार त्यांस तेंही करावें लागलें. तीं पुष्कळ घरीं भीक मागण्यास गेलीं. परंतु बहुतेक ठिकाणीं त्यांस यथेच्छ शिव्या मात्र मिळाल्या. कोठें कोठें त्यांस शिळीपाकी भाकर, व एकादेवेळेस भाजीपाला मिळे, तो त्यांनीं खावा, व मिळेल तेथें पाणी प्यावें. संध्याकाळीं बऱ्यावाईट मिळेल तशा जागीं भुईवर पडून रात्र काढावी व उजाडल्यावर पुनः मार्गक्रमण करावें. ह्याप्रमाणें प्रवास करीत असतां, एके दिवशीं तीं डोंगराळ प्रदेशांत आलीं. रस्त्याचे दोन्ही बाजूंस किर्र झाडी होती. सकाळपासून दोन प्रहरपर्यंत सारखीं चालत असून रस्ता संपेना व आसपास गांव दिसेना, व किती लांब आहे हेंही समजेना; ह्यामुळें **आनंदरावाचे** हातपाय अगदीं गळून गेले. अशी स्थिति पाहून **शांता** घाबरून गेली, व दुःखाचा पर्वत आपल्या अंगावर आज कोसळतो आहे असें तिला वाटलें. ती इकडे तिकडे पाणी पाहूं लागली, परंतु ह्या भयाण जागीं तिला पाणी कोठून मिळतें! ती खालीं बसली व आसपास कोणी असल्यास आपणास मदत करण्यास येईल ह्या हेतूनें ती मोठमोठ्यानें ओरडूं लागली; परंतु तिच्या हाकेस कोणी ओ देईना. ती जसजशी हाका मारी तसतसा प्रतिध्वनि मात्र तिचे कर्णांवर येई. जिकडे जिकडे पाही तिकडे भयंकर अरण्य मात्र दृष्टीस पडे, परंतु एक झोंपडी देखील तिच्या

नजरेस आली नाहीं. आसपास कोठें घर अथवा मनुष्य दृष्टीस पडावें ह्या हेतूनें शेजारील टेंकडीच्या माथ्यावर ती धावत गेली. सरते शेवटीं त्या टेंकडीचे दुसरे बाजूस पायथ्याशीं एक लहानसें सुंदर घर तिच्या दृष्टीस पडलें; त्याचे सभोंवती चांगला रमणीय बगीचा होता. असा शोध लागतांच ती त्या घरीं जाण्यास मोठ्या त्वरेनें धावत निघाली. ती त्या घरीं अगदीं बेदम होऊन आली; आणि रडत रडत व उसासा टाकीत तिनें तेथें रहाणाऱ्या शेतकऱ्याची मदत मागितली. ईश्वराच्या कृपेनें ज्यांपाशीं तिनें सहाय मागितलें तो शेतकरी व त्याची बायको फार मायाळू होतीं. तिचें निस्तेज तोंड, तिच्या डोळ्यांतील अश्रुधारा आणि तिचें दुःख पाहून त्यांना तिचा कळवळा आला.

"चला, गाडी जुंपून तेथें जाऊन आपण त्या म्हाताऱ्या आजारी मनुष्यास आपल्या येथें आणूं" हें आपल्या स्त्रीचें भाषण ऐकतांच, तो शेतकरी गाडी जुंपावयास बाहेर गेला; तों त्याच्या बायकोनें दोन घोंगड्या, एक स्वच्छ पाण्यानें भरलेलें भांडें, व एक शिशीभर आंब बाहेर आणिलीं. गाडीला वळण घेऊन यावें लागेल, यामुळें आपला पिता बसला आहे तेथें पोहोंचण्यास गाडीला अर्धा तास तरी लागेल, असें जाणून तें पाणी व ती आंब शेतकऱ्याच्या बायकोपासून घेऊन, शांता आली होती त्याच पायरस्त्यानें परत गेली, व गाडी येण्याच्या पूर्वी आपल्या आजारी बापाजवळ येऊन पोहोंचली. आनंदराव कांहींसा शुद्धीवर येऊन एका देवदाराच्या झाडाखालीं बसला होता. आपली मुलगी आपल्याजवळ नाहींसें पाहून त्याला जी काळजी लागली होती ती, ती आलीसें पाहून दूर झाली

व त्यास आनंद वाटला. इतक्यांत तो शेतकरी आणि त्याची बायको तेथें आली, आणि येतांक्षणींच त्यांनीं **आनंदरावास** उचलून गाडींत ठेविलें आणि आपल्या घरीं नेलें. घरीं पोहोंचल्यावर त्यांस रहाण्याकरितां तीन रिकाम्या असलेल्या खोल्या दिल्या. त्यांपैकीं एकीमध्यें बसण्याउठण्याची, एकीमध्यें स्वयंपाकाची व एकींत निजण्याची सोय होती. त्या निजण्याच्या खोलींत शेतकऱ्याच्या बायकोनें **आनंदरावा**करितां बिछाना घातला. **शांता** रात्रंदिवस त्याच्याजवळ बसत असे. वाटेंत झालेल्या श्रमामुळें, कुग्रास भक्षणामुळें व विश्रांति न मिळाल्यामुळें त्याची प्रकृति बिघडली होती ती हळू हळू सुधारत चालली. त्या कृपाळु बाईनें त्या आजारी मनुष्यास सर्व प्रकारें मदत केली आणि आपल्या सुंदर वस्तु देखील त्यांना दिल्या.

प्रतिवर्षीं तीं उभयतां शेजारच्या एका लहान खेड्यांत भरणाऱ्या जत्रेस जात असत. परंतु ह्यावर्षीं तेथें जाण्याचा बेत रहित करून जो पैसा तिकडे खर्च झाला असता तो ह्या आजारी मनुष्याकरितां औषधें वगैरे घेण्यास लावावा असा निश्चय त्यांनीं केला. त्यांचे उपकार मानून **शांता** ह्मणाली, "ईश्वराच्या कृपेनें कृपाळु लोक सर्वत्र आहेत, व ज्या ठिकाणीं ते नसतीलसें आह्मांस वाटतें त्या ठिकाणीं देखील ते असतात."

आनंदरावाची प्रकृति सुधारत चालली तरी **शांता** त्याच्या जवळच बसत असे. ह्या वेळीं ती रिकामी न बसतां, तिला शिवणकाम व विणण्याचें काम अप्रतिम येत असल्यामुळें ती त्या शेतकऱ्याच्या कुंटुबाकरितां कांहीं तरी

तसलें काम करी. ती अगदीं उद्योगावांचून रहात नसे. हा तिचा स्वभाव पाहून शेतकऱ्याच्या बायकोस फार समाधान वाटलें; व तिचा विनय व शांत स्वभाव पाहून तर ती तिच्यावर विशेष प्रीति करूं लागली. सर्व माणसें **आनंदरावाला** जपत असत व त्यास खावयास सुग्रास घालीत असत, ह्यामुळें त्याची प्रकृति इतकी सुधारली कीं, त्यास रिकामें बसणें आवडेनासें झालें, व त्यानें पुन: टोपल्या विणण्याचें काम सुरू केलें. पूर्वीप्रमाणें **शांता** टोपल्या विणण्याकरितां झाडांच्या फांद्या आपल्या बापाला आणून देऊं लागली. पहिली केलेली टोपली त्यानें शेतकऱ्याच्या बायकोस तिनें केलेल्या उपकाराबद्दल उतराई होऊन दिली. तिला अमुक प्रकारची टोपली आवडेल असें त्याला वाटलें होतें त्याप्रमाणेंच त्यानें ती केली, व ती तिला आवडली. ती टोपली दिसण्यांत सुंदर असून मजबूत होती. ती वेताची केलेली होती, व तिच्या झांकणावर वेतांस पक्का तांबडा रंग देऊन तिच्या नांवाचीं प्रथम अक्षरें व ज्या दिवशीं ती तिला दिली त्याची तारीख हीं साधलीं होतीं. त्याप्रमाणेंच तिच्या एका बाजूला हिरव्या, तपकिरी, व पिंवळ्या वेतानें ती पर्णकुटी व तिच्या दोहों बाजूंस, दोन देवदारांचीं झाडें काढलीं होतीं. ही सुंदर टोपली सर्वांना फार आवडली. शेतकऱ्याचे बायकोनें मोठ्या आनंदानें ती स्वीकारली. तिच्या पर्णकुटीस '**देवदारुपर्णकुटी**' ह्मणत असत. तिचा देखावा टोपलीवर काढलेला पाहून तर तिला फारच आनंद झाला. **आनंदराव** अगदीं बरा झाल्यावर एक दिवस आपल्या घरधन्यास ह्मणाला, "आपण आमचा भार पुष्कळ दिवस वाहिलात; आतां मी

बरा झालों आहें, तर दुसरीकडे कोठें जाऊन मी आपल्या उदरनिर्वाहाची सोय पहातों." हे शब्द ऐकून शेतकरी आनंदरावाचा हात धरून ह्मणाला,—"आह्मीं कोणीं तुह्माला राग येण्याजोगें कांहीं केलें असें वाटत नाहीं; असें असून तुह्मी आज हें काय ह्मणतां? आह्माला सोडून तुह्मीं कां जाऊं इच्छितां? आतां हिंवाळा येऊन ठेपल्यामुळें हीं पहा झाडांचीं पानें पिकून पिंवळीं होऊं लागलीं आहेत, असें असतांही तुह्मी जाण्यास इच्छितां यावरून तुह्मांला दुखणें आणावयाचें आहे असें मला वाटतें." "तसें नाहीं, परंतु एखाद्याला किती दिवस त्रास द्यावा ह्मणून मी जाण्यास निघालों आहें;" असें आनंदराव म्हणाला. शेतकरी म्हणाला "आम्हांला तुम्हांपासून मुळींच त्रास होत नाहीं, असें असतां तुम्ही कष्टी कां होतां? ज्या खोलींत तुम्हीं राहतां तींत तुम्हीं राहिल्यानें आम्हांला कांहीं अडचण होत नाहीं; व तुम्हांला पोसण्याचा भारही आमच्यावर नाहीं, कारण आपल्या निर्वाहापुरतें तुम्ही मिळवितां." त्याची बायको म्हणाली, "खरेंच एकटी शांता शिवणकामावर बरेच पैसे मिळविते, आणि तुम्हीं टोपल्या विणण्याचा धंदा जर चालू ठेविलात, तर मग तुम्हांस मुळींच काळजी करावयाला नको. तुम्हीं मला दिलेली सुंदर टोपली घेऊन मी कांहीं दिवसांमागें शेजारच्या कारखान्यांत गेलें होतें, तेव्हां तेथल्या सर्व बायका 'असली टोपली आम्हांला पाहिजे' असें म्हणूं लागल्या, व ती मीं कोठें व केवढयाला घेतली असें त्यांनीं मला विचारलें. तुम्ही टोपल्या विणण्याचें काम चालू ठेवा, मी तुम्हांला गिऱ्हाईक आणून देईन, त्यामुळें तुम्हांला काम नाहींसें होणार नाहीं." त्या उभयतांचा आग्रह पाहून

आनंदराव व **शांता** ह्यांनीं तेथें रहाण्याचें कबूल केलें, त्यामुळें त्यांना अतिशय आनंद झाला.

प्रकरण ९.

सौख्यावस्था.

मागील भागांत सांगितल्याप्रमाणें **आनंदराव** व **शांता** यांचा त्या शेतकऱ्याच्या येथेंच रहाण्याचा निश्चय ठरून, तीं तेथें स्थायिक झालीं, व त्यांनीं आपल्याला जे पदार्थ अवश्य पाहिजेत तेवढेच आणून आपल्या खोल्यांत ठेविले व इतर व्यवस्थाही साधीच ठेविली. त्यांचें जेवणखाण इतके दिवस त्या शेतकऱ्याकडेच असे, ह्यामुळें **शांतेला** स्वयंपाक करण्याचा प्रसंग आला नव्हता. परंतु आतां तीं वेगळीं राहूं लागल्या कारणानें ती तो करूं लागली; व आतां आपल्या प्रिय पित्यास आपल्या हातचें अन्न मिळेल हें पाहून तिला फार आनंद झाला. **शांता** स्वयंपाकांत गुंतली असतां **आनंदराव** बागेंत जाई व तिचें घरकाम आटोपल्यावर ती शिवायला बसे व तो टोपल्या विणीत बसे. ह्यावेळीं तीं पूर्वींच्या प्रसंगांविषयीं बोलत असत.

ह्या रीतीनें तीं आपला काळ सुखानें घालवीत. पावसाळ्यांत संध्याकाळीं, **आनंदराव** आणि **शांता**, व शेतकऱ्याचें सर्व कुटुंब माजघरांत बसत असत. **आनंदराव** नीतीच्या गोष्टी सांगे व उपदेशपर पद्यें ह्मणे; तीं कुटुंबांतील माणसें व त्या शेतकऱ्याचे नोकर लोक लक्ष लावून ऐकत, आणि ह्यामुळें तेथील सर्व माणसांचे पावसाळ्यांतले दिवस मोठ्या

सुखानें जात. त्या घराजवळच एक मोठी बाग होती. शेतकरी व त्याची बायको ह्यांस शेतकीचें काम फार असल्यामुळें त्या बागेची व्यवस्था त्यांच्या हातून मुळींच होत नसे. ह्या बागेंत सुंदर फुलझाडें लावण्याचें काम **आनंदरावानें** पतकरिलें. त्यानें उन्हाळ्यांतच सर्व तयारी केली होती व पावसाळा लागतांच **शांते**सहवर्तमान तो बागेच्या कामास लागला. तीं उभयतां सकाळपासून अगदीं रात्रपडेपर्यंत तेथें काम करीत. त्या जागेचे निरनिराळे विभाग करून कांहीं विभागांत वाफे करून त्यांत वेगळाल्या प्रकारच्या भाज्या लाविल्या होत्या, आणि मधून मधून जाण्यायेण्यासाठीं पायवाटा करून त्यांवर वाळू पसरली होती. ज्या गांवाहून **आनंदराव** भाजींचें बीं आणी, त्या गांवाहून आपल्या बागेंत लावण्याकरितां गुलाबाचीं कलमें, गुलछबूचे कांदे व दुसरीं तऱ्हेतऱ्हेचीं फुलझाडें किंवा त्यांचीं बियें आणा असें **शांतेनें** त्यास सांगितलें व तीं तो आणीपर्यंत तिला चैन पडलें नाहीं. **शांतेनें** कांहीं सुंदर फुलांचीं झाडें लाविलीं. त्यांपैकीं कांहीं तर इतकीं सुरेख होतीं कीं तसलीं त्या रानांत कोणींही पाहिलीं नसतील. थोडक्याच दिवसांनीं ती बाग हिरवीगार व सुशोभित दिसूं लागली. त्या दरींत सर्वत्र दाट झाडी होती व भर दोन प्रहरीं देखील तेथें सूर्याचे किरण येत नसत. तथापि ती दरी या बागेमुळें फार रमणीय दिसूं लागली. त्या बागेच्या जवळ एक फळझाडांची बाग होती, तिचीही व्यवस्था **आनंदराव** पहात असल्यामुळें तींतील झाडें चांगलीं वाढून त्यांस फळेंही पुष्कळ येऊं लागलीं. ज्या ज्या कामास तो हात घाली तें तें काम ईश्वराच्या कृपेनें फलद्रूप होत असे. **आनंद-**

रावाची स्वाभाविक उल्हासित वृत्ति परत आली व तो फिरून पुष्पांविषयीं बोलूं लागला. परंतु पूर्वीं बोललेलें पुनः न बोलतां प्रत्येक दिवशीं कांहीं तरी नवेंच बोले.

वसंतऋतूच्या आरंभीं **शांता** रानामध्यें शेवंतीचीं फुलें पहाण्याकरितां जाऊं लागली; कारण, प्रतिवर्षींच्या क्रमाप्रमाणें तिच्या मनांतून आपल्या पित्याला सक्रुद्दर्शनीं एक सुंदर पुष्पगुच्छ द्यावा असें होतें. फिरतां फिरतां सुंदर व सुवासिक फुलें तिला सांपडलीं. तीं वेंचून त्यांचा गुच्छ करून मोठ्या आनंदानें आपल्या पित्यास देण्याकरितां ती धावत घरीं आली. तिनें दिलेला तो गुच्छ घेऊन **आनंदराव** ह्मणाला, "बरें बेटा, 'शोधिलें असतां सांपडतें,' ही गोष्ट तुला आतां कळून आली असेल, पण ह्या सुंदर फुलांना कांट्यांत वाढणें आवडतें, ह्यावरून आपणास एक गोष्ट कळून येते, पहा, ह्या किर्र व भयंकर अरण्यांत व छपरांत आल्यानें आपणांस सुख होईल असें आपल्या स्वप्नीं तरी होतें का? आयुष्याची कोणतीही अशी कठिण स्थिति नाहीं कीं जिच्या बिकटपणाच्या पोटीं सुख असत नाहीं. ईश्वरावर दृढ श्रद्धा ठेवीत जा, ह्मणजे कितीही प्रतिकूळ काळ आला तरी आपल्या मनाची शांति कधींही नष्ट होत नाहीं."

एके दिवशीं असें झालें कीं गांवांतील एक बायको शेतकऱ्याकडे ताग घेण्याकरितां आली होती, तिच्याबरोबर तिचा लहान मुलगाही होता. इकडे ती बाई आपल्याला हवा तसा ताग निवडून काढून त्याचा भाव वगैरे ठरवीत आहे, तों बागेचा दरवाजा उघडा आहे असें पाहून तिचा मुलगा आंत गेला, आणि एका फुललेल्या

गुलाबाचीं फुलें तोडूं लागला; त्यामुळें त्याच्या हातांस कांटे लागून ते रक्तबंबाळ झाले, व तो रडूं लागला. त्याचें रडणें ऐकतां क्षणींच त्याची आई व शेतकऱ्याची बायको धावत त्याच्याकडे गेलीं. "ह्या गुलाबाच्या झाडानें आपलीं सुंदर फुलें दाखवून मला त्यानें फसविलें," अशीं तो त्या झाडास नांवें ठेवूं लागला. त्या मुलाची समजूत करून **आनंदराव** ह्मणाला, "तो तर काय पोरच आहे, आपल्या सारखीं जाणतीं मनुष्यें देखील अशींच केव्हां केव्हां फसतात. जशी गुलाबाची आणि त्याच्या कांट्यांची सांगड असते, त्याप्रमाणेंच सुखाची व दुःखाचीही आहे. अमुक एका-द्या गोष्टींत अतिशय सुख आहे असें समजून आपण त्याचा उपभोग घेण्याविषयीं उतावळे होऊन तिच्यामागें लागतों. पहा, कोणी खेळाच्या किंवा नृत्याच्या नादीं लागतात, व कोणास मद्यपानाचें किंवा दुसरें कोणतें तरी ह्यांपेक्षांही वाईट व लज्जास्पद व्यसन लागून ते बिघडतात. दुर्व्य-सनांची पराकाष्ठा झाली ह्मणजे त्यांना पश्चात्ताप होऊन, ते त्या सुखास तुच्छ मानूं लागतात; ह्मणून आपण सुंदर गोष्टी पाहून भाळून जाऊं नये. आपणास आत्मा आहे व त्याचें तारण झालें पाहिजे. याकरितां आपण इंद्रियांचे स्वाधीन होऊं नये."

दोन दिवस पाऊस पडून गेला असल्यामुळें तिसरे दिवशीं सकाळीं स्वच्छ ऊन पडलें. तेव्हां **आनंदराव** व **शांता** आपल्या बागेंत गेलीं, व गुलछबूच्या झाडांना पहिल्या बाराचीं फुलें नुकत्याच उगवणाऱ्या सूर्याच्या किरणांनीं अतिशय रमणीय दिसत होतीं तीं पाहिलीं. "गुलछबूंना फुलें आलीं का?" ह्मणून घरचीं माणसें **शांतेला** नित्य

विचारीत, तेव्हां तीं आलीं ह्मणून, त्यांस तिनें पहावयास बोलाविलें. तीं पाहून त्या सर्वांना अतिशय आनंद झाला, व तीं म्हणालीं, " किती ही स्वच्छता ! काय ही शुभ्रता ! व ज्यास अल्प देखील दोष ठेवितां येत नाहीं असें हें सौंदर्य ! पहा, ह्यांच्यावर एक देखील डाग नाहीं !" **आनंदराव** म्हणाला, "**ईश्वरा**! मनुष्याचें मन जर इतकें निर्मल असतें, तर त्याकडे पाहून इतर सर्व मनुष्यांना–फार तर काय, देवदूतांना देखील–आनंद होईल. जे शुद्ध मनाचे आहेत त्यांना मात्र स्वर्गाची जोड होते. ह्या गुलछबूचें देंठ किती सरळ आहे ! व तें किती सुरेख रीतीनें वाढलें आहे ! ह्याकडे पाहून, जणूं काय, पृथ्वी बोटानें स्वर्गाकडे दाखवीत आहेसें वाटतें. हें झाड पाहून, मला आनंद वाटतो; व ह्या झाडाशिवाय कोणतीही बाग नसावी. कारण मनुष्याचें मन स्वभावत: ऐहिकविषयांकडे वळतें, व त्यामुळें **ईश्वराची** विस्मृति होते; अशा वेळीं हें सरळ व उंच वाढलेलें गुलछबूचें झाड, त्याकडे पाहिलें म्हणजे, संसारांतल्या दु:खाच्या आणि कष्टाच्या प्रसंगीं, आपण आपलें लक्ष ईश्वराकडे लावावें, व ऐहिक गोष्टींपेक्षां जें कांहीं विशेष चांगलें आहे तें मिळविण्याची इच्छा करावी, असें शिकवितें. झाडें कितीही लहान व नाजूक असलीं तरी उंच वाढतात, व ज्यांना आपण होऊन उंच वाढतां येत नाहीं अशा वेली, जवळ असलेल्या झाडांवर किंवा, आपल्या ह्या कुंपणाजवळ लावलेल्या वाटाण्याप्रमाणें, कुंपणाच्या काठ्यांवर चढतात. अशी जर झाडांची देखील स्थिति आहे, तर मनुष्यांनीं आपल्या मनोरथांत व आशापाशांत गुंतून राहून संसारांतच काळ घालवावा, हें त्यांस अगदीं लाजिरवाणें आहे."

एके दिवशीं **शांता**, एका नवीन केलेल्या वाफ्यांतलें गवत वगैरे उपटून काढीत होती, व **आनंदराव** त्यांत झाडें लावीत होता; त्या वेळेस त्या आपल्या उद्योगास अनुलक्षून तो ह्मणाला, "**शांते**, आपण आयुष्यभर असेंच दुहेरी काम केलें पाहिजे. ईश्वरानें आपणास मन ही बाग दिली आहे; तिच्यामध्यें जें कांहीं चांगलें ह्मणून असेल, त्याची जोपण करण्याचा, व वाईट ह्मणून जें असेल, त्याचें समूळ उन्मूलन करण्याचा निरंतर उद्योग केला पाहिजे; तसें न केल्यास ओसाड जमिनीप्रमाणें त्याची अवस्था होईल. वर सांगितलेलीं आपलीं दोन्ही कर्तव्यकर्में करण्याचा प्रयत्न आपण करावा. व जो आकाशांत सूर्यास प्रकाशवितो, पृथ्वीवर दंव व पाऊस पाडितो, जो वृक्ष वाढवितो व त्यांस रसभरित फळें आणितो, त्या ईश्वराची प्रार्थना करावी ह्मणजे तें नंदनवनाप्रमाणें सुखमय होईल."

अशा रीतीनें निरंतर उद्योग करून व उपदेशपर भाषण करून, **आनंदराव** व **शांता** आपलें आयुष्य घालवूं लागलीं. तीं दोघें तेथें सतत तीन वर्षें आनंदानें राहिल्यामुळें, त्यांस पूर्वीं भोगलेल्या दुःखांची विस्मृति होत चालली. परंतु, हिंवाळा लागून पांढऱ्या व पिंवळ्या शेवतींना फुलें आलीं, व बागेंतील सर्व झाडांचीं पानें पिकून गळायास आलीं होतीं, त्यामुळें ती बाग आपलें सर्व पर्णरूपी ऐश्वर्य एकीकडे ठेवून, विश्रांति घेण्याच्या विचारांत आहे, असें दिसत होतें. आपली शक्ति दिवसेंदिवस खचित क्षीण होत आहे, असें **आनंदरावास** वाटलें, आणि त्यामुळें त्यास अनेक वेळां दुःखही झालें. **शांतेला** दुःख होऊं नये म्हणून, त्यानें ही गोष्ट तिला कळविली नाहीं; परंतु, त्याचे फुलांविषयीं

निघालेले उदासपणाचे उद्गार ऐकून, शांतेच्या मनांत ती गोष्ट अगदीं बिंबून गेली. एके दिवशीं तिनें एक गुलाबाचें फूल पाहिलें, व तें तोडण्याची तिला इच्छा झाली, म्हणून तिकडे जाऊन तें तोडावयास हात घालते, तों तिच्या हातांत त्याच्या पाकळ्या सर्व गळून पडल्या. हें पाहून **आनंदराव** म्हणाला, "मनुष्याचीही अशीच स्थिति आहे, तारुण्यांत आपण नवीन उमललेल्या गुलाबाच्या फुलाप्रमाणें टवटवीत असतों, आणि त्याच्या प्रमाणेंच उत्तर वयांत आपली दशा होते. जसें गुलाबाचें फूल पूर्णपणें फुलतें न फुलतें तोंच तें गळूं लागतें, त्याप्रमाणेंच मनुष्यही प्रौढ वयांत येतें न येतें, तोंच त्याला उतरती कळा लागते. बेटा, यासाठीं शारीरिक सौंदर्याविषयीं कधींही गर्व वाहूं नकोस, कारण तें क्षणभंगुर व निरर्थक आहे. कधींही कमी न होणारें असें आत्मिक सौंदर्य व ईश्वरभक्ति हीं मिळविण्याची निरंतर इच्छा धरीत जा."

एके दिवशीं, संध्याकाळीं, **आनंदराव** एका शिताफळीच्या झाडाला शिडी लावून शिताफळें काढीत होता, व **शांता** तीं खालीं घेऊन एका टोपलींत व्यवस्थेनें ठेवीत होती; इतक्यांत वारा सुटला, तेव्हां **आनंदराव** म्हणाला, "हा गव्हाच्या शेतावरून घों, घों, वाजत येणारा वारा किती थंड आहे! ह्या पिकलेल्या पानांची व माझ्या केशांची हलवून हलवून काय अवस्था करीत आहे पहा! मी म्हातारा झालों व तूंही कांहीं दिवसांनीं होशील. ज्याप्रमाणें हें झाड पुष्कळ व सुंदर फळें देऊन लोकांस सुख देतें, त्याप्रमाणें तूंही आपल्या सद्गुणांनीं लोकांच्या उपयोगीं पड, व ह्या विश्वरूपी बगिचाच्या धन्याला संतुष्ट करण्याविषयीं सदोदित प्रयत्न कर."

एक दिवस **शांता** कांहीं बीं लावीत होती, त्या वेळेस **आनंदराव** तिला म्हणाला—"ज्याप्रमाणें तूं हें बीं जमिनींत पुरींत आहेस, त्याप्रमाणेंच आपल्याला एक दिवस लोक पुरतील, व जमिनीखालीं आपण लपून जाऊं. मग ज्याप्रमाणें पेरलेल्या बीजांत चैतन्य उत्पन्न होऊन, त्यांला अंकुर फुटून, त्यांचीं झाडें होऊन, त्यांला सुंदर फुलें व फळें येतात, त्याप्रमाणें आपणही सजीव होऊन, तेज व ऐश्वर्य यांनीं युक्त होऊन, वर जाऊं. माझ्यामागें तुझा मरणसमय येईल, हें ध्यानांत ठेव. माझ्या थडग्यावर तूं जीं फुलझाडें लावशील त्यांस पुनरुत्थान व अमरत्व यांच्या मूर्त्तिच समज."

प्रकरण १०.

आनंदराव आजारी पडतो.

हिंवाळा लागून पर्वतांवर व दऱ्यांत बर्फ पडूं लागलें, व यंदा थंडी फार कडक पडेल असें ज्याला त्याला वाटूं लागलें होतें. अशा वेळीं **आनंदरावास** दुखणें आलें. त्याच्या दुखण्यांत **शांता** त्यास फार जपत असे. शेतकऱ्याच्या कुटुंबांतील सर्व माणसेंही त्याला फार प्रेमानें वागवीत, व **आनंदरावाच्या** दुखण्यांत त्यांच्या हातून होण्याजोगें काम तीं त्यासाठीं करीत. कोणीही त्याच्या समाचारास आलें तरी **शांता**, "बाबा बरे होतील ना?" असें विचारीत असे. एकदा **शांतेनें** शेतकऱ्यास हा प्रश्न विचारिला असतां तो म्हणाला, "पुढचा वसंतऋतु पार पडेल असें मला वाटत नाहीं." आजपर्यंत वसंतऋतु लागला म्हणजे शांतेला अतिशय आनंद होत असे; परंतु, शेतकऱ्यानें

"वसंतऋतु पार पडणार नाहीं" असें सांगितल्यापासून तिच्या काळजाला धडकी बसली. **आनंदरावाचा** डोळा लागला, किंवा त्याच्या प्रकृतीला कांहीं आराम वाटला, म्हणजे **शांतेला** जरा इकडे तिकडे करायला सांपडे; परंतु ती आपल्या पित्याची खोली सोडून जात नसे. बसून बसून कंटाळाच आला, तर खिडकीशीं जाऊन बागेंतील झाडां-कडे पहात असे. अशा प्रसंगीं वसंतऋतूंत फुलणाऱ्या व फळास येणाऱ्या झाडांवर तिची नजर आधीं जाई, आणि त्या झाडांना कळ्या आलेल्या नाहींत असें पाहून तिच्या मनाला समाधान वाटे; परंतु वसंतऋतु लागला व वृक्षांना नवी पालवी फुटूं लागली व फुलें येऊं लागलीं, आणि कोकिलादि पक्षी बोलूं लागले, तेव्हां तोच वसंतऋतु तिला फार भयंकर वाटूं लागला. ती म्हणे, "हे **देवा**! सृष्टींतील सर्व पदार्थ ह्या ऋतूमुळें पुन: टवटवीत झाले, आणि माझ्या बाबांचें मात्र दुखणें बरें होऊन तेच पुन: हुशार होऊं नयेत काय! छे! छे! हें मी काय ह्मणतें! बाबांच्या पुन-रुत्थानाची आशा नाहीं असें कसें होईल! कारण, **येशूनें** ह्मटलें आहे कीं, "जो मजवर विश्वास ठेवितो, तो मेला असला तरी पुनः उठेल." **शांतेनें** आपल्या पित्याची पर-वानगी घेऊन शेजारच्या गांवांतील वैद्यास आणण्याविषयीं शेतकऱ्यास सांगितलें. त्यानें लागलीच गाडी जुंपली व तसाच वैद्याकडे जाण्यास निघाला. वैद्यानें येऊन **आनं-दरावास** पाहिलें व काढा उतरून दिला. तो जातांना **शांता** त्यास दारापर्यंत पोंचवावयास गेली, व वाटेंत, "बाबा बरे होतीलना?" असें त्यास विचारिलें. "इतक्यांत कांहीं भीति नाहीं, परंतु हें दुखणें क्षयावर जाईलसें वाटतें; व

अशा उतार वयांतलें दुखणें बरें होईलच, असें सांगवत नाहीं"—असें वैद्यानें सांगितलें. हें ऐकून **शांता** फार घाबरली. व अतिशय रडूं लागली. तिचें समाधान कोणाच्यानें करवेना. तथापि बापाकडे जाण्यापूर्वीं तिनें आपले डोळे पुसले, व बापाला वाईट वाटूं नये म्हणून जसें कांहीं कांहीं झालें नाहीं, असें दाखविण्यासाठीं प्रयत्न केला.

सत्कन्येच्या धर्मास अनुसरून **शांता** आपल्या प्रिय पित्याला फार जपत असे, हें कांहीं सांगावयास नकोच; कारण ती सत्कन्याच होती. आपल्या पित्याला काय पाहिजे आहे, हें ती त्याच्या मुद्रेवरून जाणत असे. ती रात्रीच्यारात्री त्याच्या जवळ बसे, व एकादे वेळीं कोणीं तिला,—दुखणें येईल—असें मनांत आणून, घटकाभर पडावयास सांगितलें, तर त्यांच्या भिडेस्तव ती अंथरूणावर लंवडे, परंतु तिचे डोळे निरंतर उघडे असत. **आनंदरावास** किंचित् खोकला आला तरी ती घाबरी होई, व त्यानें जरा चळवळ केली कीं, ती तत्काळ पाय न वाजवितां जवळ जाऊन, "कांहीं बरें आहे ना?" म्हणून विचारी. त्याच्या प्रकृतीला मानवेल असें अन्न मोठ्या काळजीनें ती त्यास तयार करून देत असे. त्यांचें अंथरूण तिनें नीट घालून द्यावें, त्याच्याजवळ बसून करमणुकीकरितां पवित्र शास्त्रांतून कांहीं वाचावें, आणि वारंवार त्याच्याबरोबर **ईश्वराची** प्रार्थना करावी. ह्याशिवाय, त्याला जेव्हां थोडी डुकली लागे, तेव्हां ती अंथरूणाजवळ उभी राहून, आपले अश्रुभरित डोळे वर करून, हात जोडून **ईश्वराचा** धावा करीत असे. तिनें मध्यरात्रपर्यंत बसून शिवणकाम व विणकाम करून मिळविलेले पैसे जपून ठेविले होते, ते या प्रसंगीं आपल्या

बापास जें कांहीं आवडेल तें घेण्यासाठीं खर्चिले. केव्हां केव्हां त्यास बरें वाटे, परंतु आपला अंतकाल जवळ आला, असें तो पक्कें समजला होता, तरी त्याची चित्तवृत्ति शांत व मरणाविषयीं निर्भय होती. तो एक वेळ आपल्या मरणाविषयीं फार शांतपणें बोलूं लागला, तेव्हां, " बाबा, असें बोलूं नका, तुमच्या मरणाविषयींचा विचार देखील मला सहन होत नाहीं. तुमच्या मागें माझी काय दशा होईल ! मग मी पोरकी होईन व ह्या जगांत मला दुसरें कोणी नाहीं असें होईल." असें म्हणून **शांता** रडूं लागली. त्या वेळीं **आनंदराव** तिला पोटाशीं धरून म्हणाला, "बेटा, तूं रडूं नकोस. मी जरी तुला नाहींसा झालों तरी स्वर्गामध्यें राहणारा तुझा एक दयाळू **पिता** आहे, तो तुला कधींही सोडणार नाहीं. तुझा उदरनिर्वाह कसा होईल, ह्याविषयीं मला मुळींच काळजी नाहीं, कारण, 'ज्यानें चोंच केली, त्यानें चाराही बनविला आहे.' पहा ! चिमणी केवढेंसें पांखरूं आहे ! परंतु तिलाही **ईश्वर** चारा देतो, मग तुझ्यासारख्या मनुष्यप्राण्याला तो अन्न देणार नाहीं असें कधीं तरी होईल काय ? ज्या गोष्टीविषयीं मला काळजी वाटते, ती ही कीं, तुला ह्या दुष्ट जगांत रहावें लागणार. बेटा, आजपर्यंत तुला जगाची ओळख नव्हती, ह्यामुळें तें दुष्टपणानें व भ्रष्टतेनें किती भरलेलें आहे व त्यांत दुष्ट लोक किती आहेत, याची कल्पना तुला नव्हती, पण ह्या जगांत दुष्ट व भ्रष्ट लोक फार आहेत. केव्हां केव्हां असे प्रसंग येतात कीं त्या वेळेस आपल्याला वाईट रीतीनें वागावें असें वाटतें, इतकेंच नव्हे, तर पापाचरण फारसें वाईट नाहीं, व तें केलें ह्मणून कांहीं हरकत नाहीं, असें वाटतें ; म्हणून

ह्या मरणकाळीं मी जो तुला उपदेश करीत आहें तो नीट कान देऊन ऐक, व तो निरंतर लक्षांत वागीव. मी जीवंत असतां माझ्या कानावर आल्या असतां तुला लाज उत्पन्न करितील अशा गोष्टी, ह्मणजे दुराचार, दुर्भाषण व दुर्विचार, यांपासून दूर रहा. माझे डोळे आतां लवकरच झांकतील, व तुझें बरेंवाईट आचरण पहाण्यास मी रहाणार नाहीं; तथापि ज्याचे डोळे कधींही मिटत नाहींत, असा आपला सर्वसाक्षी स्वर्गांतील पिता आपल्या मनांतील खोल विचारही जाणतो, हें लक्षांत ठेव." इतकें ह्मटल्यावर कांहीं वेळ दम खाऊन तो पुनः ह्मणाला, "एकादें वाईट कृत्य करून मी जो तुझा इहलोकचा बाप त्याला देखील तूं दु:ख देऊं इच्छीत नसस, तो तूं आपल्या दुर्वर्त्तनानें निरंतर स्वर्गांत रहाणाऱ्या आपल्या पित्याला दुखविण्यास अतिशय भिशील यांत कांहीं संशय नाहीं. शांते, एकदा माझ्याकडे पहा, व माझें या वेळचें निस्तेज मुख व खोल गेलेल्या गालांवर गळणारीं आंसवें हीं पक्कीं लक्षांत ठेव; व जेव्हां तुला वाईट करण्याविषयीं इच्छा उत्पन्न होईल तेव्हां माझें मुख मनांत आण, ह्मणजे माझ्या ह्या उपदेशाचें तुला स्मरण होईल. त्याप्रमाणेंच जवळ येऊन माझ्या रोडक्या व थंड हातांत आपला हात घाल व त्याचेंही तशा वेळीं स्मरण कर. माझे लाडके! माझ्या निस्तेज व खोल गेलेले गालांकडे पाहून तुला रडूं येतें, पण ह्या जगांतील सर्व वस्तु विनाशी आहेत हें समज. पहा, कांहीं वर्षांपूर्वीं हाच मी सशक्त होतों, व तूं हल्लीं ज्या प्रमाणें आहेस त्या प्रमाणेंच मीही नेहमीं ताजातवाना व तेजःपुंज असें. तुझ्यावरही असाच प्रसंग येणार आहे, वसंताबरोबर ज्या प्रमाणें त्या ऋतूंतलीं फुलें नष्ट होतात,

किंवा फुलांवर पडलेलें दंव सूर्योदयानंतर कांहीं वेळ सूर्य-किरणांमुळें शोभित दिसून पुढें लय पावतें, त्या प्रमाणें माझ्या तारूण्यांतले माझे स्नेही, हें जग सोडून गेले आहेत."

जरी **आनंदराव** क्षीण झाला होता, तरी आपला अंतकाळ जवळ आला, तेव्हां आपण आपल्या प्रिय कन्येला शेवटचा उपदेश केला पाहिजे, असें मनांत आणून दुसरे दिवशीं देखील तो मोठ्या आनंदानें तिला उपदेश करूं लागला. तो ह्मणाला—"माझा यजमान आपल्या तरूण वयांतच देशपर्यटन करण्यास गेला होता, त्याबरोबर मीही गेलों होतों; व त्या प्रसंगीं जगाची पुष्कळ माहिती मीं करून घेतली. एकाद्या शहरांत गेल्यावर तेथें रमणीय पदार्थ किंवा सुंदर स्थळें पहाण्याजोगीं असत, तीं आह्मीं जाऊन पहात होतों. त्या प्रमाणेंच अमुक ठिकाणीं मोठ्या सभा भरून तेथें तऱ्हेतऱ्हेच्या विषयांवर ऐकण्याजोगीं संभाषणें होणार असें आह्माला समजलें ह्मणजे, मी व माझा यजमान तेथें जाऊन तीं भाषणें ऐकत असूं. माझा यजमान मोठा सरदार असल्या कारणानें त्याला सर्वत्र मेजवान्या होत असत. त्या प्रसंगीं मलाही बोलावीत असत. अशा रीतीनें आह्मीं बरेंच दिवस सुखांत घालविले. परंतु त्या सुखांपासून माझें समाधान झालें नाहीं. खरें पुसशील तर **सुवर्णपुरींत** एकाद्या मंडपाखालीं किंवा ह्या छपरांत बसून स्वस्थपणें ध्यान करण्यांत व मनोभावानें **ईश्वराची** प्रार्थना करण्यांत जो वेळ गेला, त्याशिवाय इतर कोणत्याही काळीं मला सुखसमाधान वाटलें नाहीं. सदा आनंदमय असा जो आपला त्राता प्रभु **येशु**, त्याची भक्ति व सेवा केल्यानें सुख होतें, ह्मणून तूं त्याची मन:पूर्वक सेवा व भक्ति कर.

असें केल्यानें तो तुला प्राप्त होईल व आशीर्वाद देईल. शांते, माझ्यावर संसारांतील अनेक प्रकारचीं दुःखें आलीं होतीं, हें तुला ठाऊकच आहे. त्यांपैकीं एक–कोणतें ह्मणशील तर–तुझ्या मातेचें मरण. त्या वेळेस मी पुष्कळ दिवस उदासीन झालों होतों, व जशी ओसाड बगीच्यांतील जमीन उन्हाच्या कडाक्यानें फांकून पाऊस केव्हां पडेल अशी वाट पहाते, त्याप्रमाणें माझ्या मनाची स्थिति होऊन माझें समाधान केव्हां होईल असें झालें होतें. माझें समाधान व्हावें म्हणून, मीं पुष्कळ उपाय केले, व सरते शेवटीं ईश्वरापासून तें मला प्राप्त झालें. सर्वत्रांवर असे प्रसंग येतात व तुझ्यावरही येतील, तथापि तूं बिलकुल घाबरूं नको. पहा, उन्हाळ्यांत जमीन उकलून, आ पसरून, पाणी मागते व ईश्वर पर्जन्य पाठवून तिची तृषा शांत करितो, त्या प्रमाणेंच त्याची तूं करुणा भाकलीस, तर तो तुझेंही समाधान करील. जमिनीला पाणी मिळाल्यानें ती जशी टवटवीत होते त्या प्रमाणेंच ईश्वरानें दिलेल्या समाधानामुळें तूंही संतृप्त होशील. ईश्वरावर अढळ विश्वास ठेव, व त्याची प्रीति जोड.

"ईश्वराची ज्याच्यावर प्रीति आहे त्यासाठीं तो सर्व कांहीं करतो. दुःखांच्या द्वारें तो आपणास दुःखांचा ज्यांत लवलेश नाहीं अशा सुखांत नेतो. प्रियंवदाबाईची आंगठी नाहींशी होऊन ती चोरल्याचा आळ तुझ्यावर येऊन आपणाला—आपली जागा परत घेऊन—माझ्या यजमानानें हाकून लावल्यावर, दुसरीकडे कोठें तरी रहावयास जावें म्हणून आपण मार्गक्रमण करीत असतां, कधीं जें मला ठाऊक नव्हतें, अशा चालण्याच्या श्रमामुळें थकून मी रस्त्यांतच पडलों; त्या वेळीं तुला अतिशय दुःख झालें,

हें तुला आठवतच असेल. त्या गोष्टीनें प्रथमतः दुःख झालें खरें, तथापि ह्या सज्जन शेतकऱ्याबरोबर जीं आपण तीन वर्षें सुखानें घालविलीं, त्याचें मूळ कारण तो प्रसंग होय. जर तेव्हां मी आजारी पडलों नसतों, तर आपण ह्यांच्या दाराशीं आलों नसतों, व आपल्याविषयीं त्यांना इतकी करुणाही आली नसती. फार तर काय, तें दुखणें मला त्या वेळेस आलें नसतें तर आज तीन वर्षें जीं आपण परोपकार करण्यांत व सुखांत घालविलीं तीं घालवितां आलीं नसतीं. अशा रीतीनें कोणतेंही दुःख घेतलें, तरी ईश्वरानें त्याच्या बरोबरच सुखही केलेलें असतें. ह्याविषयीं प्रमाणें आपणास सांपडतील. ज्या प्रमाणें पर्वत, दऱ्या, अरण्यें, नद्यांचे कांठ,—फारतर काय, नेहमीं जेथें चिखल असतो अशा दलदली, यांत देखील ईश्वरानें सुंदर फुलें निर्माण करून, आपण जेथें जाऊं तेथें त्याचा चांगुलपणा व प्रेमा सर्वत्र दिसावा, म्हणून तजवीज केली आहे. मनुष्यानें ह्या गोष्टी लक्षांत आणून आपल्यावर प्रीति करावी व आपल्याला पूज्य मानावें म्हणून आपल्या आयुष्यांत घडणाऱ्या सर्व गोष्टींमध्यें देवानें आपलें चातुर्य व आपलें मानवजातीविषयीं प्रेम प्रदर्शित केलें आहे. लक्षपूर्वक पाहिल्यास, कोणाही मनुष्याला ह्या गोष्टी आपल्या आयुष्यांत कळून येतील. तुझ्यावर चोरीचा आळ येऊन, तुझ्या हातापायांत बेड्या घालून तुला बंदीशाळेंत ठेविलें होतें, व तुला बहुतकरून फाशीची शिक्षा होईल असें वाटून मी तुला भेटण्यासाठीं आलों, त्या सारखा दुःखकारक प्रसंग आपणावर कधींही आला नव्हता खरा, परंतु तोच आपणास फार सुखकारक झाला. **मंजुळाबाईनें** इतर मुलींतून तुला निव-

डून काढून तुझ्याशीं स्नेह केला, व तुला शालू देऊन 'तूं निरंतर माझ्या जवळ असावें,' असें तिनें तुला म्हटलें त्या वेळेस तुला निःसंशय अत्यानंद झाला. परंतु आपल्या हिताकडे लक्ष देऊन ही कदाचित् डामडौली, गर्विष्ट, नीच व ऐहिक वस्तूंविषयीं अभिलाष करणारी होऊन, मला विसरेल, असें मनांत आणून ईश्वरानें आपली ती स्थिति बदलून आपणावर तो दुःखाचा प्रसंग आणिला; त्या वेळेस आपणास हें सुख प्राप्त होईल, असें वाटलें नव्हतें. तुरूं-गांत, दारिद्र्यांत व इतर दुःखकारक अवस्थांमध्यें तो निरंतर आपणाजवळ होता, व त्यानें भ्रष्ट जनांचा व आपला संबंध तुटावा, ह्मणून पूर्वीपेक्षां सर्व गोष्टींनीं अधिक चांगल्या अशा ह्या ठिकाणीं आपणास आणून ठेविलें. जेथें मनुष्याचा वासही नाहीं, अशा एकाद्या ठिकाणीं ज्या प्रमाणें एकाद्या झाडाचें सुंदर पुष्प विकसित होऊन, त्या स्थलास शोभा आणितें, व त्याला त्या ठिकाणीं मनुष्याचें वारेंही लागण्याची भीति नसते, त्याप्रमाणें तुझी हल्लींची स्थिति आहे. आपण जें दुःख भोगिलें, त्याच्याशीं तुलना करून पहातां अतिशय सुख जींत आहे, अशी स्थिति आपणास देण्याचें त्या कृपाळु **परमेश्वराचे** मनांत आहे; व त्याप्रमाणें तो ती आपणास देतही आहे. ती अति सुखाची अवस्था–तूं निरपराधी आहेस असें सिद्ध झालें ह्मणजे–तुला प्राप्त होणार आहे. तुला ह्मणण्याचें कारण, त्या वेळेस मी असणार नाहीं, परंतु तुझा निरपराधीपणा खचित सिद्ध होईल, कारण **ईश्वरानें** माझा धावा ऐकिला आहे, व तो प्रसंग येण्याच्या पूर्वी देखील मला सुखानें मरण येईल. **शांते**, जें दुःख तूं आजपर्यंत भोगिलें आहे, तेंच इहलोकच्या तुझ्या सौख्यास

कारण होईल; व स्वर्गास जाण्याचा मार्ग दुःखाशिवाय नाहीं, म्हणून ईश्वरानें हीं संकटें आपणावर आणिलीं, हेंही तुला समजेल. कोणतीही विपत्ति तुझ्यावर आली, तरी घाबरूं नको, कारण दयाळु ईश्वराची तुजवर सर्वदा दृष्टि आहे, व कोणत्याही स्थितींत त्यानें तुला ठेविलें तरी, त्याची नजर तुझ्यावर असली म्हणजे झालें. कितीही वाईट स्थिति तुझ्यावर आली तरी, 'मला जरी दुःख होत आहे तरी ह्या स्थितींत मला पुष्कळ लाभ आहे, व ती फारच चांगली आहे,' असें ह्मणत जा. मीं बोलतों तें दिसण्यांत विरुद्ध दिसतें खरें, तथापि मनुष्यावर दुःखाचे प्रसंग आल्याशिवाय त्याच्या गुणांची पूर्णता होत नाहीं, या न्यायानें तुझ्यावर आलेल्या दुःखांनीं तुझे सद्गुण प्रगट होतील, व ज्या प्रभु येशूनें आमच्या तारणासाठीं आपला प्राण दिला, त्याच्या इच्छेप्रमाणें वागण्यास दुःखाच्या स्थितीशिवाय कोणतीही स्थिति विशेष अनुकूळ नाहीं."

एवढा वेळ बोलण्याच्या श्रमानें **आनंदरावास** मूर्छना आली व तो पडला. कांहीं वेळानें सावध झाल्यावर तो पुनः बोलूं लागला—" माळी ज्या प्रमाणें ज्या त्या झाडाला योग्य अशी जागा पाहून तेथें तीं लावितो, व त्यांच्या वाढीला अनुकूल उपचार करितो, त्याप्रमाणें ईश्वर आपल्या भक्तांस अशा स्थितींत ठेवितो कीं, ती त्यांना हितावह होऊन, त्यांची पवित्रता वृद्धि पावते. बये, जीं जीं संकटें तुझ्यावर आलीं, तीं तीं टाळून ज्या प्रमाणें ईश्वरानें तुला सुख दिलें, त्या प्रमाणेंच तो ह्या माझ्या शेवटच्या दुखण्यानंतर व मरणानंतर तुला सुख देईल. मी आपल्या मरणाविषयीं बोलत असतां तुला रडूं यावें, हें साहजिक आहे; परंतु मरण

ह्मणजे मोठा बाऊ आहे असें नाहीं. अगे, तूं रडतेस कां? रडण्याचें कांहीं कारण नाहीं. मनुष्याची स्थिति नवीन उगवलेल्या अंकुरासारखी आहे. पहा! मृगनक्षत्र लागलें ह्मणजे जमिनींत बीं पेरितात, व पाऊस पडला ह्मणजे त्याला अंकुर येतात; हे अंकुर प्रथमत: लहान व निर्मल असतात, व त्या वेळेस त्यांपासून उत्तम पुष्पें किंवा फळें येतीलच असें ठाऊक नसतें. आणि खरोखरच रोप केल्या जागीं जर तसेंच राहूं दिलें, तर त्यास गर्दीमुळें वाढण्याची किंवा पुष्पें फळें येण्याची आशा थोडीच असते. त्याला चांगली प्रशस्त जागा पाहिजे ह्मणूनच माळी त्यास जेथल्या तेथें न ठेवितां, जेथें त्याला चांगली हवा व ऊन लागेल, अशा चांगल्या ठिकाणीं तें नेऊन लावितो. तेथें पावसाचें पाणी व दंव ह्यांनीं तें चांगलें वाढतें, व त्याला चांगलीं पानें येऊं लागतात. ह्याचा अनुभव तुला आहेच. त्या रोपाप्रमाणें आपली स्थिति आहे. ह्या पृथ्वीरूपी लहानशा वाफ्यांत **ईश्वरानें** आपणाला उत्पन्न केलें आहे; व रोपाची स्थिति तशीच आपलीही ह्या स्थळीं आहे. आपली ही कायमची जागा नव्हे, व आपल्याला कांहीं ऐश्वर्याची स्थिति यावयाची आहे आणि **ईश्वर** स्वर्गरूपी मोठ्या व सुंदर बागेंत आपणास नेतो, याचें कारण तरी हेंच. असें नसतें तर मला या जगांतून जाण्यास दु:ख वाटलें असतें. अहाहा! आपल्या **त्रात्या**कडे मी आतां लवकरच जाणार ह्मणून मला किती तरी सुख होत आहे! ज्या शरीरापासून ह्या जगांत इतकीं पापें घडतात, तें शरीर सोडून गेल्यावर मला निरंतर **खिस्ताचा** सहवास घडेल! वसंतऋतूंत एकेदिवशीं आपण आपल्या बागेंत गेलों असतां, तिची रमणीयता पाहून

आपणाला अतिशय आनंद झाला, तें तुला आठवतें काय? मी स्वर्गरूपी मोठ्या बागांत जाणार आहें व तेथें तर वसंतऋतूशिवायें दुसरा ऋतुच नाहीं, ह्यावरून मी किती सुखांत जाणार आहें ह्याची कल्पना तुझ्या मनांत येईल. बये, तुला जर त्या रमणीय स्थळीं येण्याची इच्छा असली तर ईश्वराची सेवा निरंतर करीत जा, ह्मणजे तूं तेथें येशील व तुझी माझी पुनः भेट होईल. ज्यास सर्व लोक भितात, त्या मरणाविषयीं मी इतक्या समाधानानें बोलतों ह्याचें तुला आश्चर्य वाटूं देऊं नको. कारण, इहलोकीं आपण एकत्र असलों तरी अनेकविध संकटें आपणावर येतात, व शोक आणि रडणें ह्यांचें कारण जो वियोग, त्याची भीति आपणास असते. स्वर्गींची स्थिति ह्याच्या उलट आहे; तेथें सर्व अबाधित सुखांत एकत्र असतात, व शोकोत्पादक वियोगाचें भय मुळींच नसतें. शांते, निरंतर ईश्वरभजन करीत जा व ईश्वरकृपेनें इहलोकीं सुखाची स्थिति प्राप्त झाली, तर त्या क्षणभंगुर सुखांत गर्क होऊन, अविनाशी सुख आपणास पुढें प्राप्त व्हावयाचें आहे, त्याचें विस्मरण होऊं देऊं नको. अशा रीतीनें तूं वागलीस म्हणजे शेवटीं आम्हा दोघांस तूं स्वर्गांत खचित भेटशील. तर आतां, बेटा, रडायाचें सोडून देऊन, व पुढें होणाऱ्या सुखावर दृष्टि देऊन, समाधान पाव. बेटा, माझ्या ह्या बोलण्यामुळें तुला पुष्कळ दुःख झालें व तुझ्या डोळ्यांतून पुष्कळ अश्रु गळाले खरे, पण ही समाधान मानण्याजोगी गोष्ट आहे; कारण अशा वेळीं केलेला उपदेश मृग लागल्यावर पेरलेल्या बीजाप्रमाणें फलद्रूप होतो."

ह्या प्रमाणें उपदेश करून आपल्या-आपण परलोकास गेल्यामुळें एकटी रहाणाऱ्या–कन्येचें हित चिंतणाऱ्या पित्यानें तिचें सांत्वन केलें; व नांगरून तयार केलेल्या जमिनींत योग्य काळीं टाकलेल्या बीजाप्रमाणें त्याचें हें बोलणें फलद्रूप झालें.

प्रकरण ११.

आनंदरावाचा मृत्यु.

आतां आपला बाप फार दिवस जगत नाहीं अशी **शांतेची** खातरी झाली तेव्हां तिनें शेजारच्या गांवीं जाऊन, तेथें रहाणाऱ्या धर्मोपदेशकास ही गोष्ट कळविली. हा उपदेशक फार धार्मिक असून त्याचें आचरण कित्ता घेण्याजोगें होतें. त्यानें पुष्कळ वेळां **आनंदरावाची** भेट घेतली. त्यांची भेट होई तेव्हां त्या उभयतांचें धर्मसंबंधीं संभाषण होई, त्यामुळें **आनंदराव** समाधान पावत असे, व प्रत्येक वेळीं, बाप जसें आपल्या कन्येचें सांत्वन करितो त्याप्रमाणें, तो उपदेशक **शांतेचें** करीत असे.

एके दिवशीं तिसऱ्या प्रहरीं उपाध्याय आले असतां **आनंदरावानें** आपण फारच क्षीण झालों, असें समजून **शांतेला** सांगितलें कीं, "बेटा, जरा बाहेर बस जा, मला गुरूजींपाशीं कांहीं बोलावयाचें आहे." त्यावर **शांता** बाहेर गेली. थोड्याच वेळानें **आनंदरावानें** तिला परत आंत बोलाविलें व ह्मणाला, "**शांते**, मीं आपल्या सर्व सांसारिक कृत्यांची व्यवस्था केली व आतां मी हा लोक सोडून **ख्रिस्ताजवळ** जाण्यास तयार झालों आहें." हें ऐकून, **शांतेला**

फार वाईट वाटलें, व आतां आपल्या पित्याचा अंतकाल खचित अगदीं जवळ आला असें वाटून नेत्रांत आलेला अश्रूंचा लोट तिच्यानें आवरेना; तथापि आपल्या पित्यास आपल्या रडण्यानें दुःख होऊं नये, ह्मणून तिनें तो मोठ्या प्रयत्नानें दाबून धरिला. राहिलेला सर्व दिवस **आनंदरावानें** कोणाशीं विशेष न बोलतां प्रार्थनेंत व पारमार्थिक विचारांत घालविला. दुसऱ्या दिवशीं धर्मोपदेशकानें **ख्रिस्ताच्या** मरणाचे स्मारक पदार्थ ह्मणजे भाकर आणि द्राक्षारस हे **आनंदरावास** आणून दिले. विश्वास, प्रीति, आणि अनंत जीवनाची आशा, ह्यांमुळें त्या वृद्ध मनुष्याच्या तोंडावर स्वर्गसुखाचें तेज चमकूं लागलें, व **ईश्वरभक्तीनें** त्याच्या डोळ्यांतून प्रेमाश्रु वाहूं लागले. इकडे **शांता** जवळच गुढगे टेकून प्रार्थना करीत होती. त्या वेळेस तिच्या अंगाला कंप सुटला होता व डोळ्यांतून अश्रुधारा चालल्या होत्या. शेतकऱ्याचें सर्व कुटुंब तेथेंच होतें; त्यांस **शांतेच्या** समंजसपणाविषयीं फार समाधान वाटलें, व सर्व रडूं लागलीं. शेतकरी व त्याची स्त्री 'आह्माला ह्यांच्या स्नेहाचा अलभ्य लाभ झाला व हे आमच्या येथें आले तो सुदिनच ह्मणावयाचा,' असें ह्मणालीं. कांहीं वेळानें **शांता** म्हणाली, "माझें मन आतां शांत झालें; 'धर्मांत अंतकाळीं परमानंद होतो,' असें जें ह्मणतात त्याचा मला अनुभव आला."

त्याच रात्रीं, **शांता आनंदरावाच्या** अंथरुणाजवळ बसली असतां, व खोलींत खिडकींतून चांदणें इतकें स्वच्छ पडलें होतें कीं आंत लावलेल्या दिव्याचें तेज त्यापुढें लोपत होतें, अशा शांत वेळीं **आनंदराव** कण्हत ह्मणाला, "प्रिय

शांते, पुनः एकदा ती **प्रभू**ची प्रार्थना वाच पाहूं!" **शांतेनें** मेणबत्ती लाविली व वाचूं लागली. तिचें वाचणें झाल्यावर **आनंदरावानें** तें नव्या कराराचें पुस्तक मागून घेतलें, व "दिवा थोडा मजजवळ कर" ह्मणून सांगितलें. "बेटा, मी आतां जाणार; तेव्हां बहुतकरून मी आतां करणार आहें, ही माझी शेवटचीच प्रार्थना आहे ह्मणून तूं तिजकडे लक्ष दे," असें ह्मणून त्यानें प्रार्थना केलीः—

"हे **देवा**! जगती**पित्या**! बहु नसे आतां मला वाचणें
येणें त्वत्पदपंकजाजवळ तें आहे त्यजूनी जिणें।
साजे **तारक** नांव हें तुज **विभो**! कन्येस ह्या यास्तव
तारीं भ्रामक पापसिंधुमधुनी **ईशा**! करीतों स्तव ॥ १ ॥
पापापासुन रक्षिली प्रिय सुता म्यां आजपर्यंत ही
मी येणार परंतु पादकमलीं तूझ्या त्यजूनीं मही।
तेव्हां ज्या विषयांमुळें अहित तें होईल हीचें, असे
देवा ही विषयां त्यजो ; 'जवळ ने,' ऐसें ह्मणावें कसें॥ २॥
त्वद्वाणी अति सत्य पूतहि तिचा आधार राहो हिला
कन्या जी दिधली तुवां मजप्रती स्वर्गस्थ **ताता**! तिला।
येशू तात! मदीय, मार्फत **विभो**! त्याच्या जसा जातसें
मी, त्यावें ममकन्येसहि तुवां स्वर्गास अंतीं तसें ॥ ३ ॥

तथास्तु." असें **आनंदरावानें** म्हटल्यावर **शांतेनें**ही 'तथास्तु' असें म्हटलें, त्या वेळेस अश्रुजलानें तिला स्नान घडलें. **आनंदराव** आणखी ह्मणाला, "जगाच्या आरंभापासून, ज्या लोकाचा **येशू** राजा आहे, त्या लोकांत निश्चयें-

करून आपली पुनः भेट होईल." इतकें बोलून त्यानें उशीवर फिरून आपलें डोकें टेंकलें. त्या वेळीं तें पुस्तक तसेंच त्याच्या हातीं होतें. कांहीं वेळ गेल्यावर फिरून **आनंदराव** ह्मणाला, "बेटा, मी आजारी पडल्यापासून मला फार चांगली जपलीस, व ह्यामुळें त्वां पांचवी आज्ञा चांगली पाळिली. आतां तुझा हा पिता परलोकीं जाणार त्याच्यानें तुझे कोड पुरविलें जाणार नाहीं, तथापि आपल्या स्वर्गवासी पित्यावर विश्वास ठेव, ह्मणजे तो तुला चांगलें फळ देईल. तुला सोडून ह्या जगांतून मला गेलेंच पाहिजे, परंतु विदेशी व दरिद्री झाल्यामुळें माझा आशीर्वाद व हें धर्मपुस्तक ह्यांशिवाय मजजवळ तुला देण्याजोगें कांहीं नाहीं. निरंतर धर्मशील व सदाचरणी झालीस तर, माझा आशीर्वाद फलद्रूप होईल. सद्गुणी मुलाला, ईश्वरावर ज्याचा विश्वास आहे अशास, पित्याच्या आशीर्वादाशिवाय मोठी जिनगी दुसरी कोणतीही नाहीं. ज्यामुळें माझी आठवण तुला नित्य होईल, असें हें पुस्तक तूं घे. हें पुस्तक विकत घेण्यास मला फारसे पैसे पडले नाहींत खरे, तथापि, तें मनःपूर्वक वाचून त्यांत केलेल्या उपदेशाप्रमाणें वागशील, तर 'बाबांनीं ही मला मोठी संपत्ति दिली,' असें तुला वाटेल. वसंतऋतूंत झाडांना जितकीं पानें फुलें येतात तितकीं सोन्याचीं नाणीं मीं तुला दिलीं असतीं, तरी तीं सारीं खर्चून, याहून विशेष चांगला एकही पदार्थ घेतां आला नसता, कारण, ह्या पुस्तकांत ईश्वरप्रणीत अमूल्य वाक्यें आहेत. हजार कामें एकीकडे ठेवून हें पुस्तक दररोज सकाळीं वाचीत जा. त्यांतला लहानसा भाग वाचला तरी चिंता नाहीं; तो ध्यानांत ठेवून त्याजविषयीं दिवसभर

विचार करीत जा. ह्या पैकीं मला कांहीं समजलें नाहीं तर, त्याचा 'पवित्र आत्म्याकडून बोध होऊं दे' म्हणून मी **ईश्वराची** प्रार्थना करीत असें, त्याप्रमाणें तूंही कर. जें कांहीं अत्यंत महत्त्वाचें ह्मणून आहे, तें सर्वांस समजण्याजोगें आहे; तर तें लक्षांत धरून त्याप्रमाणें आचरण कर, म्हणजे **ईश्वराचा** प्रसाद आपणावर होतो. 'रानांतील फुलझाडें कशीं वाढतात हें लक्षांत आणा,' ह्या उपदेशापासून मी आपल्या तारूण्यांत वाचलेल्या पुस्तकांवरून झालेल्या ज्ञानापेक्षां मला विशेष ज्ञान प्राप्त झालें; इतकेंच नाहीं, तर त्यापासून मला हजारों सुखें प्राप्त झालीं, व त्या उपदेशामुळें माझ्या चित्तांत शांति व **ईश्वरानें** जें केलें तें चांगलेंच केलें, असा भाव उत्पन्न झाला. तो झाला नसता तर माझ्यावर आलेल्या अनेक दुःखांच्या प्रसंगीं मी फार उदास व निरंतर चिंताग्रस्त होऊन माझें धैर्य अगदीं खचून गेलें असतें."

पहाटेस तीन वाजण्याच्या सुमारास **आनंदरावाची** कठिण अवस्था दिसली, व तशा स्थितींतच त्यानें **शांतेला** खिडकी उघडण्यास सांगितलें. **शांतेनें** खिडकी उघडली. त्या वेळेस चंद्र मावळला होता व आकाश स्वच्छ असून सर्व तारे प्रकाशमान असल्यामुळें त्याची भव्य शोभा दिसत होती. **आनंदराव** तिकडे पाहून ह्मणाला, "ह्या वेळेस आकाश किती शोभायमान दिसत आहे; इहलोकीं एक दिवस मात्र ज्यांची शोभा रहाते, अशा फुलांची तारांगणांतल्या कधींही तेज कमी न होणाऱ्या नक्षत्ररूपी पुष्पांशीं तुलना केल्यास तीं किती हीन दिसतात! बये, मी आतां तेथें जाणार त्यामुळें मला अवर्णनीय आनंद होत आहे." ह्या

नंतर—'ये, प्रभु **येशू**! लवकर ये!' असें ह्मणून **आनंदराव** बिछान्यावर पडला, आणि ख्रिस्ती मनुष्याचा अंतकाळ जसा उक्त असतो त्या प्रमाणें त्याचा झाला.

आनंदरावाचा अंतकाळ इतका जवळ आला होता, ह्याची तिला कल्पना देखील नसल्यामुळें व तिनें कधीं कोणास मरतांना पाहिलें नसल्यामुळें, बापाला मूर्छा आली असें तिला वाटलें; तथापि असें एकाएकीं काय झालें म्हणून भिऊन तिनें शेतकऱ्याच्या सर्व माणसांस जागें केलें. तीं तत्क्षणीं **आनंदरावा**जवळ आलीं आणि पहातात तों त्याचा जीव निघून गेला आहे. हें वर्तमान **शांते**ला कळतांच तिनें धाडदिशीं आपल्या पित्याच्या अंगावर आपलें अंग टाकिलें, व त्याला मिठी घालून त्या सुरकुतलेल्या निस्तेज मुखाचें चुंबन करून रडूं लागली, व आक्रोश करून ह्मणाली, "बाबा! अहो बाबा! आजपर्यंत जे तुमचे माझ्यावर अनंत उपकार झाले आहेत, त्यांची फेड मीं कशी करावी! ती माझ्या हातून कधींही होणार नाहीं! आतां जें कधीं उघडणार नाहीं त्या ह्या तुमच्या मुखांतून निघालेले सुशब्द व सदुपदेश ह्यांबद्दल तुमचे आभार मात्र मला मानतां येतील, दुसरें कांहींही माझ्या हातून होणार नाहीं!" त्याचा थंडगार पडलेला हात उचलून त्याचें चुंबन घेऊन ती म्हणाली, "ह्याच हातानें मला कुरवाळलें आहे, व माझ्या हितासाठीं अनेक गोष्टी केलेल्या आहेत! ह्याच क्षणीं मला मरण येईल तर मी बाबाबरोबर स्वर्गास जाईन! पण तें कसें घडणार! तथापि, **ईश्वरा**! म्यां यावज्जीव नीतिमान् राहून मरावें! ह्या क्षणभंगुर संसारांत कांहीं हाशील नाहीं अशी माझी पक्की खातरी झाली आहे. जेथें अमरत्व

प्राप्त होतें, अशा स्वर्गीत किती तरी सुख असेल बरें! ह्या विचारानें मात्र माझ्या मनाचें समाधान होतें!" असा हृदयद्रावक विलाप, ती एकसारखा करीत होती. शेवटीं शेतकऱ्याच्या बायकोनें तिचें अनेक प्रकारें समाधान करून तिला थोडें अंथरूणावर पडावयास सांगितलें. उत्तरकार्याची तयारी होईपर्यंत **आनंदरावाचें** प्रेत तसेंच होतें, व तोंपर्यंत **शांता** त्यापासून हलली देखील नाहीं. तेथें बसून ती मधून मधून धर्मपुस्तक वाची, मधून मधून प्रार्थना करी, व मधून मधून रडे. **आनंदरावाला** ज्या पेटींत घालून पुरावयाचें होतें त्या पेटीचें तोंड बंद करण्यापूर्वीं **शांतेनें** एकवार त्याजकडे पाहून घेतलें, व पाहतांना म्हणाली, "बाबा! ज्या तुमच्या मुखाकडे पाहिल्याबरोबर मनांत पूज्यबुद्धि उत्पन्न होत असे, त्या ह्या तुमच्या मुखाचें हें शेवटलें दर्शन ना!! ज्या सुखांत तुम्हीं लवकरच जाणार त्या सुखाच्या अनुभवापासून होणारा जो आनंद, त्यानें जसें एकाद्याचें मुख सुप्रसन्न दिसावें, त्याप्रमाणें तुमचें हास्ययुक्त वदन दिसत असे! बाबा! ज्या शांत रीतीनें देवदूत तुमच्या आत्म्याला अक्षय विश्रांतींत नेत आहेत, तशाच शांततेनें तुमचें हें शरीर धरित्रीमातेच्या उदरांत राहो!"

शांतेनें रंगारंगाचीं गुलाबांचीं फुलें तोडून आणून, एक गुच्छ तयार केला होता, तो आपल्या पित्याच्या छातीवर ठेवून ती म्हणाली, "बाबा! तुम्हाला फुलझाडांची फार आवड असे, व म्हणूनच तुम्हीं आजपर्यंत हजारों फुलझाडें लाविलीं; तुम्हांला मी हा पुष्पगुच्छ अर्पण करितें. तुमच्या पुनरुत्थानाच्या वेळेस तुम्ही ह्या फुलांसारखे टवटवीत होऊन उठाल अशी मी आशा करितें; आणि **ईश्वराचें** मला

विस्मरण होणार नाहीं ह्याविषयीं ह्यांतील फुलें साक्ष देतील."
आनंदरावाचें प्रेत पेटींत घालून बंद करण्याच्या वेळेस **शांतेला** दुःखाचा एवढा उमाळा आला कीं, त्यामुळें ती बेशुद्ध होऊन पडण्याची वेळ आली होती, पण शेतकऱ्याच्या बायकोनें तिला दुसऱ्या खोलींत नेली, व तिचें सांत्वन करून तिला अमळ अंथरुणावर पडायला सांगितलें.

पुरावयाच्या जागीं नेण्याकरितां जेव्हां ती पेटी काढिली तेव्हां **शांताही** मागून निघाली. त्या वेळेस तिचें मुख निस्तेज व फिकें दिसत होतें; त्या वेळेस मातापितरांवांचून व विदेशी झालेल्या त्या पोरक्या **शांतेला** पाहून सर्वांला फारच कळवळा आला.

आनंदराव त्या गांवांतला रहिवासी नसल्या कारणानें श्मशानाच्या एका कोपऱ्यांत भिंतीजवळ त्याला पुरलें. ह्या भिंतीजवळ दोन देवदारुवृक्ष होते. त्यांची छाया त्या जागेवर पडत असे.

त्या वेळीं उपाध्यानें चित्तवेधक उपदेश केला. "गव्हाचा दाणा भूमींत पडून पेरला नाहीं, तर तो एकटाच रहातो; परंतु पेरला, तर तो बहुत पीक देतो," हें **येशुख्रिस्ताचें** वाक्य विषयभूत धरून त्या उपदेशाच्या शेवटीं उपाध्यानें **आनंदरावाच्या** शांतीची व सहनशीलतेची फार वाखाणणी केली, आणि ह्याचा कित्ता सर्वांनीं वळवावा असें सांगितलें. दुःखसागरांत बुडालेल्या **शांतेचें** समाधान करून शेतकरी आणि त्याची बायको ह्या दोघांनाही, "तुह्मीच आतां हिचीं मातापितरें व्हा, व हिचा पिता जीवंत असतां जितकी हिच्यावर आणि त्याच्यावर तुमची प्रीति होती, तितकी ह्या एकटीवर करीत जा" असें सांगितलें.

जेव्हां जेव्हां **शांता हिंगण्यां**तल्या देवळांत जाई, तेव्हां तेव्हां जेथें आपल्या पित्याला पुरलें होतें, तेथें जाण्यास चुकत नसे. प्रत्येक रविवारीं संध्याकाळीं जेव्हां ती तेथें जाई, तेव्हां आपल्या प्रिय पित्याची आठवण करून रडत बसे. "येथें येऊन मी जी प्रार्थना करितें तशी कोठेंही होत नाहीं. येथें असतां मला सर्व जग नाहींसें वाटतें, व मी आपल्या पित्यासह स्वर्गांतच आहें असा मला भास होतो. **हे देवा**! ह्या जगांतील दु:खांला मी कंटाळलें. आतां मला तुझ्याजवळ कधीं स्थळ मिळेल, असें झालें आहे!"— असे उद्गार तिच्या तोंडांतून तेथें निघत, व ह्या जगांतील उपभोग तुच्छ मानून ईश्वरभजनांत काळ घालवावयाचा असा दृढ निश्चय केल्याशिवाय ती तेथून उठत नसे.

प्रकरण १२.

शांतेवर नवीं संकटें येतात.

आनंदरावाचा काळ झाल्या दिवसापासून **शांता** निरंतर उदासीन दिसे. तिच्या दृष्टीला सर्व पुष्पांची शोभा नाहींशी झाली, आणि देवदारुवृक्षही माझ्या पित्याच्या वियोगदु:खामुळें दु:ख करीत आहेत, असें तिला वाटूं लागलें. दिवसें दिवस तिचें दु:ख कमी कमी होत गेलें **खरें; परंतु** "छिद्रेष्वनर्था बहुलीभवंति" या न्यायानें तिच्यावर नवीन संकटें ओढवलीं.

आनंदरावास देवाज्ञा झाल्यानंतर त्या पर्णकुटिकेंत पुष्कळ फेरफार झाले. त्या शेतकऱ्यानें आपला सर्व जमीन-

जुमला आपल्या सुस्वभाव व मनमिळाऊ एकुलत्या एक मुलाच्या नांवानें करून दिला. ह्या मुलानें त्यापूर्वी कांहीं दिवस लग्न केलें होतें; परंतु त्याला त्याच्यासारखी सुस्वभाव बायको मिळाली नव्हती. ती सुस्वरूप असून तिजजवळ पुष्कळ द्रव्य होतें खरें, परंतु तिला आपल्या सौंदर्याचा गर्व असे व तिला द्रव्याचा फार लोभ होता. ह्यामुळें हळूहळू तिच्या मुखाचें सौंदर्य जाऊन तिची मुखचर्या इतकी कठोर झाली होती कीं, तिच्याकडे पहावेंसें देखील वाटेनासें झालें. तिची धर्मावर मुळींच श्रद्धा नव्हती; व धर्माचें बंधन नसल्यामुळें ज्या गोष्टीनें आपल्या सासूसासऱ्यांस दुःख होईल ती गोष्ट ती करीत असे. फार तर काय, एकादे वेळेस त्यांबरोबर केलेल्या करारप्रमाणें त्यांस अन्न घेऊन जाण्याचा तिला प्रसंग आला, तर ती हातपाय आपटीत व कपाळाला आंठ्या घालून जात असे. ह्या जाचामुळें तीं बिचारीं मागीलदारीं एका लहानशा खोलींत रहात व पुढल्या दारीं कधीं येत नसत. सासूसासऱ्यांलाच तिचा त्रास होत होता असें नाहीं. तिच्या नवऱ्याचीही तीच स्थिति होती. त्यानें ऐकूं नये अशीं दुरुत्तरें त्या दुष्ट स्त्रीनें बोलावीं, व आपण आणलेल्या धनाचा दिमाख मारावा. न भांडतां दिवस घालवावा असें त्याच्या मनांत आल्यास, त्याला ती बोलेल तें मुकाट्यानें सोसून घेतल्याशिवाय गत्यंतर नसे. हा घरांतून कांहींतरी नेऊन आपल्या आईबापांस देईल, अशा भीतीनें ती त्याला त्यांस भेटावयास देखील स्वस्थपणें जाऊं देत नसे. आपलें काम आटपून संध्याकाळीं तो आल्यावर त्यांजवळ जाण्यास तिच्या धाकामुळें त्याला भय वाटे. जेव्हां जेव्हां तीं त्याच्या नजरेस पडत, तेव्हां

एकाच बाकावर एकमेकांजवळ बसून दुःख करीत आहेत असें त्याच्या दृष्टीस पडे. तोही त्यांच्याजवळ जाऊन बसून आपल्या दुर्दैवाविषयीं बोलत असे; तेव्हां त्याच्या वृद्ध पित्यानें म्हणावें, "बाबा, तूं म्हणतोस तें खरें, पण त्याला आतां उपाय काय? तिच्या द्रव्याला व सौंदर्याला तूं अगदीं भुलून गेलास, व मींही चांगला विचार न करतां तुझ्या म्हणण्यास अनुमोदन दिलें. त्याचें हें फळ आपण भोगीत आहों. आनंदरावाचे सांगण्याप्रमाणें आपण वागलों असतों, तर बरें झालें असतें; तो वृद्ध असल्यामुळें त्याला ह्या जगाचा पुष्कळ अनुभव होता. तो जीवंत असतां, त्यानें हा जोडा कधींही पसंत केला नाहीं. तो ह्याविषयीं जें कांहीं बोलला तें अक्षरशः माझे लक्षांत आहे, आणि त्याविषयीं मीं पुष्कळ वेळां विचारही केला आहे. त्यानें ह्या जोड्याविषयीं निषेध केल्यावर तूं, 'हजार रुपयांची रकम चांगली नाहीं काय?' असें एक दिवस ह्मणालास, त्यावर 'चांगली रकम कशाची? तुमच्या बागेंतलीं फुलें त्या हजार रुपयांपेक्षां हजारपट चांगलीं आहेत. ही रकम मोठी व जड आहे असा ह्मणण्याचा तुमचा भाव असला तर न जाणों, तें मी कबूल करितों, परंतु त्याच्या भारानें जमिनीपर्यंत वांकल्यामुळें ईश्वराकडे डोकें उचलून पहातां न येई, इतका हतभाग्य न होण्याचें सामर्थ्य याच्या अंगांत आहे का? तें सामर्थ्य त्याच्या अंगीं नाहीं, तर इतक्या पैशाची इच्छा कां करावी? तुह्माला कोणत्या गोष्टीची वाण नाहीं, इतकेंच नव्हे, तर तुम्हांला पुरून उरेसें तुमच्याजवळ आहे. दुसरी अशी गोष्ट पहा कीं, पाऊस अवश्य व उपयोगी आहे, तथापि तो फार झाला असतां, त्यापासून चांगल्या झाडां-

चाही नाश होण्याची भीति असते; त्याप्रमाणेंच पुष्कळ पैशापासून नफा न होतां गर्व येतो.'—असें तो ह्मणाला तें तुला आठवतें ना? आपल्या त्या स्वर्गवासी वृद्ध मित्राचे असेच शब्द होते, आणि ते अद्यापिही माझ्या कानांत घुमत आहेत. तूंही एकदा त्याला ह्मणाला होतास कीं, 'ती फार सुरेख आहे व तिच्या सौंदर्याची व तरतरीची उपमा गुलाबाचें फूलच होय.' त्यावर त्या सुज्ञ व वृद्ध मित्रानें उत्तर दिलें, 'मुला, फुलांशीं मनुष्याच्या सौंदर्याची तुलना करणें योग्य नाहीं. कारण फुलें नुसतीं सुरेख नाहींत, तर तीं सुरेख असून निरुपद्रवी व परोपकारशील असतात. त्यांपासून आपणास अनेक फायदे होतात, मधमाशा त्यांपासून निर्मळ मेण व मध उत्पन्न करितात. कागदावर काढलेल्या गुलाबाच्या फुलाप्रमाणें धर्मशून्य बाह्यसौंदर्य आहे; कारण, एकतर, तो यःकश्चित् व निर्जीव आणि सुवासहीन पदार्थ असून त्यापासून मेण किंवा मध उत्पन्न होत नाहीं; व दुसरें, त्याच्या हातून धर्म व परोपकार होत नाहींत.' आनंदरावानें ह्या विषयावर निर्भीडपणें आपले विचार प्रकट केले, त्या वेळेस आपण त्याचें ऐकिलें नाहीं; परंतु आतां त्याच्या उपदेशाची किंमत कळूं लागली. त्या वेळेस जें आपणास मोठें सुखसाधन असें वाटत होतें, तेंच हल्लीं मोठ्या दुःखाचें कारण झालें आहे! हे देवा! शांतपणें आपली विपत्ति सोसण्याचें सामर्थ्य आह्मांस दे, एवढेंच तुझ्यापाशीं आमचें मागणें आहे." ह्याप्रमाणें त्यांचीं भाषणें होत असत.

जेथें सासूसासऱ्यांची व नवऱ्याची ही दशा, तेथें शांतेचा काय निभाव लागणार? त्या बिचारीलाही त्या कजाग

सुंदराबाईपासून अतिशय दुःख भोगावें लागलें. त्या वृद्ध स्त्रीपुरुषांना मागीलदारच्या खोल्यांत रहाणें भाग पडल्यामुळें **शांतेनें** त्यांस आपली खोली रिकामी करून दिली. दुसऱ्या दोन खोल्या घरांत रिकाम्या होत्या, परंतु **सुंदराबाईनें** द्वेषबुद्धीनें **शांतेला** पडवींत राहण्यास सांगितलें; व तिला वाईट रीतीनें वागवून तिच्यावर शिव्यांचा वर्षाव करण्याचा क्रम चालविला. उजाडल्यापासून मावळेपर्यंत ती तिला खोड्या ठेवीत असे. ती **शांतेला** म्हणे, "तूं काम जितकें करावें तितकें करीत नाहींस, व जसें करावयाचें तसेंही तुला करितां येत नाहीं." **सुंदराबाईला** आपणापासून त्रास होतो, व ती आपणाला तुच्छ मानते, असें त्या पोरक्या **शांतेला** वाटूं लागलें. त्यांचें दुःख त्यांनाच आवरेनासें असल्यामुळें त्या वृद्ध स्त्रीपुरुषांस तिचें समाधान करितां आलें नाहीं. तेथून दुसरीकडे कोठें तरी जावें, असें **शांतेच्या** मनांत येई; परंतु जावें कोठें, याचा मात्र विचार होता. शेवटीं तिनें धर्मोपदेशकास –कसें करूं–म्हणून विचारलें. तो सुज्ञ उपदेशक म्हणाला, "**शांताबाई** आतां ह्यापुढें त्या पर्णकुटींत तुमचें रहाणें अशक्य आहे खरें, व तुम्हाला तुमच्या पित्यानें चांगली विद्या शिकवून घरकामाची माहिती करून दिली आहे, त्याप्रमाणें तुम्ही तें करितां, परंतु **सुंदराबाईला** एकाद्या चांगल्या सशक्त पुरुषापेक्षांही अधिक काम पाहिजे. तथापि आतांच येथून दुसरीकडे निघून जावें ही गोष्ट मला प्रशस्त वाटत नाहीं. माझ्या मतें तुह्मी आहां तेथेंच राहून आपल्या हातून होईल तेवढें काम करावें, व ज्या विपत्तींत आपण पडलों आहों, तींतून सोडविण्याविषयीं

ईश्वराची प्रार्थना करीत शांतपणें वाट पहावी, हें बरें. ज्या प्रभूनें तुम्हाला पूर्वीं विपत्तींतून काढिलें, त्याची तारण–शक्ति आतां कमी झाली असें नाहीं. ख्रिस्तिधर्मानुयायी व चांगलीं अशीं माणसें ज्या कुटुंबांत आहेत अशा कुटुंबांत तुम्हाला नोकरी लावून देण्याची तजवीज मी करितों. परंतु धैर्य न सोडतां, ईश्वरावर हवाला ठेवून, ही विपत्ति सोसा; म्हणजे तो सर्व व्यवस्था नीट लावील." हा उपदेश ऐकून शांतेनें त्याचे आभार मानिले, व "तुमच्या उपदेशाप्रमाणें मी वागेन," असें त्यांस अभिवचन दिलें.

पुढें ती तेथें राहिली व आपल्या पित्याला जेथें पुरलें होतें तें स्थल जगांतील इतर सर्व स्थळांपेक्षां विशेष रमणीय वाटत असल्यामुळें, तेथें तिनें एक गुलाबाचें झाड लाविलें व तें लावितांना ती त्या झाडाला उद्देशून म्हणाली, "सुदैवानें माझें येथें निरंतर रहाणें झालें, तर मी तुला नित्य आपल्या आसवांचें पाणी घालीन, व त्या योगानें तुला पुष्कळ पानें व फुलें येतील." कांहीं दिवसांनीं त्याला पानें येऊन कळ्या आल्या व फुलेंही उमलूं लागलीं, तेव्हां ती म्हणाली, "मनुष्याच्या आयुष्याची गुलाबाचे झाडाशीं तुलना केली आहे ती योग्य आहे. केव्हां केव्हां तें पर्णहीन असतें व त्याच्यावर कांट्यांशिवाय दुसरें कांहीं नसतें; परंतु तेंच कांहीं काळ जाऊन त्याचा ऋतु आला, म्हणजे नवीन पानांनीं भरून जाऊन त्यावर पुष्कळ सुवासिक फुलें येतात; तशीच माझी हल्लींची कांट्यांची अवस्था आहे; परंतु ईश्वर करो, आणि ह्या समयीं माझें धैर्य न खचो. हे श्रेष्ठ पित्या! माझा तुमच्या भाषणावर पूर्ण विश्वास आहे; व 'धीर धरल्यास चांगलें फळ मिळतें,' असें जें तुमचें

ह्मणणें, त्याचा अनुभव मला कधींतरी येईलसें वाटतें."
ह्या रीतीनें दु:खाच्या प्रसंगीं **शांता** आपलें समाधान करून घेत असे, व खालीं लिहिलेल्या कवितेप्रमाणें **देवाची** प्रार्थना करीत असे.

ज्यांच्यावरी प्रेम मदीय फार ॥
ते मित्र गेले मरणें सुदूर ॥
गेलीं फुलें सर्व सुकून लोकीं ॥
कांहीं न पृथ्वीवरि बा ! विलोकीं ॥ १ ॥

देवा ! जरी ही स्थिति होय सारी ॥
मारील मच्चित्त न तें भरारी ॥
विश्वास तुझ्यावरि सर्व माझा ॥
तुझ्याविणें येइल कोण काजा ॥ २ ॥

प्रकरण १३.

शांतेला पर्णकुटींतून घालवून देतात.

अशा रीतीनें दुःखाचे दिवस काढीत असतांना, तिच्या पित्याचा जन्मदिवस आला. इतकीं वर्षें हा **शांतेचा** फार उत्सवाचा दिवस असे. परंतु ह्या वर्षीं, त्या दिवशीं सकाळीं तिच्या खोलींत जीं सुवर्णासारखीं सूर्याचीं किरणें पडलीं त्यांचें स्वागत तिनें आनंदानें न करतां अश्रुजलानें केलें. पूर्वीं तिचा पिता जीवंत असतां त्याच्या जन्मदिवशीं त्याला आवडेल असा कांहीं पदार्थ तयार करून तो त्यास अर्पीत असे. परंतु ह्या खेपेस त्याच्या परलोकगमनामुळें

तसें कांहीं करावयाचें प्रयोजन राहिलें नव्हतें. आसपास रहाणारे लोक अशा दिवशीं आपल्या मृतनातलगांच्या व स्नेह्यांच्या कबरेवर फुलें घालीत असत. व अशा प्रसंगीं ती आपली इच्छा परिपूर्ण करण्यासाठीं ते शांतेजवळ फुलें मागण्यास येत असत. त्या रीतीस अनुसरून आपल्या पित्याच्या थडग्यावर फुलें घालावीं असें शांतेच्याही मनांत आलें. तेव्हां जीं दुःखें तिला आजपर्यंत भोगावीं लागलीं, त्यांचें आदिकारण जी टोपली तिच्या खोलींतल्या फडताळांत होती, ती घेऊन तिजमध्यें निरनिराळ्या रंगांचीं फुलें व ताजीं पानें घालून, ती घेऊन, ईश्वरभजनापूर्वीं एक तास हिंगण्यास जाऊन तिनें ती आपल्या पित्याच्या कबरेवर उद्दिष्ट स्थलीं ठेविली. ती तेथें ठेवीत असतां तिच्या नेत्रांतून अश्रु गळून त्या टोपलींतल्या फुलांवर पडले, व दंवासारखे दिसूं लागले. "हे प्रियतम पितृश्रेष्ठा! माझ्या आयुष्याचा मार्ग तुह्मीं पुष्पाच्छादित केला; तुमचा परलोकमार्ग मींही पुष्पाच्छादित करावा, परंतु तसें माझ्या हातून घडणें अशक्य आहे; तथापि तुमच्या ह्या गर्त्तेवर तरी मी पुष्पें घालीन," असें ह्मणून ती टोपली तिनें तेथें ठेविली. तिच्या मनांत ती टोपली किंवा तींतील फुलें कोणी चोरून नेईल अशी भीति मुळींच नव्हती. कांहीं अंतरावर गांवांतले लोक होते, त्यांनीं शांतेचें हें आचरण पाहून हर्षित व सदय होऊन, मनांतल्या मनांत "हे देवा! आनंदरावाच्या ह्या धार्मिक मुलीकडे पहा व तिचा निरंतर अभ्युदय होऊं दे," अशी ईश्वराची प्रार्थना केली.

दुसरे दिवशीं शेतकऱ्याचीं चाकरमाणसें जवळच्या रानापलीकडे असलेल्या मैदानांत गवत कापण्यांत गुंतलीं अ-

सतां, इकडे पर्णकुटीपासून कांहीं अंतरावर ओढ्याच्या कांठीं गवतावर वाळत घातलेलें रेशमी लुगडें एकाएकीं नाहींसें झालें. ही गोष्ट शेतकऱ्याच्या सुनेला संध्याकाळपर्यंत समजली नाहीं; तें—आसपास कोणी नाहीं अशी संधि पाहून—कोणींतरी उचलून नेलें होतें. कृपण लोक संशयी असतात त्याप्रमाणें **सुंदराबाई**ही होती, व तिच्या मनांत **शांते**विषयीं तत्काळ संशय आला. एका हातांत मातीची घागर व एका हातांत दंताळें घेऊन, **शांता** इतर नौकरांबरोबर संध्याकाळीं घरीं आली; तेव्हां त्या दुष्ट स्त्रीनें स्वयंपाकघरांतून बाहेर येऊन **शांते**वर शिव्यांची लाखोली केली, व "आतांच्या आतां तूं चोरलेलें लुगडें दे" ह्मणून तीस ह्मटलें. "सर्व चाकरमाणसांबरोबर मीही कुरणांत होतें. मीं घेतलें नाहीं, पण कोणी जवळ नाहीं असें पाहून कोणींतरी तिऱ्हाइतानें चोरलें असावें, असें मला वाटतें" असें त्या बिचाऱ्या **शांते**नें गरीबीनें उत्तर दिलें; तें ऐकून **सुंदराबाई** अधिकच संतापली व ह्मणाली, "चोर तर चोर, आणि शिरजोर ! आपण आंगठी चोरून तुरुंगांत जाऊन मोठ्या प्रयासानें फाशीच्या शिक्षेंतून वांचलात, हें मला ठाऊक नाहीं काय ? अत्तां येथून चालती हो, तुझ्यासारख्या नीच प्राण्यांना माझ्या घरांत जागा नाहीं!" ही **शांते**वर आंगठी चोरल्याचा आरोप आल्याची गोष्ट सुशील **आनंदरावानें** शेतकऱ्यास व त्याच्या बायकोस सांगितली, त्या वेळेस त्यांच्या मुलानेंही ऐकिली होती, व ती त्यानें मूर्खपणानें आपल्या बायकोसही सांगितली होती. असो, **शांते**ला घरांतून निघून जावयास आपल्या बायकोनें सांगितलें हें पाहून तिचा नवरा ह्मणाला, "आतां

सूर्यास्ताची वेळ आहे, व अशा वेळीं हिला घरांतून घालवून देणें योग्य नाहीं. आजची रात्र हिला येथें राहूं दे. दिवसभर हिनें उन्हांत अतिशय श्रम केले आहेत, तर रात्रीं जेवायला खायला घालून सकाळीं हिला वाटेस लावतां येईल." पण ती दुष्ट स्त्री ह्मणाली कीं, "क्षणभर देखील ती माझ्या दृष्टीसमोर नको." मग आपण अधिक उपदेश केल्यास आपली बायको जास्ती संतापेल, असें मनांत आणून, बिचारा नवरा गप्प बसला. शांतेनें सुंदराबाईच्या बोलण्यावर उत्तर न देतां आपलें जें कांहीं थोडेंबहुत सामान होतें, तें एका मोठ्याशा रुमालांत बांधलें, व तें गाठोडें खाकेस मारून शेतकरी व त्याची बायको जेथें होतीं, तेथें जाऊन त्यांनीं तिच्यावर व तिच्या पित्यावर जे उपकार केले होते, त्याबद्दल त्यांचे आभार मानिले, व आपण निरपराध असल्याबद्दल त्यांस सांगितलें, व त्यांची तेथून जाण्याविषयीं परवानगी विचारली. सुंदराबाई तेथें होतीच. ती हसून ह्मणाली; "यावें, आपण खुशाल यावें, व पाहिजे असल्यास ह्या दोघा थेरड्यांनाही आपल्याबरोबर घेऊन गेल्यास मला फार आनंद होईल, आणि आपण तसें न केल्यास त्यांच्या मरणाशिवाय इतर रीतीनें माझ्या कपाळची कटकट कांहीं दिवस सुटावयाची नाहीं!" हें तिचें बोलणें ऐकून त्यांस मरणप्राय दुःख होऊन तीं दोघें रडूं लागलीं; तथापि त्यांच्यानें झालें त्या रीतीनें त्यांनीं शांतेचें समाधान केलें व त्यांच्याजवळ जे थोडे पैसे होते त्यांपैकीं कांहीं तिला वाटखर्चासाठीं देऊन ह्मणालीं, "सुशील मुली, जा, ईश्वर तुला वाट दाखवील."

संध्याकाळीं शेतांतून परत घरीं आल्यानंतर ही सर्व हकीकत झाल्यामुळें बरीच रात्र झाली होती, तथापि तशा वेळीं शांता आपलें गाठोडें घेऊन बाहेर पडली, व अरण्यांतील एका पायवाटेनें जाऊन डोंगरावर चढायाला लागली. एकवार आपल्या पित्यास पुरलेल्या जागेचें दर्शन घ्यावें असें तिला वाटलें, व ती स्मशानाकडे वळली; ती त्या अरण्यांतून बाहेर पडली तों गांवांतील घड्याळाचे सात वाजलेले तिला ऐकूं आले. इतकी रात्र झाली होती तरी थडग्यांजवळ राहून रात्र घालविण्याचें तिला कांहीं भय वाटलें नाहीं. ती आपल्या मृत पित्याच्या गर्त्तेजवळ गेली व तीस आपल्या अश्रुजलानें तिनें स्नान घातलें. त्या वेळेस पूर्णचंद्र उगवलेला असून त्याचे किरण तिनें लाविलेल्या गुलाबावर व त्या आदले दिवशीं तेथें ठेविलेल्या पुष्पकरंडकावर पडले होते. त्या वेळेस त्या सुशील मुलीच्या आचरणाचें निरीक्षण त्या दोन देवदारूंच्या पानांमधून तो चंद्रमा करीत आहे असें वाटलें. वारा मंद मंद वहात होता, व इतर झाडांप्रमाणें त्या गुलाबाचीं पानें मागेंपुढें हलत होतीं. "बाबा! हीं मागेंपुढें डोलणारीं झाडें—'तुझी विपत्ति आमच्यानें पहावत नाहीं!' असेंच म्हणतात, असें मला वाटतें. बाबा, माझ्या ह्या विपत्तीचा पाढा ऐकण्यास जर तुम्ही असतां तर बरें होतें. अरेरे! पण तुम्हाला ईश्वरानें आपल्या लोकीं नेलें हेंच बरें झालें, व त्याबद्दल मी ईश्वराचे फार आभार मानतें, कारण हें दु:ख डोळ्यांनीं पहाण्याचा प्रसंग तुम्हावर आला नाहीं. तुम्ही आतां दु:खांच्या आटोक्यांतून सुटून सुखसागरांत गेलां आहां. देवा! मलाही त्यांच्याबरोबर आपल्या लोकीं कां नेलें नाहींस! असली विपत्ति मला

जन्मांत देखील ठाऊक नव्हती. पूर्वी मी तुरुंगांत पडलें होतें, तेव्हां लोखंडाच्या गजांतून आंत चंद्रप्रकाश पडला होता त्या वेळेस, बाबा! तुम्ही जीवंत होतां! परंतु ह्या प्रसंगीं तोच तुमच्या गर्तेवर आतां पडत आहे. आपल्या प्रिय देशांतून मला हांकून लाविलें त्या वेळेस अंत:करणापासून व प्रेमानें माझें संरक्षण करण्यास तुम्ही मजजवळ होतां, आतां तर कोणीच नाहीं. द्रव्यहीन, निराश्रित, आरोपी व विदेशी अशी मी ह्या अरण्यांत एकटी पडलें आहें, व डोकें कोठें टेंकावें हें समजत नाहीं; असो, ज्याकडे पाहून मला कांहीं सुखसमाधान वाटावें असा एक जमिनीचा तुकडा होता, तोही दुर्दैवानें मला आतां अंतरणार! कोणत्याही प्रकारें चैन पडेनासें झालें म्हणजे, बाबा! मी येथें येऊन बसून रडलें म्हणजे माझें दु:ख जरा हलकें होई, परंतु इत:पर तसें घडण्याची आशा उरली नाहीं! ”

अशी आपली शोचनीय स्थिति पाहून तिला मोठा हुंदका आला, व ती आक्रोश करून म्हणाली, “इतक्या रात्रीस जाऊन ‘मला रात्रभर तरी रहाण्यास जागा द्या,’ असें एकाद्यास म्हणण्याचा मला धीर नाहीं, व यदाकदाचित् गेलेंच तरी मला पहिल्या घरच्या लोकांनीं कां हाकून लाविलें हें त्यांस समजलें म्हणजे, कोणीही आपल्या घरांत मला प्रवेश करूं देणार नाहीं. ” कांहीं वेळानें कशावरतरी पडावें म्हणून इकडे तिकडे पाहूं लागली, तों श्मशानभूमीची भिंत व आपल्या पित्याची गर्त्ता, ह्यांच्यामध्यें शेवाळानें भरून गेलेला व अतिशय जुना असा एक्या थडग्यावरील दगड तिच्या दृष्टीस पडला; त्या दगडावरचा लेख सर्व पुसून गेला असल्यामुळें, लोक बाकासारखा त्याचा उपयोग करीत असत.

तो दगड दृष्टीस पडतांच शांतेला अमळ समाधान वाटलें; व ती ह्मणाली, " ह्या दगडावर बसून आपल्या बाबांच्या गर्त्तेसन्निहित एवढी रात्र तरी घालवीन. कारण बहुत करून मला हिचें हें शेवटलेंच दर्शन आहे. ईश्वराच्या मनांत असेल तर उद्यां पहाटेस जिकडे तो मला वाट दाखवील, तिकडे जाण्यास मी निघेन."

साकी.

मृत्युलोकिंचें दुःख कमी जो । करील ऐसा आहे ॥
एकचि केवळ त्याविण अन्या । शक्य कधीं न असे हें ॥१॥
असते त्याची अमेय शक्ती । औदार्य हि तैसें ॥
त्याचें शासन दुःखद भव हा । कधिं कधिं व्हावा ऐसें ॥२॥
संकट आणो परंतु त्यांतचि । पेरी सुखबीजास ॥
ऐसा हृदयीं संतत राहो । अबाधित विश्वास ॥ ३ ॥
घडतें जें जें जगीं घडे तें । खचितचि ईशेच्छेनें ॥
ऐशा श्रद्धारूप तनुत्रें । सज्य सदा झाल्यानें ॥ ४ ॥
दुःखवेदनाबाण न शिरती । हृदयीं केव्हां ही ते ॥
ईशीं असतां पूर्ण भरंसा । शांती जीवा होते ॥ ५ ॥
पूर्णत्वावरि ईशाच्या ती । असतां अमित प्रीति ॥
दुःखवेदनाबाण न हृदयीं । केव्हां ही ते शिरती ॥ ६ ॥
दुष्ट येति जे विचार मनिं बा । दुष्ट कल्पना येती ॥
सतत तयांचा त्रास मानुनी । तदधीन न जे होती ॥ ७ ॥
पवित्र ईशाच्याही कांहीं । केलीं अपमानाला ॥
कृत्यें किंवा केलीं नाहीं । उचितचि तन्मानाला ॥ ८ ॥

त्यांची भीती हृदयीं धरितां । दुःखवेदनाबाण ॥
कोण्याही ते काळिं न शिरती । हृदयीं त्याची आण ॥ ९ ॥
आत्म्यांचाही आत्मा असशी । तूंचि त्राता जगता ॥
रक्षिल त्यातें असा न कोणी । आहे कीं तुजपरता ॥ १० ॥
जे कां झाले खिन्न तयांचें । रक्षण कर तूं देवा ॥
प्रसन्न त्यांच्या करी मनाला । तूझा करितों धावा ॥ ११ ॥
त्वत्संबंधीं जें जें आहे । त्याच्या वरती ममता ॥
तैशी तूझ्याठायीं येवो । निष्ठा ती तच्चित्ता ॥ १२ ॥

प्रकरण १४.

ईश्वरीसूत्रानें शांतेचें दुःखनिवारण होतें.

शांता दगडावर बसली होती तेथें तिच्यावर असलेल्या देवदारूंच्या गर्द छायेनें ती अगदीं दिसेनाशी झाली होती. आपला पदर तोंडाशीं लावून ती रडत होती; तिच्या जिवाला सुख वाटत नव्हतें, तथापि मनोभावानें ती ईश्वराची प्रार्थना करीत होती. तिची प्रार्थना संपते न संपते, तोंच आपल्या परिचितांपैकीं कोणीतरी शांते, शांते, असें मधुर स्वरानें हाका मारीत आहे, असें तिनें ऐकिलें, व त्यासरशीं घाबऱ्या घाबऱ्या इकडे तिकडे पाहूं लागली. तेव्हां एक स्त्री तिचा दृष्टीस पडली. तिच्या शरीराचा बांधा चांगला असून तिचें मुख सुंदर होतें. ती पांढरें रेशमी पातळ नेसली होती, व चंद्रप्रकाशानें तर फार शोभायमान दिसत होती. अशा ठिकाणीं

व अशा वेळीं, येथें मनुष्य यावयाचें नाहीं, असें असून ही स्त्री प्राप्त झाली आहे, हें पाहून ती भिऊन तेथून पळून जाण्याच्या विचारांत होती, तों ती स्त्री जवळ येऊन मोठ्या सौजन्यानें **शांतेला** थांबवून म्हणाली, "**शांताबाई,** भिऊं नका. मीही तुमच्या प्रमाणेंच एक मानवी प्राणी आहें. **ईश्वरानें** तुमची मनःपूर्वक प्रार्थना ऐकून, मला ह्या स्थळीं तुम्हास मदत करण्यासाठीं पाठविलें आहे. एकदा माझ्याकडे पहा तर खऱ्या, माझा तुमचा परिचय नाहीं असें होईल काय?" तेव्हां **शांता** आश्चर्यानें ह्मणाली, "काय, **मंजुळाबाई!** आपण आपल्या घरापासून इतक्या दूर व अशा भयंकर स्थळीं व अवेळीं कशा आलां?" **मंजुळाबाईनें,** प्रार्थना करण्यासाठीं गुढगे टेंकून बसलेल्या **शांतेला** उठवून प्रेमालिंगन देऊन तिचें प्रीतीनें चुंबन घेतलें, आणि ह्मणाली—"**शांताबाई,** आह्मीं तुमचा फार अन्याय केला. तसल्या सुंदर व सुखकारक पुष्पकरंडकाच्या नजराण्याबद्दल आम्हीं तुमची फार वाईट रीतीनें संभावना केली. परंतु आतां तुम्ही निर्दोष आहां, असें आम्हांस कळलें आहे; तर तुम्हीं मला व माझ्या मातापितरांला क्षमा करावी, अशी आमची विनंति आहे. आमच्यानें होईल तितकें करून आम्ही तुमचा निरपराधपणा लोकांत प्रसिद्ध करूं; परंतु आम्हाला तेवढी क्षमा कराच." **शांता** म्हणाली, "असें बोलूं नका. त्या प्रसंगाचा विचार करितां असें दिसतें कीं त्या वेळेस तुम्हीं माझी फारच गय केली. खरोखर माझ्या मनांत तुमच्याविषयीं अणुमात्रही क्रोध नाहीं. तुम्हीं माझ्याविषयीं मांया दाखविली त्याबद्दल तुमचे उपकार आहेत असें नित्य माझ्या मनांत येई. मला

एवढें मात्र वाईट वाटे कीं, तुम्ही व तुमचीं मातापितरें ह्यांच्या मनांत माझ्याविषयीं गैरसमज होऊन, मी कृतघ्न व कठोर हृदयाची आहें, असा तुमचा ग्रह झाला असावा. माझी मनःपूर्वक इच्छा होती कीं कधीं ना कधीं तरी माझ्या निर्दोषीपणाविषयीं तुमची खातरी व्हावी. **ईश्वरानें** माझी ही इच्छा सफल केली ह्मणून त्याच्या नांवाचा जयजयकार होवो!"

मंजुळाबाईनें शांतेला गाढ आलिंगन दिलें, इतकेंच नाहीं, तर तिनें आपले डोळ्यांतील अश्रूंनीं **शांतेस** न्हाऊं घातलें. नंतर जेथें **आनंदरावाला** पुरलें होतें, त्या जागेकडे पाहून ती म्हणाली, "हे महात्म्या! हे विश्वासू बागवाना! तुजवर अगदीं लहानपणापासून माझी प्रीति होती, तुझा प्रेमपूर्वक उपदेश मीं पुष्कळ वेळां ऐकिला आहे, आणि तुला प्रार्थना करीत असतांना मीं अनेक वेळ पाहिलें आहे, त्या तुझ्या अस्थि आतां धरित्रीमातेच्या उदरांत स्वस्थ विश्रांति घेत आहेत. तूं जीवंत असतास तर तुझ्या समक्ष तुजवर आणलेल्या आरोपाबद्दल मीं क्षमा मागितली असती. अरेरे! जर आम्हीं चांगली चौकशी केली असती, आणि निर्दोष व विश्वासुपणानें निरंतर वागणाऱ्या अशा जुन्या चाकरावर भरंवसा ठेविला असता, तर, हे महात्म्या! तुझें शरीर अशा ठिकाणीं कीटकांच्या भक्ष्यस्थानीं पडलें नसतें; व तूं अद्याप जीवंतही राहिला असतास." **शांता** म्हणाली, "**मंजुळाबाई**, माझ्या बाबांच्या मनांत तुमच्याविषयीं राग होता अशी कल्पनाही मनांत आणूं नका. कारण **सुवर्णपुरींतल्याप्रमाणें** ते नित्य सकाळसंध्याकाळ तुमच्या हितासाठीं प्रार्थना करीत असत. मरतांना देखील त्यांनीं

तुम्हा सर्वांना आशीर्वाद दिले. जे शब्द ते मरणापूर्वी बोलले ते मला पक्के आठवतात; व तेच त्यांचे शेवटचे शब्द होते. ते म्हणाले, 'माझी पक्की खातरी आहे कीं, आपल्या धन्यास कधीं तरी तूं निर्दोषी आहेस, असें कळून येईल, व ते तुला येथून परत आपल्या घरीं बोलावून नेतील, व अशा वेळीं आपला धनी, त्याची पत्नी **प्रियंवदाबाई**, व मीं आपल्या मांडीवर वाढविलेली त्यांची कन्या **मंजुळाबाई**, ह्यांस निश्चयपूर्वक असें सांग कीं, माझ्या मनांत अंतकालपर्यंत त्यांच्याविषयीं पूज्यबुद्धि, प्रीति, व कृतज्ञता होती'". असें **शांतेचें** भाषण ऐकून, **मंजुळेच्या** नेत्रांतून अश्रुधारा वाहूं लागल्या, व ती म्हणाली, "**शांताबाई** इकडे येऊन माझ्या शेजारीं या दगडावर बसा. माझ्यानें येथून दूर जाववत नाहीं; ह्या देवालयांत आपण बसूं, मग आंगठी कशा चमत्कारानें नाहींशी झाली तें सर्व मीं तुम्हाला सांगेन."

श्लोक.

ज्या ज्या काळीं तम बहु नसे, आणि राहे प्रकाश
शांती पावे सकल जगही सर्वतः सावकाश ।
ऐशा काळीं जनरहितशा बैसतां हो ठिकाणीं
येती गोष्टी मनिं सतत तच्छक्ति बा फार जाणीं ॥ १ ॥

तैशा येती कधिं न हृदयामाजि हो अन्य काळीं
निष्कापट्यासहित मृदुता आणिती ज्या उमाळीं ।
चित्तोद्वेगा हरुनिहि तया आणिती मार्दवाला
जैशा ग्रीष्मीं करिति मृदु त्या मेघधारा धरेला ॥२॥

एके ठायीं बहुत असतां प्रीतिनें फार काळ
नाहीं जेंही कधिं कथियलें गौप्य सारें समूळ ।
तेंही ऐशा समयिं कथितों शांतशा प्रेमपात्रा
भार्येला वा गृहपतिस वा सूनुतें वा स्वमित्रा ॥ ३ ॥

प्रकरण १५.

मंजुळाबाई त्या श्मशानांत कशी आली.

शांतेला जवळ बसवून घेऊन **मंजुळाबाई** ह्मणते, "**शांताबाई ईश्वर** निरंतर तुमच्याजवळ आहे, ह्यांत कांहीं संशय नाहीं; त्यानें आपला आश्रय तुम्हाला दिला आहे, व त्यानेंच अशा चमत्कारिक रीतीनें तुमच्या सहाय्यास मला येथें आणिलें. आंगठीविषयीं झालेली हकीकत मी तुम्हास सांगणार आहें, त्यांत साहजिक घडलेल्या गोष्टींशिवाय दुसरें कांहीं नाहीं; तथापि त्यांत खरोखर **ईश्वरी**सूत्र कसें होतें, तें तुमच्या लक्षांत येईल. तुम्ही निर्दोषी आहां असें कळल्यावर, **शांताबाई**, तुम्हाला काय सांगूं, मला झोंप देखील आली नाहीं; तुमची व तुमच्या पित्याची मूर्ति निरंतर माझ्या डोळ्यांसमोर उभी राहूं लागली; तुमच्यासाठीं अनेकवेळां मीं अश्रु ढाळिले. माझ्या मातापितरांनीं तुमचा शोध सर्वत्र केला; परंतु तुमचा अगदींच पत्ता लागला नाहीं. ह्या गांवाजवळच्या रानांतील किल्ल्यांत आई व बाबा यांबरोबर तेरवांच्या दिवशीं मी आलें. राजपुत्र शिकारीला येई, तेव्हां तो ह्या किल्ल्यांत उतरत असे. आज वीस वर्षें ह्या किल्ल्यांत कोणी आलें गेलें नाहीं. त्यांत त्या अरण्याचे रक्षणासाठीं

ठेविलेला शिपाई मात्र रहात असतो. माझ्या बाबांना कांहीं विशेष महत्त्वाचें काम येथें करावयाचें होतें, त्याच कामासाठीं तेथें आलेल्या आणखी दोन सरदारांसहवर्तमान त्यांनीं हा दिवस अरण्यांत घालविला. त्या सरदारांनीं आपल्या बायका व एकानें आपली तरूण कन्या हीं बरोबर आणिलीं आहेत. दिवसभर उष्मा फार होत होता, परंतु संध्याकाळ सुंदर व रमणीय वाटली. अस्तास जाणाऱ्या सूर्याची प्रभा व तज्जनित आकाशाची शोभा पहाण्याजोगी भासली, व देवदारूवृक्षांच्या समूहानें झांकिलेले डोंगर, व मध्यें मध्यें असणारे रंगीबेरंगी खडक हेंहीं मनास आल्हादकारक दिसूं लागले; अशा वेळीं बाहेर फिरावयास जाण्याची इच्छा मनुष्याला साहजिक उत्पन्न होते, त्याप्रमाणें मलाही झाली, व मी बाबांना व आईला विचारून, सकाळीं पाहिला होता तोच प्रदेश पहाण्यास त्या शिपायाच्या मुलीला बरोबर घेऊन निघालें. जातां जातां ह्या स्मशानाच्या एका उघड्या दरवाजांतून दिसणाऱ्या थडग्यांवर अस्तास जाणाऱ्या सूर्याच्या प्रभेमुळें सोन्याचे पत्रेच बसविले आहेत असें भासलें. मला लहानपणापासून थडग्यांवर लिहिलेले लेख वाचण्याची आवड आहे. अशा एकाद्या लेखाच्या वाचनानें खालीं पुरलेला पुरूष किंवा स्त्री तारूण्यांतच निवर्तली असें समजल्यास त्यापासून मला अतिशय वाईट वाटतें; व ते वृद्धापकाळीं निवर्तले असल्यास त्यापासून दुःखमिश्रित सुख वाटतें. त्यांवरील लेख सर्वदा ते लिहिणाऱ्याचा भाव व्यक्त करण्याजोग्या भाषेनें लिहिलेले असतातच असें नाहीं; तरी ते वाचून माझ्या मनांत अनेक गंभीर विचार येतात, व ह्या लेखांपासून सद्विचार व सुनिश्चय झाले नाहींत असें कधींही

झालें नाहीं. ह्या माझ्या आवडीमुळें आम्ही ह्या स्मशानांत आलों, व बरेच लेख मीं वाचले. त्यानंतर ती शिपायाची मुलगी मला म्हणाली, 'बाईसाहेब, ह्यापेक्षां विशेष रमणीय अशी एक वृद्ध मनुष्याची गर्त्ता तुम्हांस दाखवावी असें माझ्या मनांत आलें आहे. त्यावर विशेष तऱ्हेचें बांधकाम किंवा लेख आहे असें नाहीं; तथापि त्या वृद्ध मनुष्याच्या पितृभक्त कन्येनें मोठ्या आवडीनें त्यावर एक गुलाबाचें झाड लाविलें आहे, व एक फुलांनीं भरलेली करंडी त्यावर ठेविली आहे. तें पहा देवदारूवृक्षांच्या गर्द पानांतून दिसतें आहे तें!' त्यावर आम्ही येथें आलों, व तुम्ही स्वर्णपुरी सोडल्यापासून जिच्याविषयीं माझ्या मनांत हजारों वेळां विचार आले होते, तीच ही माझ्या ओळखीची करंडी असें समजतांच मी चकित झालें, व तीच ही किंवा दुसरी हें पहाण्यासाठीं मी अगदीं जवळ आलें व आपल्या नांवांचीं प्रथम अक्षरें व आमच्या कुळाच्या मूळ पुरूषाच्या शिक्क्याचें चित्र हीं पाहून तीच ही असें समजलें. नंतर ही गर्त्ता कोणाची म्हणून मीं विच्यारल्यावर तिनें मला तुमचा सर्व वृत्तांत सांगितला. तुम्ही देवदारूंच्या झाडांखालीं असलेल्या पर्णकुटींत रहातां, तुमच्या पित्याला झालेलें दुखणें व त्यापासून आलेलें मरण आणि तुमचें दुःख, ह्यांविषयीं तिनें मला सर्व सांगितलें; त्यानंतर मी गांवच्या सन्मान्य धर्मोपदेशकाकडे गेलें. त्यानें तीच हकीकत सांगून तुमची फार फार प्रशंसा केली. त्या पर्णकुटिकेंत तत्काळ जाऊन तुमची भेट घ्यावी असें माझ्या मनांत होतें; परंतु तुमची हकीकत ऐकत असतां वेळ इतक्या जलदीनें निघून गेला कीं, ती संपेपर्यंत अगदीं काळोख पडला. इतकी रात्र झाली

असें पाहून मी म्हणालें, 'आतां काय करावें? इतक्या रात्रीं त्या ठिकाणीं जाण्याची वेळ नव्हे, तर उद्यां उजाडतांक्षणीं आपण तिकडे जाऊं.' तेव्हां त्या उपाध्यायानें तुम्हाला लवकर बोलावून आणण्यासाठीं तेथील शाळेवरील शिक्षकास बोलावूं पाठविलें. तो तेथें आल्यावर म्हणाला, 'बाई, तुम्हाला इतकें दूर जाण्याची गरज नाहीं; जिची भेट तुम्ही घेऊं इच्छितां ती नुकतीच आपल्या पित्याच्या गर्त्तेजवळ जाऊन रडत व शोक करीत बसली आहे. मी देवळाच्या घुमटावर बसविलेल्या घड्याळाला किल्ली देण्यास गेलों होतों, तेव्हां एका झरोक्यांतून तिला तिकडे जातांना पाहिलें. अरेरे! तिला किती दुःख होत आहे म्हणून सांगूं! बिचारीला ह्या शोकाग्नीपासून कांहीं दुखणें न जडो म्हणजे झालें!' उपाध्यायही माझ्याबरोबर इकडे येण्यास निघाले होते, परंतु दुसरें कोणी जवळ नसलें, तरच मला तुम्हाला गाढ आलिंगन देतां येईल असा विचार करून 'आपण इतक्या रात्रीं कशाला बाहेर पडतां? मी एकटीच जातें, मी **शांताबाई**ला घरीं घेऊन येत आहें म्हणून माझ्या आईला व बाबांना तेवढें सांगून या,' असें त्यांस सांगून मी इकडे आलें. सारांश—सर्वज्ञ **परमेश्वरी** सूत्रानें हल्लीं सुखमय लोकांत असणाऱ्या तुमच्या पित्याच्या गर्त्तेजवळ तुमची माझी भेट होण्यास हा पुष्पकरंडकच कारण झाला. **शांताबाई**, या ठिकाणीं माझें आकस्मिक येणें कसें झालें त्याविषयीं सर्व हकीकत मी तुम्हाला सांगितली आतां आणखी एक"—इतकें **मंजुला** बोलते आहे, तों मध्येंच आकाशाकडे डोळे करून **शांता** म्हणाली, "खरोखर! ही सर्व **ईश्वरकृतीचीच** गोष्ट आहे. माझ्या रडण्याचा

करुण स्वर त्याच्या कानीं जाऊन ह्या कठिण विपत्तींत त्यानेंच तुह्माला मला आश्रय देण्यास पाठविलें. ईश्वरा! ह्या तुझ्या चांगुलपणाचा व अनंत कृपेचा महिमा माझ्यानें वर्णवत नाहीं." अशा रीतीनें **ईश्वराचा** स्तव करीत **शांता** पुष्कळ वेळ तशीच राहिली असती, परंतु मध्येंच पूर्व भाषणाचा पुनः उपक्रम करून **मंजुळा** म्हणाली, "आणखी एक गोष्ट मला तुम्हाला सांगावयाची आहे. ती ज्या **जगन्नियंत्याच्या** हातांत आपल्या दैवाचीं सूत्रें आहेत त्याविषयीं परम पूज्यबुद्धि उत्पन्न करणारी व फार चमत्कारिक आहे. **चिमाऊ**सारखे तुमचा द्वेष करणारे दुसरे कोणीही ह्या भूतलावर नसतील. तुमच्यावरचें माझें प्रेम काढून तें आपणावर बसवावें अशी तिची फार फार इच्छा होती; आणि तेवढ्यासाठींच तिनें तसल्या भयंकर लबाडीचा प्रकार कल्पिला, व-'आंगठी चोरतांना शांतेला मीं पाहिलें'-म्हणून तिनें खोटी साक्ष दिली. त्या लबाडीनें आपलें भयंकर कार्य साधलेंसें तिला वाटलें. परंतु तीच लबाडी तिजवरील माझा विश्वास उडण्यास व तुमच्यावर आमचें पूर्वीपेक्षां जास्त प्रेम बसण्यास कारण झाली. माझ्यापासून तुम्हाला दूर करावें म्हणून तिनें हर प्रयत्न केले; व तुह्माला हद्दपार करविलें हा आपण मोठा शतक्रतु केला, असें तिला निरंतर वाटत असे. आपला डाव साधला म्हणून तिला जो आनंद झाला त्याच्या भरांत तिनें, स्वतः पापमूर्ति आहें, असें दाखविण्याकरितांच काय, ही परडी हसत हसत तुमच्या पायांशीं आपटली. हें सर्व तुह्माला आठवत असेलच; पण तीच ही, ह्याप्रमाणें आपला पुनः संगम घडवि-

ण्यास कारण होणार होती हें तिच्या ध्यानींमनींही आलें नाहीं. खरोखर म्हटलें म्हणजे मी मघां येथें आलें तेव्हां जर ही टोपली माझ्या दृष्टीस पडली नसती, तर तुमच्या ह्या गूढ वसतिस्थानाचा शोध लागण्याचा कांहीं तरी संभव होता का? ईश्वराची जर आपणावर प्रीति आहे तर आपणास कशाचीही भीति नाहीं, असें जें म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं. दुष्ट खलांच्या हातून जेवढें म्हणून विपरीत होण्याजोगें आहे, तेवढें सर्व अनुकूळ कसें करावें हें **ईश्वराला** चांगलें समजतें; आणि म्हणूनच अतिक्रूर अशा आपल्या शत्रूंनीं कांहीं केलें तरी त्यांच्या हातून वास्तविक आपल्या विरुद्ध कांहीं एक न घडतां आपल्यास हितावह असेल तेंच घडतें. ह्या प्रसंगीं आपलें कल्याण आपल्या शत्रूपासूनच झालें असें म्हटलें पाहिजे." इतकें बोलून **मंजुळाबाईनें** शांतेला विचारलें, "बरें **शांताबाई**, इतक्या रात्रीं तुम्ही येथें कां आलां व मी आलें तेव्हां इतक्या आक्रोशानें रडत कां होतां?" **शांतेनें** आपल्याला **सुंदराबाईनें** घरांतून हांकून कां दिलें वगैरे हकीकत **मंजुळेला** सांगितली. ती ऐकून तिला फारच आश्चर्य वाटलें व ती म्हणाली, "**शांताबाई**, आपण ह्या घोर दु:खसमुद्रांत निमग्न होऊन डोळ्यांतून अश्रु गाळीत असून अति दीन वाणीनें ईश्वराचा धावा करीत असतां, खरोखर, **ईश्वरेच्छे**शिवाय माझें येथें येणें झालें नाहीं. आपल्या शत्रूंनीं केलेले अपकार **ईश्वर** आपणास हितावह करितो, ह्या वचनाचा प्रत्यय तुमच्या स्थितीनें ढळढळीत येतो. पहा, त्या सुशील वृद्ध शेतकऱ्याच्या दुष्ट सुनेनें तुमचे हाल व्हावे ह्मणून तुम्हाला घरांतून हांकून लाविलें; परंतु तिला हें समजलें नाहीं कीं ह्या आचरणानें ज्यांच्या मनांत

तुम्हाला सुखी करण्याचें आहे, अशी मी व माझीं मातापितरें ह्यांच्या हवालीं ती तुम्हास करीत आहे. पण **शांताबाई**, उठा, आपणास आतां घरीं गेलें पाहिजे. रात्र फार झाली, आई व बाबा माझी वाट पहात बसलीं असतील. **शांताबाई**, उठा, उठा लवकर. इत:पर तुम्हाला मी आपल्यापासून कधीं दूर राहूं देणार नाहीं. उद्यां आम्ही **सुवर्णपुरीस** जाणार आहों, तेव्हां तुम्हालाही बरोबर आलें पाहिजे."

आपलें येथें येणें पुन: कधींही होणार नाहीं, असें मनांत आणून **शांतेनें** आपल्या पित्याची गर्त्ता एकवार डोळेभरून पाहिली, व तिचें शेवटचें दर्शन घेऊन तेथून जाण्याचा प्रयत्न केला, परंतु तिचा पाय हालेना. शेवटीं **मंजुळाबाईनें** तिचा हात धरून तिला ह्मटलें, " चला, चला **शांताबाई**, ही फुलांची करंडीही आपल्याबरोबर घ्या म्हणजे तुमच्या पूज्य पित्याचा नजराणा आमच्या डोळ्यांपुढें निरंतर राहील, व त्यामुळें त्याचें आम्हांस विस्मरण होणार नाहीं. पितृभक्तीनें आपल्या पित्याची गर्त्ता सुशोभित करण्यासाठीं तुम्हीं ही फुलांची करंडी तीवर ठेविली होती, ती घेऊन हिच्या जागीं आपण एक दगडी सुशोभित थडगें बांधूं म्हणजे तुह्मालाही आनंद होईल. आंगठीची हकीकत ऐकण्याविषयीं तुम्हाला फार उत्कंठा झाली असेल, तर चला, वाटेनें जातां जातां मी तुम्हाला सांगतें." नंतर सुंदर चांदण्यांत त्या दोघी किल्ल्याकडे जाण्यास निघाल्या.

श्लोक.

प्रेमें अम्हा गगन हेंचि सदैव पाही
तेव्हां दिसे गगनतुल्य वसुंधरा ही ।

सर्वत्र सुप्ति विलसे जरि ती जगांत
तारासमूह परि जागृत तो नभांत ॥
आलों आपण जेंवि सोडुनि जगा एकांतवासाप्रती
नक्षत्रें जन त्यागुनीच करण्या गेलीं जणूं शोक तीं ।
आम्हातें मिळणार नित्य सुख तें जैसें तयां लाधलें
चित्तीं हाच विचार नित्य करणें सौख्यास होतें भलें ॥

प्रकरण १६.

आंगठीचा शोध कसा लागला.

किल्ल्याला जाण्याच्या वाटेवर मोठमोठे जुने व उंच तमालवृक्ष एकसारखे फार दूरवर लागले होते, व त्यांतून चंद्राच्या किंवा सूर्याच्या किरणांचा खालीं प्रवेश नव्हता. त्या वाटेनें **मंजुळा** व **शांता** चालल्या असतां कांहीं वेळ पर्यंत दोघीही आपापल्या विचारांत गर्क झाल्यामुळें कांहीं बोलल्या नाहींत. कांहीं वेळानें **मंजुळा** म्हणाली, "अहो **शांताबाई**, आतां तुम्हाला आंगठी कशी सांपडली तें सांगितलें पाहिजे." इतक्यांत **शांता** म्हणाली, "**मंजुळाबाई**, मला अहो जाहो म्हणण्याचें कारण नाहीं; मला **शांते** म्हणूनच आपण हाक मारावी." **मंजुळाबाई** म्हणाली, "तेथील कामानिमित्त बाबांना तेथें अवश्य जावयास पाहिजे होतें, म्हणून दरवर्षापेक्षां यंदां शहर सोडून आम्ही लवकरच–म्हणजे शिमग्याच्या सुमारास **सुवर्णपुरी**स आलों. तेथें फार काळ लोटला नाहीं तोंच तेथील हवा बदलली; आणि

एका रात्रीं तर फार मोठें वादळ झालें. **सुवर्णपुरीं**तील आमच्या बागेंत एक प्रचंड जांभळीचें झाड होतें तें तुला आठवत असेलच; तें फार जुनें झाल्यामुळें त्याला फळें येत नाहींशीं झालीं होतीं, व त्या रात्रीच्या भयंकर वाऱ्यानें तें इतकें वांकलें कीं तें केव्हां पडेल याचा नेम नाहींसा झाला, म्हणून बाबांनीं तें तोडावयास सांगितलें. तें पडून दुसऱ्या झाडांस इजा होऊं नये अशी तजवीज करण्यासाठीं सर्व नौकर लोकांना तेथें यावें लागलें. बाबा, आई, माझीं सर्व भावंडें आणि किल्ल्यांतील इतर लोकंही झाड कसें पाडतात हें पहाण्यासाठीं आले होते. त्या झाडावर एका पक्ष्याचें चमत्कारिक घरटें होतें, त्यावर सर्व मुलांचा डोळा होता, म्हणून तें झाड पाडल्याबरोबर माझे दोघे धाकटे भाऊ पळत गेले व त्यांनीं तें घरटें उचलून आणिलें व आंत काय आहे म्हणून मोठ्या कौतुकानें लक्षपूर्वक पाहूं लागले. तों कांहीं चकचकीत पदार्थ त्यांच्या दृष्टीस पडला. तेव्हां **गंभीरराव** म्हणाला, 'भाऊ, तें बघ फांद्यांमध्यें काय चकाकत आहे तें! काय हें तेज!' तेव्हां **विश्वासराव** म्हणाला, 'खरोखर, सोनें आणि हिरे ह्यांसारखें कांहीं चकाकत आहे.' त्यांचें हें संभाषण ऐकतांच **चिमाऊ** चटकन तें काय आहे हें पाहण्यास गेली, व एकाएकीं ओरडून म्हणाली, 'अग बाई! ती ही आंगठी!' व तत्क्षणीं तिचें तोंड अगदीं उतरून गेलें. इतक्यांत **विश्वासराव** आणि **गंभीरराव** यांनीं ती आंगठी फांद्यांतून सोडवून काढली व मोठ्या हर्षानें नाचत नाचत तत्काळ आईजवळ आणून दिली. ती पाहून ती म्हणाली, 'होय, हीच ती.

अरेरे! विश्वासु आणि सुशील **आनंदराव** व **शांता** यांच्यावर आम्हीं विनाकारण अपहाराची आग पाखडली. मला ही आंगठी सांपडल्यानें अतिशय आनंद झाला आहे, व **आनंदराव** आणि **शांता** जर मला पुनः भेटतील तर ह्याहूनही अधिक होईल. त्यांचा जो अपराध केला त्याचें निराकरण करण्यासाठीं ही आंगठी मी त्यांस देईन.' आईच्या तोंडांतून हे उद्गार निघत आहेत तोंच मीं तिला विचारलें, 'आई, इतक्या उंच झाडाच्या शेंड्यावरील कोल्यांत ही आंगठी कशी बरें गेली असेल?' तेव्हां **सदोबा** ह्मणाला, 'तेंच मी आतां तुम्हांला सांगणार आहें!' हे शब्द बोलतांना तुमचें निर्दोषत्व पक्कें कळून आलें हें पाहून त्या वृद्ध पारध्याच्या डोळ्यांतून आनंदाश्रु वाहत होते. तो म्हणाला, 'हें झाड इतकें उंच होतें कीं त्याच्यावर चढणें फार कठिण, त्यांत त्याच्या शिखरावर जाणें तर दूरापास्तच, तेव्हां वृद्ध बागवान् जो **आनंदराव** त्याला किंवा त्याची मुलगी **शांता** हिला इतक्या उंच चढून आंगठी तेथें ठेवितां आली नाहीं हें उघडच आहे; शिवाय, त्यांना वेळ एवढा तरी मिळाला होता काय? **शांता** किल्ल्यांतून निघून आपल्या घरीं पोंचते न पोंचते तोंच शिपायांनीं जाऊन त्या दोघांना पकडलें. मग आंगठी नाहींशी झाली तरी कशी! त्या वृक्षावरील घरव्यांत रहाणाऱ्या पक्ष्यांचा असा कांहीं स्वभाव आहे कीं, चकचकीत वस्तु असेल तेवढी त्यांना आवडते; आणि म्हणून असा कांहीं पदार्थ त्यांच्या दृष्टीस पडला कीं लागलेंच ते तो उचलून नेतात. त्यांपैकीं एका पक्ष्यानें ही आंगठी चोरून नेऊन आपल्या कोल्यांत ठेविली; ह्याशिवाय दुसरें

कांहीं कारण नाहीं. एवढा मात्र मला चमत्कार वाटतो कीं मीं आपलें सर्व आयुष्य शिकार करण्यांत घालविलें असून मला ह्या पक्ष्यांनीं आंगठी नेली असावी असा विचार सुचला नाहीं.' तेव्हां आई म्हणाली, **सदोबा,** तुम्ही म्हणतां ही गोष्ट खरी आहे, व आतां ह्या कूटाचा उलगडा माझ्या लक्षांत आला. त्या वेळच्या सर्व गोष्टी मला आतां आठवूं लागल्या आहेत. हे पक्षी झाडाच्या शिखरावरून खिडकीजवळ वारंवार येत. आंगठी नाहींशी झाली त्या वेळेस खिडकीचा पडदा वर बांधलेला होता. ज्या मेजावर मीं आंगठी ठेविली होती तें खिडकीच्या अगदीं जवळ होतें, व आपल्या खोलीचें दार पक्कें लावून मी दुसऱ्या खोलींत गेलें व कांहीं वेळ तेथेंच होतें. मी आंत नाहींसें पाहून ह्या आंगठीवर झाडाच्या शिखरावरून नेम धरून बसलेल्या एका लबाड पक्ष्यानें नकळत चोंचींत धरून ही पळवून नेली, ह्यांत कांहीं एक संशय नाहीं.' तुम्हावर विनाकारण आळ आला अशी बाबांची पक्की खातरी होऊन त्यांना फार वाईट वाटलें. ते म्हणाले, 'त्या सुशील **आनंदरावाला** व **शांतेला** इतका त्रास दिल्यामुळें माझें चित्त अगदीं फाटून गेलें आहे. दु:खांत सुख मानण्याची गोष्ट हीच कीं ही गोष्ट दुष्ट बुद्धीनें न होतां अज्ञानानें व चुकून झाली आहे.' यानंतर ते **चिमाऊ**कडे गेले. इतर सर्वांचीं तोंडें आनंदानें प्रफुल्लित झालीं असतां, तिचें तोंड अगदीं उतरलेलें होतें, व एकाद्या दोषी मनुष्याप्रमाणें तिचें अंग थरथर कांपत होतें. तिला बाबा रागावून म्हणाले, 'दुष्टे! कृतघ्ने! आपल्या धन्यापुढें व न्यायासनापुढें खोटें बोलण्याचें धारिष्ट तुला कसें झालें!

ज्या कृत्याच्या दुष्टपणाबद्दल तुझा सूड घेणें अवश्य आहे, असें कृत्य करण्याची बुद्धि तुला कशी झाली ! वृद्ध, विश्वासू, अशा मनुष्याला व त्याच्या निरपराधी गरीब कन्येला दुःखसमुद्रांत लोटून देण्याचें धाडस तुला कसें झालें!' झाड तोडण्यास मदत करण्यासाठीं दोन शिपाई आले होते, व हें वर्तमान ऐकून **चिमाऊ**बद्दल काय हुकूम होतो म्हणून त्यांची नजर बाबांकडे होती. त्यांस बाबांनीं तिला पकडावयास सांगून, '**शांते**च्या पायांत ज्या बेड्या घातल्या होत्या त्याच तिच्या पायांत घाला, व ज्या खोलींत आपल्या मत्सरानें **शांते**ला हिनें कोंडविलें त्याच खोलींत हिला कोंडून ठेवा. **शांते**ला अन्यायामुळें जेवढें ह्मणून दु:ख सोसावें लागलें तेवढें सारें हिला सोसलें पाहिजे; इतकेंच नाहीं, तर, ज्या अधिकाऱ्यानें **शांते**ला माझ्या प्रांताबाहेर घालविलें, त्यानेंच ह्या **चिमाऊ**लाही हद्दपार करावें.'–असें सांगितलें. हे बाबांचे शब्द ऐकून तेथें असलेलीं सर्व मनुष्यें अगदीं भिऊन गेलीं, व त्यांचीं तोंडें फिकीं पडून एकाच्यानेंही चकार शब्द काढवला नाहीं, कारण बाबांला इतके संतापलेले कोणीं कधींही पाहिलें नव्हतें, व इतक्या निष्ठुरपणें बोलतांना ऐकिलेंही नव्हतें. कांहीं वेळ चोंहीकडे स्तब्ध झालें, व नंतर ज्याला जें कांहीं वाटत होतें तें त्यानें मोकळ्या मनानें सांगितलें. त्या दोघा शिपायांपैकीं एकजण **चिमाऊ**चा हात धरून ह्मणाला, 'हें फार रास्त केलें, कारण जो दुसऱ्याकरितां खाडा खणितो तोच त्या खाड्यांत पडतो.' दुसऱ्या शिपायानें तिचा दुसरा हात धरून म्हटलें, "खोटें बोलण्याचें असेंच फळ प्राप्त व्हाववयाचें. अंधारांत केलें तें उजेडांत आलें,—असें म्हण-

तात तें कांहीं खोटें नाहीं.' घरचा आचारी म्हणाला, 'शांतेला दिलेला शालू सुरेख असल्यामुळें चिमाऊला राग आला, व त्या रागाच्या झपाट्यांत मी काय करितें ह्याचें भान न राहतां तिनें खोट्यानाट्या गोष्टी सांगितल्या; व नंतर आपला दुष्टपणा उघड केल्याशिवाय, मी बोललें तें खोटें बोललें,- असें तिला सांगतां येईना; ह्यावरून, अपराधचक्रांत सांपडल्यावर आपल्याला त्याच्यांतून बाहेर पडतां येत नाहीं,-असें जें म्हणतात, तें खोटें नव्हे.' इतक्यांत झाड तोडण्याचें काम संपवून खांद्यावर कुऱ्हाड टाकून गाडी हाकणारा गडी तेथें येऊन म्हणाला, 'जें झालें तें ठीक झालें. परलोकीं याहून वाईट स्थितीला न पोंचावें अशी जर तुझी इच्छा असेल तर आतां तरी आपली वर्त्तणूक सुधार.' नंतर आपल्या खांद्यावरची कुऱ्हाड हालवून तो म्हणाला, 'जें जें झाड चांगलें फळ देत नाहीं तें तोडून अग्नींत टाकिलें जातें.' आंगठी सांपडल्याची बातमी एका क्षणांत सुवर्णपुरीभर पसरली, आणि सारे लोक तेथें आले व आह्मांभोंवतीं थोडक्या काळांत फार गर्दी जमली. आमचे न्यायाधीशही बागेंत आले, तेव्हां त्यांस जो तो आंगठीचा शोध कसा लागला हें मोठ्या उत्कंठेनें सांगूं लागला. शांते, ती हकीकत ऐकून त्या सुशील न्यायाधिशांच्या मनावर काय परिणाम झाला त्याची कल्पना करणें तुला अशक्य आहे. जरी त्या वेळेस तुझ्याविषयीं ते कठोरपणानें वागले, तरी त्यांचें सर्व आयुष्य कायदे पहाण्यांत व रास्तपणानें न्याय करण्यांत गेलें असल्यामुळें ते निःसंशय फार प्रामाणिक झाले आहेत व त्यामुळेंच, 'जर हा अन्याय घडला नसता

तर मी आपली अर्धी तर काय, पण सारी दौलतही मोठ्या खुशीनें खर्च केली असती, कारण निरपराध्यावर दोषारोप करणें ह्यासारखी भयंकर गोष्ट दुसरी कोणतीही नाहीं;- हें ते अशा सुरावर बोलले कीं तें बोलणें सर्वांच्या हृदयांत भिनलें. नंतर ते जमलेल्या मंडळीकडे पाहून मोठ्यानें व गंभीरपणानें म्हणाले, 'जो कधींही फसणार नाहीं व ज्याच्या हातून कधींही अन्याय घडणार नाहीं, असा ईश्वराशिवाय दुसरा कोणीही न्यायाधीश नाहीं. त्याला सर्व ठाऊक असतें. आंगठी नाहींशी कशी झाली हें त्याशिवाय कोणासही माहित नव्हतें, व इतके दिवस ही आंगठी कोठें लपविलेली होती हें फक्त त्यासच ठाऊक होतें. इहलोकच्या न्यायाधिशांस अंतर्गत गोष्टी दिसत नाहींत, व केव्हां केव्हां न्यायाच्या कामांत त्यांच्या हातून चुका घडतात; तथापि निर्दोषी मनुष्यास दुःख भोगावें लागलें व दुष्ट मनुष्याचा उदय झाला असें क्वचित् या जगांत होतें. जो अदृश्य **न्यायाधीश** एके दिवशीं सत्कृत्यें करणारांस बक्षीस व दुष्कृत्यें करणारांस शासन देईल, त्याचा असा मनोदय आहे कीं, येथें देखील निरपराध्यांवर दोषांचा संशय येऊं नये व गुप्त अपराध उघडकीस आल्यावांचून राहूं नयेत. पहा, त्याची ही इच्छा परिपूर्ण करण्यासाठीं कशा चमत्कारिक गोष्टी घडल्या! प्रथम गेल्या रात्रीं ज्यानें सर्व किल्ला हालवून दिला व ज्यामुळें आमच्या अंगाचा थरकांप झाला, असें वादळ सुटून त्यामुळें हें जुनें झाड वांकून पडेल कीं काय असें झालें; नंतर एकाएकीं एवढा मोठा पाऊस आला कीं त्यामुळें त्या पक्ष्यांच्या घरट्याची आंतली बाजू धपून निघून त्यांतील

आंगठी स्पष्ट दिसावी; पुढें ह्या खिलाडू चपळ मुलांनीं तें घरटें आणण्याच्या नादास गुंतून त्यांस ती आंगठी सांपडल्याबरोबर ती त्यांनीं आणून द्यावी; व शेवटीं खोटें बोलणाऱ्या **चिमाऊनें** मोठ्यानें ओरडून —ही ती आंगठी!— असें ह्मणून **शांतेचें** निर्दोषत्व प्रसिद्ध करावें! असे चमत्कार वारंवार घडतात. परलोकीं जुन्या खटल्यांची तपासणी करून ज्याच्या त्याच्या कर्माप्रमाणें त्यास फळ द्यावें हें **ईश्वरानें** आपल्या हातीं ठेविलें आहे. तथापि सर्वज्ञ **ईश्वर** लोकांचे डोळे उघडून आपणाकडे लागावे ह्मणून केव्हां केव्हां अशा गोष्टी घडवून आणितो; त्यांच्यामुळें आपली खातरी होतेच कीं नीतीस अनुसरून सर्व गोष्टी घडतात व ज्यास जें फळ योग्य तेंच त्यास मिळतें, हें त्या न्यायाधिशाचें भाषण सर्वांनीं लक्षपूर्वक ऐकिलें, व त्याचें म्हणणें बरोबर आहे असें म्हणून सर्व उद्विग्नचित्त होऊन आपापल्या उद्योगाला गेले. **शांते**, ह्याप्रमाणें आंगठी सांपडली त्यासंबंधाची हकीकत आहे."

मंजुळा ही सद्वार्ता **शांतेला** सांगत असतां, **शांता** लक्षपूर्वक ऐकत होती, व आपल्या वर्त्तनावरचा अणुमात्रही संशयरूपी कलंक घालवून आपल्या सर्व परिचित मनुष्यांच्या मनांत आपल्या निर्दोषत्वाविषयीं ज्यानें खातरी करून दिली अशा सर्वशक्तिमान् **परमेश्वराविषयीं** आपली पूज्यबुद्धि व कृतज्ञता दाखविण्यासाठीं ती मधून मधून आपले नेत्र आकाशाकडे लावी.

ती हकीकत व त्यांची वाट बरोबरच संपली, व त्या दोघी किल्ल्याच्या दरवाजाजवळ येऊन ठेपल्या.

प्रकरण १७.

आरोपमार्जन.

मागच्या प्रकरणांत सांगितल्या प्रमाणें त्या गांवचा धर्माधिकारी किल्ल्यांत गेला त्या वेळेस **मंजुळे**चीं मातापितरें व त्या घरांतील इतर माणसें श्रीमंतींतील हौसेनें सुशोभित केलेल्या दिवाणखान्यांत बसलीं होतीं. तेथें गेल्यावर त्यानें त्यांस **आनंदराव** व **शांता** ह्यांची त्यास ठाऊक असलेली हकीकत सांगितली, व त्यांनीं एकाग्रचित्तानें ती ऐकिली. पर्णकुटींत असतां त्या वृद्ध धार्मिक मनुष्याचे उदार विचार व शुद्ध वर्त्तन त्यास कळलें होतें. त्यांचें वर्णन त्यानें इतकें मनापासून व उत्साहपूर्वक केलें कीं जणू त्याचें चित्र प्रत्येकाच्या डोळ्यापुढें उभेंच राहिलें. त्यांत **आनंदरावा**च्या मनांत **प्रतापरावा**विषयीं व त्यांच्या कुटुंबाविषयीं जी पूज्य बुद्धि व प्रीति होती तिचें त्यानें विशेष वर्णन केलें. त्याप्रमाणेंच **शांते**ची पितृभक्ति व्यक्त करणाऱ्या अनेक प्रसंगांविषयीं सांगून, तिचा अविश्रांत उद्योगीपणा, शांतपणा, आणि विनय ह्या गुणांची त्यानें फार तारीफ केली. उपाध्यायाचें तें सर्व भाषण ऐकून प्रत्येकाच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहूं लागल्या. त्याच वेळीं एका हातांत **शांते**चा हात व दुसऱ्या हातांत पुष्पकरंडक धरून **मंजुळा** त्या हांड्यांनीं सुप्रकाशित दिवाणखान्यांत आली. **शांते**ची सर्व हकीकत सर्वांना समजली असल्यामुळें तिला पाहतांच सर्वांनीं चढाओढीनें तिचें स्वागत व अभिनंदन केलें. मोठ्या मायेनें **शांते**चा हात धरून **मंजुळे**चा पिता ह्मणाला, "अरेरे! तूं किती रोड आणि निस्तेज झाली आहेस! तूं तरूण

असून तुझ्या गालांवरची टवटवी जाऊन जें कांहीं दिवसांपूर्वी अगदीं गुळगुळीत होतें, त्या ह्या तुझ्या कपाळावर सुरकुत्या पडण्यास आमचें अविचाराचें वर्तन कारण झालें, हें पाहून मला फार वाईट वाटतें. असो, पुनः तुझी प्रकृति पूर्ववत् होण्याविषयीं जेवढे उपाय आमच्या हातून होण्याजोगे आहेत तेवढे करूं. ज्या घरांतून तुला आह्मीं हाकून लाविलें तें घर इत:पर तुला दिलें आहे. **सुवर्णपुरीं**तील सुंदर घर आणि बाग तुझ्या पित्याकडे भाड्यानें होतीं; परंतु आतां त्यांची तूं मालकीण झालीस."

नंतर **प्रियंवदाबाईनें शांते**चें चुंबन घेऊन तिला पोटाशीं धरिलें; व जिच्यामुळें इतके अनर्थ घडले, ती आंगठी आपल्या बोटांतून काढून हातांत घेऊन ह्मणाली, "**शांते**, जशी माझी **मंजुळा** तशीच तूंही मला आहेस. ह्या आंगठीवर जो मोठा हिरा चकाकत आहे त्यापेक्षां तुझें भक्तिरूपी रत्न फार अमूल्य आहे खरें, तथापि, तुझ्याविषयीं जो कांहीं प्रेमभाव व मातृवात्सल्य माझ्या मनांत उत्पन्न झालीं आहेत त्यांचें, व तुह्माला जे आमच्यापासून अपकार झाले त्यांचे प्रतिकाराचें अल्प चिन्ह ह्मणून ही आंगठी तुजजवळ राहूं दे." असें ह्मणून तिनें ती आंगठी **शांते**च्या बोटांत घातली. इतके दिवस **शांते**च्या डोळ्यांतून दु:खाश्रु गळत असत, पण आतां आनंदाश्रु गळूं लागले. त्यांचें इतकें प्रेम पाहून तिला कांहीं सुचेनासें झालें व त्या देणग्यांच्या भारानें 'मी अगदीं दडपून गेलें,' असें तिला वाटलें. ती आंगठी तिनें बोटांतून काढून हातांत घेतली तेव्हां तेथील मंडळीपैकीं एक पोक्त मनुष्य ह्मणाला, "मुली, तुझा उदार कल्याणकर्ता तुला ही आंगठी देत

आहे ती तूं घे. ईश्वरानें तुझ्या कल्याणकर्त्यांना अगणित द्रव्य दिलें आहे, इतकेंच नाहीं, त्यापेक्षां अति मूल्यवान् अशी वस्तु त्यानें त्यांस दिली आहे. ती कोणती ह्मणशील तर आपल्या द्रव्याचा सद्व्य करण्याची आवड होय." तेव्हां प्रियंवदाबाई ह्मणाली, "अशी आमची व्यर्थ प्रशंसा करूं नका. आह्मीं हा उपकार केला असें नाहीं; आम्हांस उचित तेंच केलें आहे." शांतेचा स्वभाव मर्यादशील असल्यामुळें ती आंगठी हातांत घेतल्यावर तिला कांपरें भरलें व कसें करावें ह्मणून विचार करण्यासाठीं आसवांनीं भरलेल्या डोळ्यांनीं उपाध्यायाकडे पाहूं लागली. तेव्हां तो पूज्य मनुष्य ह्मणाला, "शांते, आंगठीचा स्वीकार तूं अवश्य करावा. सुशील मुली, हें पहा, तुझ्या पितृभक्तीचें फळ देण्यास ईश्वरानें आरंभ केला आहे. 'जो कोणी आपल्या मातापितरांचा निःसीम भक्तीनें सन्मान राखतो तो पूज्य होतो' असें स्वतः ईश्वराचें वचन आहे, व त्या वचनाची सार्थकता करण्यासाठीं त्यानें प्रतापरावांस व त्यांच्या पत्नीस योजिलें आहे. असें आहे तर ही मूल्यवान् देणगी कृतज्ञतापूर्वक त्वां घ्यावी, व ज्याप्रमाणें विपत्तींत ईश्वरेच्छेवर अवलंबून तूं आचरण केलें, त्याप्रमाणेंच संपत्तीच्या कालींही परोपकारशील, दयाळू, व ईश्वराविषयीं कृतज्ञताबुद्धि बाळगणारी तूं हो, ह्मणजे झालें." हें उपाध्यायाचें भाषण ऐकून, शांतेनें आंगठी बोटांत घातली, व अश्रूंनीं तिचा गळा दाटला होता, तरी तिनें त्यांचे आभार मानिले.

मंजुळा तो पुष्पकरंडक हातांत घेऊन शांतेजवळच उभी होती, ती हें आपल्या मातापितरांचें उदार कृत्य पाहून फार हर्ष पावली; व त्या वेळेस तिच्याकडे कोणीं

पाहिलें असतें, तर ही कोणी प्रेममूर्तिच आहे, असें त्यास वाटलें असतें. उपाध्यायास जगाचा पुष्कळ अनुभव असल्यामुळें, कोणी एका मुलाच्या आईबापांनीं दुसऱ्या मुलांची प्रशंसा केली तर त्या मुलाच्या मनांत दुसऱ्या मुलांविषयीं मत्सरभाव उत्पन्न होतो, असें ठाऊक होतें; ह्मणून **मंजुळे**ची निर्लोभ बुद्धि पाहून त्यास फारच आश्चर्य वाटलें; व तो ह्मणाला, "गरीब पोरक्या मुलीवर तुह्मीं उभयतांनीं जे उपकार केले त्याबद्दल तुमची कन्या गुणवान् करून ईश्वर तुह्मांस शतगुणित बक्षिस देवो."

प्रकरण १८.

ह्या कथेसंबंधी आणखी एक चमत्कार.

नंतर **प्रियंवदा**बाईनें आचाऱ्यास वाढावयास सांगितलें व **शांतेनें** आपल्याजवळ जेवायास बसावें अशी इच्छा दाखविली. त्या वेळेस असलेल्या उत्तम चालीप्रमाणें आशीर्वचन चाललें असतां **शांते**च्या मनांत कांहीं विलक्षण उमाळा आला. असो. सर्व पात्रें वाढल्यावर **शांतेला** **प्रियंवदा**बाई व **मंजुळा** यांच्यामध्यें बसावयास सांगितलें, तेव्हां 'माझी तेथें बसण्याची योग्यता नाहीं' असें तिनें मर्यादेनें सांगितलें. परंतु, **प्रियंवदा**बाईनीं 'तूं तेथें बसलेंच पाहिजे,' असें ह्मणून तिचा हात धरून तिला आपल्या कन्येच्या व आपल्यामध्यें आणून बसविलें. भोजन चाललें असतां **शांते**च्या चरित्राशिवाय दुसरा कोणताही बोलण्याचा विषय नव्हता. **सदोबाला** आपल्या धन्याला वाढण्याची फार आवड असे. ह्या रात्रीं तो **शांते**च्या

अगदीं मागें एकसारखा उभा होता, व त्याच्या डोळ्यां-तून एकसारखे अश्रु गळत होते. वयानें पोक्त असल्या-मुळें, कोणत्याही प्रसंगीं तो कांहीं बोलल्यास चालत असे, ह्मणून तो ह्मणाला, "**शांते**, माझी आणि तुझी व तुझ्या पि-त्याची अरण्यांत गांठ पडली होती त्या वेळेस जें मीं तुह्मास सांगितलें त्याची प्रतीति शेवटीं आली हें पहातेसना! ज्याचा **ईश्वरा**वर भरंवसा आहे, त्यानें **ईश्वर** आपलें संरक्षण करील ह्मणून निश्चित असावें. ह्या प्रसंगीं तुझा वृद्ध व मान्य पिता व माझा प्रिय बालमित्र हा सुदिन पहाण्यास जीवंत नाहीं एवढी मात्र दुःखाची गोष्ट आहे. तो तुझा पिता आज जीवंत असता, तर त्याला सर्व पृथ्वींत अत्यंत प्रिय जी तूं, त्या तुझा उजळ माथा व तुला मिळालेला एवढा सन्मान हीं पाहून किती बरें आनंद झाला असता! खरोखर ह्या सुदिनाचा सुखोपभोग घेण्यास तो नाहीं, हें पाहून मला फार वाईट वाटतें!"

त्यावर उपाध्याय **सदोबास** ह्मणाला, "हे सुशील वृद्ध मनु-ष्या, तुझे हे विचार ऐकून मला फार समाधान वाटतें. ह्यांस वागविणारें तुझें अंतःकरण सन्मानार्ह आहे; तथापि आपले विचार इहलोकापुरतेच नसावेत; कारण आपल्या अस्ति-त्वाच्या सर्व अवधींत आपला आयुष्यकाल अति लहान व दुःखमय आहे. ज्याप्रमाणें समुद्रांत प्रवेश करण्यास नदीचें मुख हें साधन, त्याप्रमाणें परलोकांत प्रवेश करण्यास हें जीवित आहे; ह्याशिवाय त्याचा दुसरा कांहीं एक उप-योग नाहीं. आतां, मनुष्य पुढें कोठें जावयाचा ह्याचा विचार न करितां, आपण जर त्याच्या सांप्रत स्थितीचा विचार चालविला, तर त्यांत पुष्कळ चुक्या होण्याचा संभव

आहे; परंतु तेंच जर आपण स्वर्गीय स्थितीकडे लक्ष ठेवून पाहिलें तर सर्व प्रकारें आपल्या मनास समाधान होईल, असे विचार आपणास सुचतात. **शांता** आणि **आनंदराव** ह्यांची अशीच स्थिति झाली : त्यांत फरक मात्र एवढाच कीं उभयतांचा न्याय येथें न होतां फक्त **शांते**स जें दु:ख सोसावें लागलें त्याचा निकाल मोठ्या सुरेख तऱ्हेनें लागला; परंतु तिचा पिता दोषारोपांतच व विपत्तिसागरांत राहून मरावा, असें **ईश्वरा**स बरें वाटलें. तथापि आपल्या सुदैवानें ह्यापेक्षां चांगला स्वर्गलोक आहे, व त्या ठिकाणीं तो आतां परमानंदाचा अनुभव घेत आहे. फार तर काय सांगावें, ह्या ठिकाणीं बसलेल्या आपणा सर्वांचें सुख त्याच्या सुखाच्या कोट्यंश देखील नाहीं; व ह्याशिवाय आपणास जितका वाटत आहे, त्यापेक्षां ह्या अपराधमार्जनानें त्यास विशेष आनंद होत आहे, असें माझें शुद्ध मन मला साक्ष देतें. त्यास असा आनंद होण्याचें दुसरें एक कारण आहे तें हें कीं अंतकाळीं त्याचा ह्या त्याच्या कन्येशिवाय दुसऱ्या कशावरही हेतु नव्हता. हो! हो! बरी आठवण झाली. **आनंदरावा**विषयीं जें कांहीं मी बोललों त्यांत एक गोष्ट सांगायाची राहिली; ती मी आतां तुह्मास सांगतों. तो आजारी असतां एके दिवशीं सकाळीं मी त्याच्याकडे जाऊन बसलों होतों. त्याचा **ईश्वरी**सूत्रावर पूर्ण विश्वास होता, हें खरें, पण आपल्या प्रिय कन्येविषयीं त्याच्या मनांत काळजी नव्हती असें नाहीं. त्या दिवशीं पाहिलें तों त्याचें मुख नेहमींपेक्षां विशेष प्रफुल्लित दिसलें; इतकेंच नाहीं तर त्या दिवशीं तो हास्यमुख दिसत होता. 'आज कांहीं बरें आहेसें वाटतें,' असें मीं ह्म-

टल्यावर आपला हात पांघरूणांतून बाहेर काढून तो ह्मणाला, 'महाराज, माझ्या कन्येविषयीं काळजी माझ्या चित्तांतून एकदाची निघून गेली, व आतां माझें मन अगदीं शांत झालें आहे. गेल्या रात्रीं, जन्मांत कधीं घडली नाहीं अशी मनापासून प्रार्थना मीं केली. त्यापासून पूर्वीं कधीं न अनुभविलेली शांति व समाधान मला प्राप्त झालें. मला पक्की खातरी आहे कीं माझी प्रार्थना ईश्वर ऐकेल. प्रार्थना झाल्यावर मी डोळे मिटून स्वस्थ निजलों, कारण मला असें खास वाटलें कीं माझ्या **शांतेचें** निर्दोषत्व खचित प्रसिद्ध होईल, व **प्रियंवदाबाई** व तिचा पति, हीस मातापितरांप्रमाणें होतील!' त्या धार्मिक वृद्ध मनुष्याचें तें भाषण मला अगदीं चक्क आठवतें, व ज्या रात्रीं ही गोष्ट झाली त्याच रात्रीं **सुवर्णपुरीस** मोठें वादळ होऊन किल्ल्याजवळच्या बागेंतलें तें मोठें जांभळीचें झाड पडण्याची भीति वाटली व त्याच्या दुसऱ्या दिवशींच हरवलेली आंगठी सांपडून **शांतेचा** निरपराधीपणा सिद्ध झाला, हें नुकतेंच मला समजलें व त्यापासून मला फारच आश्चर्य वाटत आहे. सारांश, तो प्रार्थना करीत असतांच त्या प्रार्थनेचें कार्य घडून आलें. त्या धार्मिक वृद्ध मनुष्यानें रात्रीं प्रार्थना करतांच ती **ईश्वरानें** ऐकिली, ह्या गोष्टीनें तो सर्व वृत्तांत कसा घडला हें स्पष्ट कळतें व त्यामुळें आनंदही होतो. **ईश्वराचें** दूरदर्शित्व सिद्ध करण्यासाठींच हें लहानसें वृत्त घडलें असें वाटतें! आपली जी ही भेट झाली ती साहजिक घडली असें ह्मणतां येत नाहीं, व ज्यामुळें आपणास एवढा आनंद होत आहे, असा हा हृदयद्रावक प्रकार अकस्मात् घडून आला असेंही नाहीं; तर त्या **ईश्वराच्या** चां-

गुलपणानें व शुद्ध योजनेनेंच मी तुमचा अपरिचित असतांही मला ह्या तुमच्या मंडळींत त्यानें आणिलें. ह्या चरित्रांतील गूढ गोष्टीचा ज्यामुळें उलगडा झाला, व जें मला त्यानें अंतकालीं विश्वासानें सांगितलें, त्याची साक्ष मीं द्यावी असें त्याच्या मनांत होतें; त्याशिवाय अशी गोष्ट घडली नसती. असो, ह्यावरून घेण्याजोगी गोष्ट ही कीं 'सर्व गोष्टींवर **ईश्वराची** पूर्ण सत्ता आहे. आपल्यावर असलेल्या प्रीतीमुळें ज्याचें हृदय निरंतर जागृत आहे, असा श्रेष्ठ पिता **ईश्वरा**वांचून कोणी नाहीं, अशी आपली निरंतर श्रद्धा असावी.'''

ह्या उपाध्यायाच्या भाषणानंतर उभ्या राहून त्याचा हात धरून **प्रियंवदाबाई** ह्मणाल्या, "तुमची जशी श्रद्धा आहे तशीच माझीही आहे." तेथें असलेल्या सर्वांच्या मनांत तोच भक्तिभाव असल्यामुळें सर्वांनींही **प्रियंवदाबाईचें** अनुकरण केलें.

"आतां रात्र फार झाली आहे, व आपल्याला उद्यां पहांटेस येथून जावयाचें आहे, म्हणून आतां ज्यानें त्यानें आपापल्या ठिकाणीं विश्रांति घेण्यास जावें ह्मणजे उपाध्यायांनीं आपल्या भाषणानें उत्पन्न केलेला भक्तिभाव तसाच कायम राहील," असें **प्रियंवदाबाईनीं** सांगितल्यावरून, ईश्वराविषयीं कृतज्ञबुद्धिभरित होऊन, सर्व आपापल्या ठिकाणीं निजायास गेले.

प्रकरण १९.

पर्णकुटी.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं सूर्योदय होतां क्षणींच किल्ल्यांतील सर्व लोक जाण्याची तयारी करूं लागले; परंतु त्या

सर्वांची **शांते**विषयीं आस्था अवर्णनीय होती. पर्णकुटिकेंत असतां तिला कपडे विकत घ्यावे लागत ते तिच्याजवळ फारसे पैसे नसल्यामुळें जाडेभरडेच असत, व तिनें ते घातले असतां, ती एकाद्या खेडेगांवांतल्या बाईप्रमाणें दिसे. अशा स्थितींत तिला पहाणें **मंजुळे**ला न आवडल्यामुळें, तिनें–**शांते**ला तूं आपले कपडे दे–ह्मणून **शांते**च्या उंचीच्या आणि वयाच्या आपल्या मैत्रिणीस सांगितलें. हे कपडे व्यवस्थित, सुरेख व नवे असून फार मोठे किंमतवान्ही नव्हते, व तिच्या हल्लींच्या स्थितीस शोभणारे होते. ते कपडे घालावयास **शांते**स देतांना **मंजुळा** ह्मणाली, "**शांते**, नको ह्मणूं नको, तूं माझी सोबतीण तर आहेसच, परंतु आजपासून तुझें माझें खाणेंपिणें, निजणेंबसणें,—सर्व व्यवहार—बरोबरच होणार; तेव्हां तुला माझ्यासारखे कपडे घातले पाहिजेत." नंतर थोडा फराळ करून **शांता**, **मंजुळा** व तिचीं मातापितरें एका गाडींत बसून **शांता** रहात होती त्या पर्णकुटिकेंत जाण्यास निघालीं. ज्या शेतकऱ्यानें **शांते**ला व तिच्या पित्याला स्वागतपूर्वक आश्रय दिला, त्याची ओळख करून घेण्याची **प्रतापरावां**स इच्छा झाल्यामुळें त्यांनीं ही योजना केली होती. गाडी चालत असतां, त्यांची स्थिति कशी आहे हें त्यांनीं **शांते**स विचारिलें; तें सर्व, कांहीं एक न लपवितां, **शांते**नें त्यांस सांगितलें. शेवटीं ती ह्मणाली "त्यांची स्थिति इतकी दु:खकारक आहे कीं त्यांस ह्या वृद्धापकाळांत एक क्षणही दु:खावांचून जाण्याची आशा नाहीं."

गाडी पर्णकुटिकेजवळ येऊन पोहोंचतांच, तेथल्या लोकांस फार आश्चर्य वाटून त्यांची फार गडबड झाली; कारण ती

बांधल्यापासून तेथें गाडी, निदान इतका सुंदर रथ तर, कधीं गेला नव्हता. गाडी दाराशीं येऊन थांबतांच सुंदराबाई मोठ्या धांदलीनें धावत दारापाशीं गेली व "महाराज, खालीं उतरा, मीं तुम्हास व तुमच्या ह्या मुलींस उतरूं लागतें," असें म्हणून तिनें प्रथमत: शांतेलाच आपला हात दिला, परंतु तिला ओळखतांच, सर्पदंश झाल्याप्रमाणें तिनें तो माघारा घेतला व हिरमुसली होऊन निस्तेज पडली.

शेतकरी बागेमध्यें काम करीत होता त्याच्याकडे सर्वजण धावत गेलीं व त्याला सलाम करून शांतेवर व तिच्या पित्यावर त्यानें केलेल्या उपकारांबद्दल त्या तिघांनींही मोठ्या प्रेमानें आभार मानिले. तेव्हां तो सज्जन शेतकरी म्हणाला, "छे! छे! माझे जे उपकार त्यांच्यावर झाले, त्यांपेक्षां त्यांचे माझ्यावर जास्त झाले आहेत. त्यांच्या बरोबरच ईश्वराचा आशीर्वाद आम्हांवर आला, व त्यांनीं जो म्हणून उपदेश केला त्याप्रमाणें मी वागलों असतों, तर आज माझी स्थिति आहे ह्यापेक्षां फारच चांगली असती; ते वारल्यापासून ह्या जागेशिवाय मला दुसऱ्या कोठेंही कर्मेनासें झालें आहे; शिवाय त्यांच्याच सांगण्यावरून हा जमिनीचा तुकडा मीं आपल्याकडे ठेविला, नाहीं तर मला कांहीं एक मिळालें नसतें. त्यांनींच मला फुलझाडें वगैरे लावण्यासवरण्याची रीत शिकविली. वृद्धापकाळामुळें शक्ति क्षीण झाली, व शेतकीचें काम होईनासें झालें, व घरांत बसून स्वस्थता नाहीं म्हणून मी आपला काळ या बागेंत वनस्पति व पुष्पें ह्यांत घालवितों."

इकडे शांता शेतकऱ्याच्या बायकोस भेटण्यास तिच्या

लहानशा खोलींत गेली, व तिला हातांत धरून बागेंत घेऊन आली. ती वृद्ध बाई दु:खानें अतिशय वांकली असल्यामुळें **शांता** एकसारखें तिचें समाधान करीत होती. कांपत कांपत, व घाबऱ्या घाबऱ्या, **शांतेचा** हात धरून ती त्या ठिकाणीं गेली, व सरदार, **प्रियंवदाबाई** व **मंजुळा** ह्यांनीं मानलेल्या आभारामुळें तिच्या डोळ्यांतून अश्रु गळूं लागले. त्या दोघा वृद्ध स्त्रीपुरुषांस बोलवेनासें झालें, व तीं पोरांसारखीं रडूं लागलीं. शेवटीं शेतकरी ह्मणाला, "**शांते**, तुझ्या पितृभक्तीचें फळ तुला प्राप्त होईल ह्मणून मीं सांगितलें नव्हतें का? माझें भविष्य खरें झालें."

इतक्यांत त्या ह्मातारीलाही अमळ धीर आला व ती ह्मणाली, "**शांते**, तुझे बाबा जें ह्मणत कीं 'जो **ईश्वर** फुलासही आच्छादन देतो त्याला तुझी काळजी कशी घ्यावी हें चांगलें माहित आहे,' तें सर्व खरें आहे." हा सर्व प्रकार चालला असतां **सुंदराबाई** दुरून तो सर्व प्रकार पाहून आपल्याशींच पुटपुटूं लागली:—"काय बाई चमत्कार तरी हा! या जगांत काय होईल आणि काय होणार नाहीं, हें कांहीं सांगवत नाहीं. कालना ही पोरगी अगदीं भिकाऱ्याहून भिकारी होती, आणि आजच पहा मोठ्या एकाद्या श्रीमंताच्या मुलीसारखी दिसूं लागली! ही स्थिति हिला प्राप्त होईल असें कोणाच्या ध्यानीं मनीं तरी होतें का! हिच्या बरोबर जिची आतां तुलना करितां येईल, अशी आमच्या साऱ्या शहरांत एकही बायको मिळावयाची नाहीं. तथापि ही कोण आहे तें सर्वांस ठाऊक आहे. काल संध्याकाळीं एक लहानसें गाठोडें खाकेस मारून दुनेंयत भीक मागायला जाण्यास निघाली, हेंही सर्वांस ठाऊक आहे."

प्रतापरावांनीं हें तिचें तिरस्काराचें भाषण ऐकिलें नाहीं खरें, परंतु तिच्या क्रुद्ध मुद्रेवरून व वेड्यावांकड्या तोंडावरून तिच्या मनांत काय चाललें आहे, हें त्यांनीं तेव्हांच ताडिलें, व ही कृत्या आहे, असें आपल्याशीं ह्मटलें; नंतर बागेंत विचार करण्यासाठीं अमळ इकडे तिकडे फिरून शेतकऱ्याजवळ जाऊन ते म्हणाले, “ बाबा, मला तुम्हास कांहीं विचारावयाचें आहे, त्याकडे अमळ लक्ष द्या. शांतेचा पिता जीत बागाईत करीत होता, ती जमीन मीं शांतेला इनाम दिली आहे: परंतु तिला इतक्यांतच गृहस्थिति संभाळतां येणार नाहीं, तर तुह्मी तिच्याबरोबर राहाण्यास याल काय ? तुह्माला ह्या ठिकाणचें कांहीं बंधन नसल्यामुळें तिकडे येण्याचें कांहीं कठिण नाहीं. तुमची धनीण, म्हणजे शांता, तुमच्यापासून कांहीं भाडें घेणार नाहीं, याची मला पक्की खातरी आहे. त्या ठिकाणीं आपल्या मर्जीप्रमाणें वनस्पति व फुलझाडें तुह्मी लावा. तुमच्या वृद्धापकाळीं त्या ठिकाणीं तुह्मांस शांति आणि समाधान मिळेल. ”

प्रियंवदाबाई, मंजुळा व शांता ह्या तिघीनींही प्रतापरावांचें ह्मणणें कबूल करण्याविषयीं गळ घातली. त्या ठिकाणीं त्यांस सुखाचा लेशही प्राप्त होत नव्हता; तेथून कोठें तरी जावें हें बरें, असें त्यांस वाटत असल्यामुळें, इतक्या आग्रहाची जरूर नव्हती; त्यांनीं सरदाराच्या ह्मणण्यास रुकार दिला.

या वेळेस शेतकऱ्याचा मुलगा शेतांतून घरीं आला. चार पांढरे सफेत घोडे जोडलेला रथ आपल्या दारापुढें येण्यास काय अद्भुत निमित्त झालें असेल याची जिज्ञासा

त्यास फार झाली होती. असो. जरी आपल्या मातापितरांचा वियोग आपणास होणार ह्मणून त्याला फार वाईट वाटलें; तथापि त्या दु:खावस्थेतून ह्या व्यवस्थेमुळें त्यांची सुटका होईल, असें मनांत आणून, त्यांच्या जाण्यास त्यानें अनुमोदन दिलें. इतके दिवस आपली बायको आपल्या मातापितरांस फार वाईट रीतीनें वागविते हें पाहून, त्या मुलास वारंवार अतिशय दु:ख होत असे, व तीं आतां सुखांत जाऊन पडतील ह्मणून त्यास मोठें समाधान झालें. ही झालेली व्यवस्था पाहून **सुंदराबाई**च्या अंगाचा तिळपापड झाला; व ती **प्रतापरावां**स ह्मणाली, "ह्या थेरड्यांना तुह्मी आह्मापासून दूर करीत आहां, हा आमच्यावर तुमचा फार मोठा उपकार आहे."

असो. **प्रतापरावां**नीं, "सर्व व्यवस्था झाल्यावर तुह्मांस बोलावणें पाठवूं," असें त्या वृद्ध स्त्रीपुरुषांस सांगितलें; नंतर सर्वजण गाडींत बसून चालतीं झालीं.

प्रकरण २०.

ऐहिकविषयप्रीतीचे परिणाम.

मागील प्रकरणांत **प्रतापरावां**नीं शेतकऱ्यास, 'तुह्मांस सर्व व्यवस्था झाली ह्मणजे आणावयास पाठवूं' ह्मणून वचन दिलें होतें, तें त्यांनीं बिनचूक पाळिलें. हिंवाळ्यामध्यें त्या वृद्ध स्त्रीपुरुषांना **सुवर्णपुरी**स घेऊन येण्याकरितां त्यांनीं गाडी पाठविली.

वृद्ध मातापितरांच्या सुखास आपण निरंतर मुकणार असें पाहून तो त्यांचा मुलगा अतिशय रडला. जिला हीं

कधीं दृष्टीआड होतीलसें झालें होतें, अशा सुंदराबाई-ला तीं पुनः कधीं न परत येण्यास निघालीं हें पाहून फारच आनंद झाला. परंतु लवकरच तिच्या सुखरूप दुग्धांत मीठ पडलें; कारण त्याच वेळेस गाडी हाकणारानें तिच्या हातीं एक पत्र दिलें.

'आपल्या सासूसासऱ्यांच्या निर्वाहासाठीं जें देण्याची कबुलायत झालेली आहे, व जें अन्न द्यावयाचें ठरलें आहे, त्याच्या त्या त्या वेळेच्या बाजारभावाप्रमाणें किमतीचे पैसे दर तीन महिन्यांनीं सुवर्णपुरीस पाठवून देत जावे, असें न केल्यास, कायद्याप्रमाणें व्यवस्था होईल'—असें त्यांत लिहिलें होतें. तें वाचतांच तिच्या अंगाचा तिळपापड होऊन ती दुर्भाषणें बोलूं लागली. ती ह्मणाली, "शेवटीं मेल्यांनीं आमचा घात केला! तीं येथें रहातीं तर ह्याच्या निम्माही खर्च लागला नसता."

आपल्या बायकोचा दुर्वृत्तपणा एकीकडे राहून शेवटीं आपल्या मातापितरांस सुखाचा वांटा मिळून, त्यांस समाधान वाटण्याची संधि आली, हें पाहून शेतकऱ्याचे मुलास फार आनंद झाला; परंतु तो बाहेर प्रदर्शित न करण्याविषयीं त्यानें खबरदारी घेतली.

असो. दुसरे दिवशीं सकाळीं तीं वृद्ध स्त्रीपुरुषें गाडींत बसून जावयास निघालीं. तेव्हां त्यांच्या मुलास बरें वाटलें, परंतु सून मात्र चरफडत राहिली. आपल्या वडिलांशीं दुराचरण, व निर्दयपणा हे अवगुण ज्यांच्या अंगीं आहेत त्यांस जें फळ भोगावें लागतें, तेंच ह्या दुष्ट स्त्रीस भोगावें लागलें. तिनें आपला सर्व पैसा नवीनच कारखाना काढलेल्या एका व्यापाऱ्यास कर्जाऊ दिला होता, त्यास शेंकडा दहा

प्रमाणें चक्रवाढ व्याज देण्याचें त्यानें कबूल केलें होतें. तीस वर्षांनीं ही केवढी थोरली रकम होईल ह्याविषयीं विचार करीत असतां, तिला इतका आनंद वाटे कीं कांहीं सांगतां पुरवत नाहीं. ती आपल्या मनांत आपल्यासारखें सुखी दुसरें कोणी नाहीं, असें ह्मणत असे. परंतु ह्या सुखस्वप्नांत असतां, एकदम तिचे डोळे उघडले. व्यापाऱ्यास तोटा आला व त्याचा माल न्यायाधिशाच्या हुकमावरून विकला गेला. ही वार्ता ऐकून सुंदराबाईला अंगावर वीज पडल्यासारखें झालें, व तेव्हांपासून तिच्या चित्ताचें स्वास्थ्य गेलें. दिवसां पहावें तेव्हां वकीलाकडे खेपा घालते आहे, व आपल्या दुर्दैवाचें गाऱ्हाणें आपल्या शेजाऱ्यांस सांगत बसली आहे असें दिसे. व रात्रौ ती रडत व तडफडत बसे. शेवटीं सव्वीस हजारांबद्दल अगदीं थोडे रुपये तिच्या पदरांत पडले, तेव्हां तिची अगदीं निराशा झाली व जीवित भयंकर वाटून आतां मरण येईल तर चांगलें असें तिला वाटूं लागलें. ह्याप्रमाणें निरंतर चिंताग्नीनें जळत असतां तिला ताप आला व त्या तापांतून ती पुन: उठली नाहीं. तिच्या नवऱ्यानें 'वैद्याला बोलावूं का?' ह्मणून विचारिलें, परंतु तिनें नको ह्मणून सांगितलें. दुखणें बळावत चाललें असल्यामुळें, त्यानें तिचें न ऐकतां, वैद्यास बोलावणें पाठविलें; परंतु वैद्यानें दिलेलें औषध तिनें घेतलें नाहीं इतकेंच नव्हे, तर औषधाच्या कुपीचें बूचही न काढतां ती तशीच खिडकीवाटें रागाच्या सपाट्यांत बाहेर फेंकून दिली. अशा रीतीच्या स्वेच्छाचारानें तिचें दुखणें असाध्य झालें, तेव्हां गांवच्या उपाध्यायास एकवार हिला भेटण्यास यावें, ह्मणून तिच्या नवऱ्यानें निरोप पाठविला.

तो पुष्कळ वेळां तिच्या समाचारास आला, व तिला पुष्कळ बोध करून तिला पश्चात्ताप व्हावा, व तिचें मन ऐहिक विषयांवरून निघून **ईश्वराकडे** लागावें ह्मणून त्यानें पुष्कळ यत्न केले. फार तर काय, **ईश्वराची** भक्ति करण्याबद्दल त्यानें तिची विनवणीही केली, परंतु तें सर्व अरण्यरुदित झालें.

एके प्रसंगीं तो तिला उपदेश करीत असतां तिनें मोठ्या आश्चर्यमुद्रेनें त्याकडे पाहून ह्मटलें, "मला बोध करण्यासाठीं गुरुजी कां येतात, हें कांहीं बाई मला समजत नाहीं. मला उपदेश करण्यापेक्षां ज्यानें आमच्या द्रव्याचा अपहार केला, त्यास तो केला असता ह्मणजे ठीक झालें असतें. माझ्याविषयीं ह्मटलें तर, मला पश्चात्ताप करण्याची कांहीं जरूर आहे असें मला वाटत नाहीं, कारण, जोंपर्यंत मला जाववत होतें, तोंपर्यंत मी रविवारीं देवळांत जाण्यास चुकत नसें. जन्मभर हाडांचीं काडें व रक्ताचें पाणी करून द्रव्यसंचय केला. उधळपट्टी न करितां काटकसरीनें संसार कसा करावा ह्या गोष्टीचा लोकांनीं माझा कित्ता वळवावा, अशी मी होतें. तुह्मी मला उपदेश करण्यास आलां नसतां, तर तुमच्या साऱ्या गांवांतल्या धार्मिक व निर्व्यसनी लोकांत मी मोडतें, असें समजलें असतें."

हिला ताळ्यावर आणून परलोकमार्गाकडे लावण्यास आणखी उपदेश केला पाहिजे असें धर्मोपदेशकास पक्कें वाटलें; तेव्हां त्यानें आपलें सर्व वाक्चातुर्य खर्चून शेवटीं आपण धनलोभी असून त्यास संसाराची काटकसर ह्मणून ह्मणत होतों, अशी तिची खातरी करून दिली, व सांगितलें कीं पैशाची मूर्ति निरंतर तुझ्या डोळ्यां-

पुढें असल्यामुळें तूं मूर्तिपूजक झालीस. तुझीं पापें कोणतीं ह्मणशील तर ज्या क्रोधावेशानें तूं ह्या देशेस आलीस तो क्रोध; सर्व सुंदर गुणांपैकीं मुख्य गुण जो गुरुप्रेम त्याचा तुझ्या ठिकाणीं अभाव; ज्याच्या योगानें तुझ्या पतीचें सुख नष्ट झालें, ज्याच्या योगानें मनांत दया न आणतां बापड्या शांतेला तूं हाकून लावलेंस व ज्याच्या योगानें आपल्या स्वत:च्या मातापितरांप्रमाणें ज्यांचा मान ठेवावयाचा व ज्यांवर प्रीति करावयाची त्या आपल्या सासूसासऱ्यांसही त्यांच्या वृद्धापकाळीं घराबाहेर काढून त्यांच्या पुत्राशीं वियोग केलास, असा लोभ; इतकी संपत्ति जवळ असून, ते आपल्या दारापासून निघून जावे अशा हेतूनेंही तूं गरीब लोकांस भाकर कधींही वाढली नाहींस असें तुझें कार्पण्य; ईश्वराविषयीं खऱ्या भक्तीपासून उत्पन्न होणारे बंधुप्रीतीचा अभाव; ईश्वरावर व मनुष्यावर प्रीति करणें हेंच ख्रिस्ती धर्माचें तत्त्व, त्याविषयीं उपेक्षा; जरी तूं अशी प्रौढी मारतेस तरी बाह्यात्कारीं केलेल्या भजनानें आत्म्याचें तारण होत नाहीं; व तुझ्या वृत्तींत त्यायोगानें कांहीं एक फेरफार झाला नाहीं; असें असतां प्रत्येक रविवारीं मी देवळांत जात होतें अशी प्रौढी; आणि हृदयामध्यें प्रेम नसतां प्रार्थना करणें;-हीं सर्व पापें आहेत;" असें त्यांनीं तिला सांगितलें. ह्या रीतीनें भक्तिमान् गुरुजी उपदेश करीत होते, व पुढें आणखीही त्यांनीं तो केला असता, परंतु तिनें त्यांस तसें करूं दिलें नाहीं. ती मोठमोठे उसासे टाकून धाय धाय रडूं लागली.

शेवटीं त्यांला शीण आला म्हणून आपले कपडे व काठी घेऊन ते उठून चालते झाले, व जातांना आपणा-

शींच म्हणाले, "अरेरे! देवा! ऐहिकविषयांची ज्यांना गोडी लागली आहे त्यांस पारलौकिक विषयांची गोडी लावणें किती तरी दूरापास्त आहे! अशांचें हृदय स्वर्गाला किती तरी पराङ्मुख असतें! मनापासून जी ईश्वरप्रार्थना तीच प्रार्थना, असें असतां अशा हृदयाच्या माणसांना वाटतें कीं आपले निरर्थक शब्द ऐकून ईश्वर आपल्या अपराधांची क्षमा करील! त्याप्रमाणेंच आपणाला पुरून उरलेल्या अन्नाचे शिळेपाके तुकडे आपल्या गरीब शेजाऱ्यापाजाऱ्यांस देणें हाच धर्म, असें तीं समजतात. वास्तविक पहातां, अशांच्या आचरणांत कांहीं एक फेर न पडतां त्यांचें अज्ञान इतकें वाढतें कीं शेवटीं तीं दुर्गुणांस सद्गुण म्हणूं लागतात." पुढें बागेवरून जातांना त्यांची नजर तिच्याकडे गेली व शांतेची आठवण होऊन ते म्हणाले, "श्रीमंतींत सुख आहे अशी कित्येक लोकांची समजूत असते ती किती चुकीची आहे! गरीबींत असतां शांतेला ह्या बागेंतील फुलांपासून जसें सुख होत असे, तसें, किंवा त्याच्या शतांशही, इतकी धनदौलत जवळ असून, सुंदराबाईला कधीं झालें नसेल."

असो. सुंदराबाईचें दुःख अजून संपलें नव्हतें. रात्रीच्या रात्री, वेळोंवेळीं खोकतां खोकतां प्राण जातोसें होऊन तिला घालवाव्या लागल्या. तिच्या द्रव्यलोभानें तिला योग्य औषधें किंवा पथ्य व पौष्टिक खाणें खाऊं दिलें नाहीं. समाधानाच्या विचाराचा लेशही तिच्यांत नसल्यामुळें तिचें दुःख तिळभरही कमी झालें नाहीं. ईश्वरावर हवाला ठेवून त्याच्या इच्छेप्रमाणें रहाण्याचा विचार तिच्या मनांत मुळींच आला नाहीं. उपदेशक तिला उपदेश

करतांना कंटाळून गेले म्हणून वर सांगितलें आहे. तथापि त्यांच्या अंतःकरणांत दया असल्यामुळें, आपल्याकडून होईल त्या उपायानें तिचें मन **ईश्वराकडे** लावण्याचा ते प्रयत्न करीत.

अंतकाळ येण्याच्यापूर्वीं कांहीं दिवस **सुंदराबाईचें** हृदय केव्हां केव्हां द्रवे, परंतु तिला खरा पश्चात्ताप म्हणून मुळींच झाला नाहीं. अशा रीतीनें दुःख होऊन शेवटीं तारूण्याच्या ऐन भरांत परलोकाचा मार्ग तिनें धरला. लोभ, क्रोध, व विषयासक्ति, ह्यांनीं मनुष्याची किती वाईट स्थिति होते, ह्याचें हें एक उदाहरण आहे.

प्रकरण २१.

शांतेची क्षमाशीलता.

वर्षांतून कांहीं दिवस **प्रतापराव मणिपुरास** रहावयास आपल्या कुटुंबासह जात असत, त्यांबरोबर **शांताही** गेली. तेथें असतां एक दिवस सकाळीं, **प्रतापरावांच्या** घरीं एक वृद्ध धर्मोपदेशक आला, व **शांताबाई** येथें आहेत का म्हणून विचारूं लागला. "काय काम आहे?" म्हणून विचारितां "शांतेशींच माझें काम आहे," असें त्यानें सांगितलें.

ती बाहेर आल्यावर तो तिला म्हणाला, "**शांताबाई**, मृत्युपंथास लागलेल्या एका बाईची तुम्हाशीं बोलावयाची इच्छा आहे, तिचा तेवढाच हेतु उरला आहे. ती ह्मणाली, '**शांतेशीं** जें मला बोलावयाचें आहे तें खुद्द तिच्याशींच मला बोलावयाचें आहे, दुसऱ्या कोणाशींही बोलावयाचें नाहीं.' "

हें ऐकून **शांतेला** फार आश्चर्य वाटलें. तिनें **प्रियंवदाबा**ईस कसें करावें म्हणून विचारिलें. ह्या उपाध्यायाच्या धार्मिकपणाची व शहाणपणाची **प्रियंवदाबाईस** माहिती होती, म्हणून तिनें **शांतेला**, "जा, कांहीं हरकत नाहीं," असें सांगितलें. वृद्ध **सदोबा**सही उपाध्यायानें आपल्याबरोबर घेतलें.

पुष्कळ वेळ चालल्यानंतर शहरच्या अगदीं बाहेरच्या प्रदेशाकडे तो उपाध्याय वळला, व आडगल्लींनीं जातां जातां शेवटीं एका घराशीं उभा राहिला. हें घर एखाद्या मशीदीसारखें दिसत होतें. ती आजारी बाई ज्या खोलींत होती तींत जाण्यास पांच जिने चढावयाचे होते; ह्यांपैकीं शेवटचे दोन काळोखांत असून इतके मोडकळीस आले होते कीं **शांतेला** फार भय वाटलें. वर चढून गेल्यावर एका जुन्या दरवाजापाशीं तो धर्मोपदेशक उभा राहिला. ह्या दरवाजाचीं दारें जाडे भरडे तक्ते खिळे ठोकून एके ठिकाणीं जुळून केलेलीं होतीं. "हें तें दार," एवढेंच ह्मणून तो थांबला; व "बाई, अमळ थांबा, मीं आंतून जाऊन येतों"—असें म्हणून तो आंत गेला व लागलाच परत बाहेर येऊन **शांतेला** आंत घेऊन गेला.

शांता आंत जाऊन पाहते तों तिनें जन्मांत कधीं पाहिला नाहीं इतका खराब तो माळा आहेसें तिला दिसलें. तेथें एक खिडकी होती, परंतु ती लहान असून तींतून उजेड मुळींच येत नव्हता, तिचीं तावदानें फुटून गेलीं असल्यामुळें त्यांच्या जागीं कागद चिकटविले होते. आंतील सामान पाहिलें तर—एक कित्येक दिवस न झाडलेला जुना बिछाना, त्यावर पसरलेली एक फाटकी चादर, जव-

ळच ठेविलेला एक मोडका चौरंग, व त्यावर ठेविलेलें पाण्याचें मडकें—इतकें होतें.

ती आजारी बाई त्या अंथरुणावर पडली होती. तिच्याकडे पाहिलें असतां खरोखरच भय वाटावें अशी तिची अवस्था झाली होती. तिनें जेव्हां आपला हात बाहेर काढला, व बोलूं लागली तेव्हां **शांते**ला वाटलें कीं, हाडांचा सांगाडाच हलूं लागला काय, व मी ऐकतें ही मृत्यूचीच गर्जना आहे काय! सारांश, तिच्या देहाचें अस्थिचर्म व जीव ह्यांशिवाय कांहीं राहिलें नव्हतें. **शांते**ला त्या वेळेस अतिशय भय वाटलें व तिचें सर्वांग कांपूं लागलें. शेवटीं मोठ्या प्रयासानें त्या बाईच्या तोंडांतून हळू हळू निघणारे शब्द लक्षपूर्वक ऐकून, आवाजाच्या धोरणानें **सुवर्णपुरीं**तल्या किल्ल्यांत असतां, जी आपल्या विपत्तीचें कारण झाली, तीच ही, प्रेतकळा आलेली **चिमाऊ**, असें तिनें ओळखलें. **शांते**ला ही **चिमाऊ** आहे असें एकदम ओळखतां आलें नाहीं.

प्रतापरावांच्या कुटुंबाबरोबर **शांता मणिपुरां**त आली आहे असें धर्मोपदेशकाकडून जेव्हां **चिमाऊ**ला कळलें तेव्हां तिला पश्चात्ताप झाला असल्यामुळें आंगठीच्या प्रकरणाबद्दल **शांते**जवळ क्षमा मागावी असा तिनें बेत केला, व त्या धर्मोपदेशकाला तिला बोलावून आणावयास सांगितलें. परंतु आपलें नांव ऐकल्याबरोबर ती संतापून कदाचित् येणार नाहीं ह्मणून "मीं तिला बोलावलें आहे असें सांगूं नका," असें तिनें त्यास सांगितलें होतें.

ख्रिस्ती धर्माचीं तत्त्वें **शांते**च्या अंगांत भिनलीं असल्यामुळें तिला तिची ती स्थिति पाहून रडूं आलें. तिनें **चिमाऊ**स अनेक वेळां सांगितलें कीं "**चिमाऊ**, मी

तुझ्या अपराधांची अगदीं मनापासून क्षमा केल्यास पुष्कळ दिवस झाले: माझ्या मनांत तुझ्याविषयीं दयेशिवाय दुसरा कोणताही भाव नाहीं. " हे मायेचे शब्द ऐकून, **चिमाऊ**-ही डोळ्यांत आसवें आणून ह्मणाली—" अरेरे! माझ्यासारखी पापी कोणीही नसेल. **देवा**! माझ्या कृत्यांचें योग्य फळ मला प्राप्त झालें. **ईश्वराचें** विस्मरण, सदुपदेशाचा तिरस्कार, उंची कपडे, हांजी हांजी करणें, चैनबाजी, व ह्यांवर अतिशय प्रेम, हींच माझ्या विपत्तीचीं मूळ कारणें असून त्यांनींच मी इतक्या नीच स्थितीस आलें. माझ्या मूर्खपणानें मीं आपल्यावर ही विपत्ती ओढून आणिली आणि तिच्यांतच आतां माझा अंत होणार. मी तुह्माला इतकी विपत्ति भोगावयास लाविली ह्मणून मला तुह्मीं इहलोकीं क्षमा केली खरी, परंतु परलोकीं मला ह्यापेक्षां अधिक भयंकर दुःख भोगावें लागणार याचें मला अतिशय भय वाटतें. **ईश्वराचा** मजवर कोप झाला आहे, असें आतांच मला वाटूं लागलें आहे. " **शांतेनें** जवळ बसून तिच्याशीं पुष्कळ बोलून सर्वांचा तारणारा जो **येशु**ख्रिस्त त्याकडे आपलें लक्ष लाव; तुला खरोखर पश्चात्ताप झाला तर तो तुझा अंगीकार करील"—असें तिला वारंवार सांगितलें. परंतु तिला पश्चात्ताप झाला अशी तिची खातरी होईना, ह्मणून कंटाळून शेवटीं ती घरीं गेली.

उद्धाराची आशा नाहीं अशा स्थितींत **चिमाऊ** मरणार, हें मनांत येऊन **शांतेला** फार वाईट वाटलें व ती अगदीं उदास होऊन गेली. सर्व दिवसभर, "त्या सुंदर **चिमाऊची** अशी अवस्था होऊन तिच्यावर प्रेतकळा आली ना!" हे शब्द तिच्या तोंडांतून निघत होते; तेव्हां

तिला थंडीच्या कडाक्यामुळें ज्याचीं पानें गळून गेलेलीं आहेत, परंतु जें मोहरानें झांकलेलें आहे, अशा आंब्याच्या झाडाची आठवण झाली. त्या संबंधानें तिच्या पित्यानें जें भाषण केलें होतें, तेंही तिला आठवलें. त्याप्रमाणेंच **आनंदरावानें** अंतकाळीं तिला जो उपदेश केला त्याचीही आठवण तिला होऊन, "हे **ईश्वरा!** तुझ्या गौरवाच्या चिंतनाशिवाय दुसऱ्या कशाचेंही मी चिंतन करणार नाहीं," असें ती ह्मणाली. "तुह्मी आपल्या वैऱ्यांवर प्रीति करा, जे तुह्मांस शाप देतात त्यांस आशीर्वाद द्या, जे तुमचा द्वेष करितात त्यांचें बरें करा, आणि जे तुह्मास गांजितात व तुमच्या पाठीस लागतात त्यांच्यासाठीं प्रार्थना करा," हें **ख्रिस्ताचें** वचन तिला आठवलें.

"**चिमाऊ**ला विपत्तींतून दूर केल्यास माझ्यावर व तिच्यावर आपले फार उपकार होतील," असें तिनें **प्रियंवदाबाईस** ह्मटलें. तीही मनाची उदार असल्यामुळें तिनें औषधपाणी, अन्न, कपडे, व तिला त्या वेळेस लागणारे दुसरे पदार्थ **चिमाऊ**कडे पाठवून दिले, परंतु ही सामग्री जाण्याच्या पूर्वींच तिचा अंत झाला.

चिमाऊचें वय त्या वेळेस तेवीस वर्षांचें होतें. ह्यावरून असें दिसतें कीं, आपण आपल्या हितासाठीं ह्मणून दुसऱ्यांना त्रास देऊन जें पाप जोडतों त्याचें फळ असें होतें. तिला पश्चात्ताप न होतां, जशी ती **ईश्वर**विमुख व आशारहित जन्मभर होती, तशीच ती मेली.

प्रकरण २२.

शांतेची उपयुक्तता व सौख्य.

वसंत ऋतु आला, सर्वत्र वृक्षांना व लतांना नवी पालवी फुटून फुलें येऊं लागलीं; त्या वेळेस **प्रतापराव** आपल्या कुटुंबासहवर्तमान **सुवर्णपुरीं**तल्या घरांत रहावयास निघाले. **शांता**ही त्यांच्याबरोबरच गेली.

सुवर्णपुरीस तीं पोहोंचलीं तेव्हां संध्याकाळ झाला होता, त्या वेळेस **सुवर्णपुरीं**तील देवळाचा घुमट, **प्रतापरावां**चा किल्ला, व तिच्या पित्याचें घर, ह्यांवर अस्तास जाणाऱ्या सूर्याचीं किरणें पडलीं असल्यामुळें जणू सोन्याचा त्यांस मुलामाच केला आहे अशीं तीं दिसत होतीं. त्यांकडे पहातांच पूर्वीं अनुभवलेल्या सर्व सुखांची आठवण होऊन **शांते**ला जें रडें कोसळलें, तें कांहीं केल्या आवरेना. ती ह्मणाली–"**ईश्वरा**! तुझी कृति फार गहन आहे, तूं अद्वितीय आहेस! ज्या वेळेस मी प्रथम येथून बाहेर पडलें, त्या वेळेस मी फिरून येथें येईन याची कल्पनाही माझ्या मनांत नव्हती!"

पुढें त्यांची गाडी किल्ल्याच्या दरवाजाजवळ गेली, तेव्हां **प्रतापरावां**चे सर्व नोकर व त्यांच्या हाताखालचे सर्व कामदार सामोरे आले. **शांते**चें जें सर्वांनीं स्वागत केलें तें अवर्णनीय होतें. तिला पाहतां क्षणींच त्यांस अतिशय आनंद झाला; व त्यांनीं तिच्यावरील आरोपाचें निराकरण झालें ह्मणून तिचें अभिनंदन केलें.

ज्या वृद्ध न्यायाधीशांनीं तिला शिक्षा दिली होती त्यांनीं पितृप्रेमानें **शांते**चा हात धरून सर्वांसमक्ष तिची क्षमा मागितली; व झालेला अन्याय निस्तरण्यासाठीं **प्रतापराव** व

प्रियंवदाबाई ह्यांनीं जें उदार कृत्य केलें, त्याबद्दल त्यांनीं त्यांचे आभार मानिले. "**शांतेला** व तिच्या पित्याला भोगाव्या लागलेल्या विपत्तीबद्दल सर्वांपेक्षां मलाच दोष दिला पाहिजे व तुमचें हें ऋण फेडण्याविषयीं माझ्यानें होतील तितके प्रयत्न मी करीन"—असें त्यांनीं **प्रतापरावांस** सांगितलें.

दुसरे दिवशीं **शांता** फार लवकर उठली. तिच्या खोलींत पडलेलें स्वच्छ ऊन, व तिला झालेला आनंद, ह्यांमुळें ती लवकर उठली. उठतां क्षणींच आपल्या पित्याचें गृह व बाग पहावयास ती फार त्वरेनें गेली. वाटेंत जे जे तिला भेटले त्या सर्वांचीं तोंडें आनंदानें प्रफुल्लित झालीं होतीं. पूर्वीं तेथें असतां, ज्या लहान मुलांना ती फुलें देत असे, तीं मुलें मोठीं झालेलीं पाहून तिला फार आश्चर्य वाटलें.

शेतकरी आणि त्याची बायको यांस **शांतेच्या** बापाचे घरीं येऊन राहिल्यास बरेच दिवस झाले होते; **शांता** तेथें पोहोंचतांच तीं तिला सामोरीं आलीं व प्रेमपूर्वक तिचें चुंबन घेऊन "आह्मी मोठ्या सुखासमाधानानें येथें काळ घालविला," असें त्यांनीं तिला सांगितलें. शेतकऱ्याच्या डोळ्यांत आनंदाश्रु येऊन तो ह्मणाला, "ज्या वेळेस तुह्मी घरावांचून उघडीं पडलां होतां, त्या वेळेस आह्मीं तुह्माला आपल्या छपराखालीं रहावयास जागा दिली, व आतां जेव्हां आमची तशी स्थिति झाली तेव्हां आमच्या ह्मातारपणाचे दिवस सुखांत जातील असें हें सुंदर गृह तुह्मीं आह्मास रहावयास दिलें." शेतकऱ्याची बायको ह्मणाली, "होय, एवढ्यासाठींच परोपकार व आदरातिथ्य करावें, कारण आपल्यावर प्रसंग केव्हां गुदरेल हें आपणास मुळींच ठाऊक नसतें." त्यावर **शेतकरी** ह्मणाला, "हो! हो! आम्हीं त्या वेळेस असा

विचार मुळींच केला नव्हता व तसा आमचा उद्देशही नव्हता. असो. 'लोकांचे उपयोगीं पडल्यास प्रसंगीं कोणी आपल्याही कामीं पडतील,' हें वचन सत्य आहे."

शांतेनें त्या घरांत प्रवेश केला, व खोलींत ज्या जागीं तिचा पिता बसत असे, त्या जाग्याकडे पाहतांक्षणींच तिचा ऊर भरून आला, म्हणून ती बागेंत गेली व इकडे तिकडे फिरूं लागली. तेथेंही तिची तींच अवस्था झाली. जेव्हां तिनें बागांतील आपल्या बापानें लावलेले वृक्ष पाहिले, तेव्हां जसें काय तिला आपले भाऊच भेटले असें वाटून तिनें त्यांचे मुके घेतले. त्यांत विशेषेंकरून त्या वेळीं सुंदर फुलांनीं भरलेल्या आंब्याच्या झाडाजवळ येऊन तेथें फार वेळ थांबली व म्हणाली, "मनुष्याचें इहलोकीं जीवित किती क्षणभंगुर आहे! मनुष्य मरतो, परंतु त्यानें स्वतः लावलेलीं लहान लहान झाडें देखील तशींच रहातात." ती पूर्वीं तेथें रहात असतां, आपल्या पित्यासह ज्यांत पुष्कळ वेळ बसत असे, त्या लतामंडपांत जाऊन बसली. तेथून चोहींकडे आपल्या पित्यानें घामाघूम होण्याजोगे परिश्रम करून लावलेल्या बागाकडे ती पाहूं लागली. तेव्हां आपला पिता आपल्या समोर असून आपण त्याकडे पाहत आहों असें तिला वाटलें, व तिच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहूं लागल्या. तो आतां अधिक सुखमय स्थानीं आहे व तेथें इहजन्मांतील सर्व कष्ट विसरून, सत्सुख भोगीत आहे—हा विचार तिच्या मनांत येऊन तिचें दुःख कमी होऊन तिला समाधान वाटलें.

प्रत्येक वसंतऋतूंत ती कांहीं दिवस प्रतापरावांच्या किल्ल्यांत रहावयास जात असे. तेथें सर्वजण तिच्यावर

प्रीति करीत व तिला मान देत. त्या ठिकाणीं ईश्वर-भजनांत, व परोपकार करण्यांत तिचा काळ सुखानें जाई. तथापि खेड्यापाड्यांतल्या मुलांमध्यें बसून त्यांना आपल्या तारणाऱ्याविषयीं उपदेश करण्यांत तिला विशेष सुख वाटे; व आपल्या उपदेशामुळें पुष्कळांनीं आपलें चित्त ईश्वराकडे लाविलें, हें पाहून तर तिला फारच आनंद झाला. ह्या रीतीनें सदाचरणांत ती आपलें आयुष्य घालवूं लागली.

श्लोक.

मनीं आणुनी दुःख तें दुःखितांचें
दया त्यांवरी जे करीतात साचे ॥
तयांना ह्मणे ईश, 'जे जे करीती
दया हो सदा त्यांवरी मद्दया ती' ॥ १ ॥
मनुष्यां दिसे बाह्य कांहीं असे तें
न ते पाहती ईश्वराच्या मुखातें ॥
असे अंतरीं शुद्ध तें चित्त ज्यांचें
तयां लाधतें सौख्य तद्दर्शनाचें ॥ २ ॥

प्रकरण २३.

आनंदरावाचें थडगें.

मंजुळेनें शांतेला दिलेल्या आश्वासनाप्रमाणें त्या सुशील आनंदरावास जेथें पुरलें होतें, त्या ठिकाणीं थडगें बांधून तयार झालें होतें. त्याचें काम साधें व सुरेख असून पांढऱ्या संगमरवरी दगडाचें केलें होतें, व त्यावरचा मृत्युलेख सोनेरी अक्षरांनीं लिहिला होता. त्या लेखांत मृताचें नांव, वय, व त्याचा बागवानाचा आणि टोपल्या विणण्याचा धंदा हीं लिहिलीं होतीं. ह्याशिवाय जें खरो-

खर सोन्याच्या शाईनेंच लिहिण्यास योग्य आहे असें येशूचें वचन, "पुनरुत्थान व जीवन मी आहें, जो मजवर विश्वास ठेवितो तो मेला तरी वांचेल:" तें त्यावर खोदलें होतें. ह्या लेखाखालीं एका कुशल कारागिरानें शांता आपल्या पित्यास जेथें पुरलें होतें तेथें अति दीन अवस्थेंत बसली असतां तिला त्या विपत्तींतून सोडविण्यास प्रभूनें कारणीभूत केलेल्या पुष्पकरंडकाची आकृति कोरली होती. त्या करंडकाखालीं सर्वांनीं ध्यानांत ठेवून विचार करण्याजोगें पवित्रशास्त्रांतील "अवघी मनुष्यजात गवतासारखी आणि माणसाचें सर्व गौरव शेतांतील फुलासारखें आहे. गवत वाळतें व त्याचें फूल गळतें परंतु देवाचा शब्द सतत राहतो:" हें वचन खोदलें होतें. शेजारच्या गांवांतील धर्मोपदेशक शांतेचा पूर्वींचा स्नेही होता, त्यानें मोठ्या आनंदानें तो लेख योग्य स्थळीं बसविण्याचा विधि केला. सभोंवतीं देवदारुवृक्षांच्या हिरव्या चार पानांनीं तें थडगें फारच सुशोभित दिसे, व शांतेनें तेथें लावलेल्या गुलाबाच्या झाडाला जेव्हां फुलांचा बार येई, व ज्यांच्यावर कांहीं कळ्या, कांहीं थोडीं उमललेलीं व कांहीं चांगलीं उमललेलीं फुलें यांसहित गुलाबाच्या फांद्या त्या पांढऱ्या शुभ्र संगमरवरी थडग्यावर पडत, तेव्हां तर त्याची शोभा अवर्णनीय दिसे. तें थडगें त्या वन्य श्मशानाचें अति सुंदर भूषण व त्या खेड्यांत पाहाण्याजोगें रमणीय स्थळ होऊन बसलें.

गांवांत जे कोणी नवे लोक येत त्यांस तें दाखविल्याशिवाय तो सुशील उपदेशक कधींही रहात नसे. जो कोणी तें पाही तो ह्मणे, "या गृहस्थाचें माळीपणाचें व टोपल्या विणण्याचें काम एकसमयावच्छेदेंकरून दाखवि-

ण्याकरितां त्याच्या थडग्यावर फुलांनीं भरलेली करंडी खोदिली ही योजना ठीक केली." तेव्हां तो उपदेशक ह्मणे कीं, "ही सुयोजना आहे इतकेंच नाहीं, तर तुमच्या मनांत ही टोपली पाहून जे विचार येतात त्यांपेक्षां ह्या गांवांतल्या लोकांच्या मनांत विशेष हृदयद्रावक विचार येतात. ज्या जागीं आपण उभे आहोंत तीस एका पितृभक्त कन्येच्या अश्रूंनीं चांगलें स्नान घातलेलें आहे. ह्या चित्राकडे पाहिलें ह्मणजे, तिच्या वृत्तांताचें सर्व चित्र त्यांच्या डोळ्यापुढें उभें रहातें."

हें त्याचें भाषण ऐकून, ऐकणारांस मोठें कौतुक वाटून, ते तो वृत्तांत आह्मांस सांगा असें ह्मणत; व तो उपदेशक तें त्यांस सांगे, आणि ज्या तत्त्वाच्या उदाहरणार्थ ही गोष्ट लिहिली आहे त्या तत्त्वाचा उच्चार करून तो वृत्तांत तो संपवी. तें तत्त्व हें:–

सदा सत्यभावें भजे ईश्वराला ॥
जनांशीं खरा भाव ठाऊक ज्याला ॥
अशातें जरी काळ आला छळाया ॥
तरी निश्चयें जाति तद्यत्न वांया ॥

असो, आमच्या वाचकांनीं कसाही प्रसंग आला तरी शांतेनें जसें आचरण केलें तसें करावें व

ध्यावें देवा, जनकजननी यांस सन्मान द्यावा ॥
आस्तिक्यानें सतत प्रभु तो ख्रिस्त येशू भजावा ॥
सद्वाक्या हो वदुनि पृथिवीमाजि सौख्यें रहावें ॥
त्यागूनि हें वपु मग सुखागार स्वर्गास जावें ॥

समाप्त.